# संपादकीय...



संपादक
**इकबाल शेख,**
**9890336600**

यंदाचा दिपावली विशेषांक प्रकाशीत करताना आम्ही काही महत्वाच्या बाबींवर प्रकाशझोत टाकण्याचा एक छोटासा प्रयत्न केलेला आहे. यंदाचा दिपावली विशेषांक प्रकाशीत करताना आमचे असंख्य वाचक चाहते व मित्रपरीवार संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असल्याने राज्याच्या प्रादेशिक पातळीवरुन माहिती पुरवण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रारंभिक यंदाची दिवाळी तुम्हा सर्वांना सुख समृध्दी व भरभराटीची जावो ही गोड शुभेच्छा!

दिपावली विशेषांकामध्ये आम्ही पर्यटन या संज्ञेवरुन संपूर्ण महाराष्ट्रातील ठळक पर्यटन स्थळांचा उल्लेख थोडक्यात परंतू संस्मरणीय माहिती पुस्तीकेची प्रसिध्दी करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

या प्रकाशन मागील प्रमुख उद्देश प्रामुख्याने समोर ठेवून वाचकांना वाचनीय आणि अभ्यासनीय व्हावेत म्हणून आमच्या राज्यातील असंख्य मित्रांनी, एनटीव्ही न्यूजच्या आमच्या सुज्ञ अभ्यासू प्रतिनिधींनी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती पुरवली आणि आम्ही ती जशीच्या तशी आपल्या पर्यंत पोहचविण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करत आहोत.

पर्यटन विशेषांकामुळे पर्यटनस्थळांची माहिती तर मिळतेच परंतू वैचारिक देवाण घेवाण आणि प्रवास करण्यासंदर्भातील माहिती ही मिळतेच म्हणून पर्यटनास अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शासकीय पातळीवरुन पर्यटनास जे महत्व देण्यात आले ते नेमके याच उद्देशाने की प्रसिद्ध स्थळांची माहिती होते त्या स्थळांना भेटी देणारे जगाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक त्या ठिकाणी यावे त्यांच्या येण्या-जाण्याने जो जिव्हाळा जी आपुलकी समाज मनात निर्माण होते ती पर्यटनानेच हे जग जोडण्याचे अतिशय महत्त्वाचे साधन निर्माण झाले आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही.

विविध प्रांतातील, प्रदेशातील उद्योग व्यवसाय भरभराटी करीता पर्यटन उपयोगाचे ठरते. उद्योग वाढला की रोजगार निर्माण होतो हा ठरलेला नियम आहे. रोजगाराची साधने वाढली की दळणवळण वाढते त्यांचे रुपांतर काला रुपाने भव्य होत जाते म्हणून पर्यटन हे महत्त्वाचे आहे. याकरीता शासनाने पर्यटन खाते आपल्या मंत्रालयात स्वतंत्ररित्या सुरू केलेले आहे.

जग जोडण्याचे काम त्यासोबतच सामाजिक व शैक्षणिक व आर्थिक प्रगतीचे साधन भव्य स्वरूपात निर्माण व्हावे हाच एकमेव उद्देश त्यामागे असू शकतो समाजमनातील माहितीची देवाण-घेवाण उद्योग व व्यापार पर्यटन या माध्यमामुळे निर्माण होतो.

आम्ही दिपावलीचे औचित्य साधून नव्या जगाच्या निर्मितीसाठी समाज मनातील बुध्दीची व्दारे अधिक प्रकाशमान व गतिमान व्हावीत जगाची आपल्या प्रदेशातील सभोवतालची ऐतिहासिक व धार्मिक ओळख सदैव व्हावी किंबहूना वृध्दींगत व्हावी याकरिता आम्ही या विशेषांकाच्या निमित्ताने केलेला छोटासा प्रयत्न आहे. पुनश्च एकवार आपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

- वर्ष : ७ वे
- अंक : ३६ वे
  दि. ०९ नोव्हेंबर २०१८
- संपादक : इकबाल मुबारक शेख
  सी-३०२, प्रेरणा आर्केड,
  तारकपूर बसस्टँडसमोर,
  अहमदनगर. मो. ९८९०३३६६००
- इरा जॉब वर्क
  पठाण बिलाल इब्राहिम
  अहमदनगर, मो.९२२६४६३१४९
- मुखपृष्ठ संकल्पना
  अबरार शेख
  मो.९७३०६९६९३६
- मुद्रक
  मखदुम पिंटर्स
  आबीद खान
  माणिक चौक, अहमदनगर
  मो.९८६०४७७८६९

मुल्य : 50/-


## सहकारी शिलेदार


| | |
|---|---|
| सचिन बीद्री | : उमरगा, जि.उस्मानाबाद |
| राजु खांडरे | : हिंगणघाट, जि.वर्धा |
| अमोल जामोदे | : बाळापूर, जि.अकोला |
| डॉ.एस.एम.शेख | : परळी वै. जि.बीड |
| बाबु तिडके | : धारूर, जि.बीड |
| आयुब शेख | : तुळजापूर,जि.उस्मानाबाद |
| मुजिब सय्यद | : मुखेड, जि.नांदेड |
| प्रताप नवले | : जाफराबाद, जि.जालना |
| रामनाथ रुईकर | : शेवगाव, जि.अहमदनगर |
| बाबासाहेब भोसले | : सिंदखेडराजा,जि.बुलढाणा |
| रियाज चाऊस | : जिंतूर, जि.परभणी |
| मकसुद अली | : यवतमाळ |
| प्रताप काकडे | : सेलु, जि.परभणी |
| जमिल सय्यद | : परभणी |
| समाधान सुरवडे | : मलकापूर, जि.बुलढाणा |
| शब्बीर सय्यद | : अहमदनगर |
| मंजु भागानगरे | : अहमदनगर |
| बाबासाहेब गर्जे | : सोनपेठ, जि.परभणी |
| नीता चौरे | : पालघर |
| संजय लांडगे | : वाडा, जि.पालघर |
| देवा राखुंडे | : इंदापूर, जि.पूणे |
| मुनिर शेख | : चिपळून, जि.रत्नागिरी |
| डॉ.विनोद खाडे | : खटाव, जि.सातारा |
| रुद्र्या स्वामी | : अक्कलकोट, जि.सोलापूर |
| वसंत पानसरे | : शहापूर, जि.ठाणे |
| आकाश सहाने | : उल्लासनगर, जि.ठाणे |
| गजानन गारघाटे | : समुद्रपूर, जि.वर्धा |
| महेश बोहेर | : राळेगांव, जि.यवतमाळ |
| रियाज सय्यद | : पुरदंर, जि.पूणे |
| रमेश कांबळे | : मावळ, जि.पूणे |
| सतिष चांदगुडे | : माढा, जि.सोलापूर |
| अनिल सोनवणे | : पुणे (ब्युरोचिफ) |
| अरबाज शेख | : अहमदनगर |

(अहमदनगर न्यायालयाच्या न्यायकक्षेत)
या अंकातील लेखकांना मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | विषयाचे नाव | पान नंबर |
|---|---|---|
| १) | अहमद निजामशाह | ५ |
| २) | अहमदनगर किल्ला | ६ |
| ३) | हश्त-बेहश्त बाग | ६ |
| ४) | सीना नदीवरचा लोखंडी पूल | ७ |
| ५) | झुलता पूल | ७ |
| ६) | सलाबतखान मकबरा | ८ |
| ७) | लाकडी पूल | ८ |
| ८) | दमडी मशीद | ९ |
| ९) | मुलूख मैदान तोफ | ९ |
| १०) | फराहबक्ष महाल | १० |
| ११) | आनंद धाम | ११ |
| १२) | रनगाडा संग्रहालय | १२ |
| १३) | शनि शिंगणापूर | १३ |
| १४) | निसर्गाची एक सुंदर देखणी : दाभोसा धबधबा | १४ |
| १५) | केळव्याच्या सुप्रसिद्ध समुद्र किनारा | १५ |
| १६) | नवसाला पावणारी डहाणूची महालक्ष्मी माता | १६ |
| १७) | डिघोळचे रेणुका माता तीर्थक्षेत्र | १७ |
| १८) | समुद्रपुर तालुक्याने पर्यटक दृष्टीने टाकली कात | १९ |
| १९) | इंदापूर तालुका ओळख | २४ |
| २०) | इंदापूर तालुक्याच्या इतिहास | २५ |
| २१) | इंदापूर तालुक्यातील धार्मिक स्थळे | २६ |
| २२) | मालोजीराजांची गढी | २७ |
| २३) | अहिल्यादेवी होळकरकालीन विहीर | २८ |
| २४) | चित्रबालक पक्षांचे माहेरघर | २९ |
| २५) | नरसिंह मंदिर नीरा नरसिंहपूर | ३० |
| २६) | ऐतिहासिक इंद्रेश्वर मंदिर | ३४ |
| २७) | अक्कलकोट | ३५ |
| २८) | श्री. गुरुमंदिर | ३७ |
| २९) | डावरगाव देवीची जगदंबा माता | ३९ |
| ३०) | उमरगा शहराचे ग्रामदैवत | ४० |
| ३१) | संत सहवासाने भारावलेले श्री क्षेत्र गोरटे | ४२ |
| ३२) | तिळसा येथील प्राचीन शिवमंदिर | ४३ |
| ३३) | अक्कलकोट संथान | ४४ |

| विषयाचे नाव | | पान नंबर |
|---|---|---|
| ३४) | बाळापूर : निसर्गाकडून लाभलेली नैसर्गिक देणं ! | ४५ |
| ३५) | आजनसार गावात लक्ष्मीबाई पोटी पांडुरंग अवतरले | ४७ |
| ३६) | निसर्गमय पर्यटन स्थळ ;सहस्रकुंड धबधबा | ४९ |
| ३७) | पुरातन शिवमंदिर मल्लिकार्जुन | ५१ |
| ३८) | जागृत देवस्थान –भूषणगड ची हरणाई देवी | ४३ |
| ३९) | रांजणगाव गणपती मंदिर | ५४ |
| ४०) | नांदेड येथील प्रसिद्ध पर्यटक स्थळ – गुरुद्वारा | ५५ |
| ४१) | रेणुका देवी एक जागृत देवस्थान.. | ५७ |
| ४२) | नाशिक पर्यटन | ५९ |
| ४३) | पांडव लेणी | ५९ |
| ४४) | श्री. सप्तशृंगी देवी | ५९ |
| ४५) | त्रिंबकेश्वर मंदिर | ६० |
| ४६) | लळींग किल्ला | ६० |
| ४७) | सिंदखेड राजा | ६१ |
| ४८) | श्री क्षेत्र वैष्णव गड | ६३ |
| ४९) | चांदबिबी | ६४ |



# अहमद निजामशाह (अहमदनगर)

पंधराव्या शतकाच्या अखेरीस, सन १४८६ मध्ये दक्षिण भारतातील बलाढ्य अशा बहामनी राजवटीची पाच शकले उडाली. स्वत:चे स्वतंत्र राज्य असावे या महत्वकांक्षेने फुटून निघालेल्या मलिक अहमद बहिरी याने प्रारंभी जुन्नर हे आपले मुख्यालय बनवले. अहमदाला नेस्तानाभूत करण्यासाठी बिदरचा सेनापती जहांगीरखान प्रचंड सैन्यानिशी चालून आला. भिंगारजवळ तुंबळ लढाई झाली. अतिशय कमी सैन्य असतानाही मलिक अहमदने बलाढ्य जहांगीरला पराभूत केले. विजय मिळालेली जागा आपल्यासाठी शुभ आहे, असे मानून त्याने इथेच राजधानी वसवण्याचा निर्णय घेतला. तो दिवस होता. २८ मे १४९० ! पुढे अवघ्या चार वर्षात म्हणजे १४९४ मध्ये निजामशाहीची राजधानी असलेले अहमदनगर शहर वसले. उत्तम नगररचना, समृद्ध बाजारपेठ, देखणी उद्याने, कारंजी खापरी नळाद्वारे पाणीपुरवठा, हातमाग व्यवसाय, टांकसाळ यामुळे नगर शहराचा नावलौकिक सर्वदूर पसरला. जगातील तेंव्हाची सुंदर शहरे असलेल्या कैरो व बगदादशी अहमदनगरची तुलना केली जात असे. निजामशाही इ.स. १६३६ पर्यंत टिकली. या काळात या शहराने अहमदशाह, बुऱ्हाणशहा, सुल्ताना चाँदबिबी यांच्या सारख्या शूरवीरांची कारकीर्द पाहिली; तसेच गुजरातच्या बहादूरशहा आणि अकबरपुत्र मुराद, दानियलच्या आक्रमणांचा चटकाही भोगला. मुकमिलखान दख्खनी, सलाबातखान, चंगेझखान, मलिकअंबर यांच्यासारखे मुत्सद्दी; शहा ताहिरसारखे विद्वान; राजे शहाजी भोसले, कुंवरसेन, गोपाळराव, संभाजी चिटणवीस यांच्यासारखे कर्तबगार हिंदू प्रधान आणि शाहशरीफ, मिरावलीसारखे साधूपुरुष निजामशाहीच्या काळात होऊन गेले. जगप्रसिद्ध 'मुलाख मैदान' तोफ निजामशाहीच्या काळातच तयार झाली. निजामशाहीच्या पडत्या काळात शहाजीराजांनी मुर्तुझा निजामशहाला मांडीवर बसवून राज्यकारभार हाती घेतला आणि परकीय आक्रमणांपासून हे राज्य वाचविण्याचा प्रयत्न केला. मराठेशाहीची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने तेंव्हाच रोवली गेली. शहाजहान बादशहाने निजामशाहीचा समूळ नाश करून अहमदनगर मोगलांच्या ताब्यात घेतले. पुढे दक्षिणेतील सुभेदार निजाम-उल्-मुलूक दिल्ली दरबाराचा संबंध तोडून स्वतंत्र झाला.

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

हॉटेल सौंदर्या

प्रोप्रा. दत्तराज ताटे (बालम)
जकेकुर चौरस्ता,
उमरगा, जि.उस्मानाबाद

# अहमदनगरचा किल्ला



अहमदनगर ही निजामाशाहीची राजधानी ! निजामशहाचा संस्थापक मलिक अहमद याने इसवी सन १४९० मध्ये बहामनीचा सेनापती जहांगीर खान याच्याशी झालेल्या लढाईतील विजयाप्रित्यर्थ 'कोट बाग निजाम' नावाचा महाल स्वत:साठी बांधला. हीच किल्ल्याच्या बांधकामाची सुरूवात कोटास पाया घातला. ते वेळेस भिंगा महार आणून जीताच पायाखाली घातला.

कोटाचा घेर गज सुमारी १६२७. अहमदशहाचा नातू हुसेन निजामशाह याने पुढे शत्रुच्या आक्रमणांची शक्यता लक्षात घेऊन २२ बुरूज असलेला मजबूत कोट उभा केला. १ मैल ८० यार्ड इतका परिघ असलेल्या या तटबंदीभोवती रूंद खंदक असल्याने हा किल्ला अभेद्य बनला. किल्ल्यात सोनमहाल, गगनमहाल, मीनामहाल, बगदाद महाल, मुल्कआबाद, दिलकशाद हे महाल होते.

गंगा, जमुना, मछलीबाई, शक्करबाई नावाच्या विहिरी, बारवा होत्या. छ. शिवाजी महाराज चौथे येथे कैद होते. त्यांना येथे छळ करुन मारण्यात आले. त्यातील काही आजही अस्तित्वात आहेत. १९४२ च्या आंदोलनात मौलाना आझाद, असफ अली, सरदार पटेल, पंडीत नेहरु व अन्य १२ लोक होते. १२ राष्ट्रीय नेत्यांना याच किल्ल्यात स्थानबध्द करण्यात आले होते.


प्रस्तूत चित्र विल्यम मिलर (सन १७९५-१८३६) याने पेन व शाईने एप्रिल १८३१ मध्ये काढलेले आहे. 'इंटेरिअर ऑफ द फोर्ट अहमदनगर' असे यावर लिहिलेले आहे. निजामशाहीच्या महालाचे हे अवशेष आजही

# हश्त-बेहश्त बाग (अहमदनगर)



तलावाच्या मध्यभागी असलेल फैजबक्ष महाल नावाने ओळखली जाणारी ही अष्टकोनी दुमजी वास्तु १५०६ मध्ये अहमद निामशाच्या काळात बांधण्यात आली. या वास्तूचे आठ दरवाजे म्हणजे स्वर्गाचे आठ दरवाजे, असे सांगण्यात येते. या वास्तूजवळ हमामखाना आहे. पिंपळगाव व शेंडीहून खापरी नळाने येथे पाणी आणण्यात आले होते. हमामखान्यातील हवा आणि प्रकाश व्यवस्था आवर्जुन पाहण्यासारखी आहे. पूर्वी या परिसरात गुलाबाचे सुंदर उद्यान होते. अकबरपुत्र मुराद नक्षरवर स्वारी करण्यासाठी आला असता येथे वास्तव्यास होता. या परिसरातील लक्कड महालात मुर्तझा दिवाणा रहात होता. काही अंतरावर बादगीर (हवा महल) आहे. नगर-मनमाड रस्त्यावरुन तसेच पाईपलाईन रोडवरुन इथे यायला रस्ता आहे.

# सीना नदीवरचा लोखंडी पूल (अहमदनगर)



सीनानदीवरचा रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावरील लोखंडी पूल म्हणजे ब्रिटीश स्थापत्यशास्त्राचा अजोड नमुना आहे. या पुलाची लांबी ५३० फूट असून, रुंदी १८ फूट आहे. आठ धनुष्याकृती (बो ग्रीड) लोखंडी कमानी वापरुन ऑगस्ट १८६९ ते जानेवारी १८७३ दरम्यान या पुलाची उभारणी करण्यात आली. पुलाच्या एका बाजूला शीलालेख बसवण्यात आला असून, त्यावर मेजर ई.जी. गॅम्बिएर यांच्या हस्ते या पुलाचे भुमिपूजन झाल्याचा, तसेच पुलासाठी ९० हजार ३११ रुपये खर्च आल्याचा उल्लेख आहे. काही वर्षापूर्वी या पुलावरील अवजड वाहतुक बंद करण्यात आली. लोखंडी पुलाशेजारीच असलेल्या दगडी पुलावरुन ही वाहतुक केली जाते. लोखंडी पुलाला १०० वर्षेपूर्ण झाल्यानंतर पूल बनवणाऱ्या ब्रिटीश कंपनीने तसे पत्र अहमदनगर महापालिकेला पाठवले होते.



# झुलता पूल (अहमदनगर)

अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्याला पूर्वी एकच प्रवेशद्वार होते. ते म्हणजे पश्चिमेकडच्या इलाही बुरुजातील हत्ती दरवाजा. किल्ल्याचा ताबा घेतल्यानंतर इंग्रजांनी काडतुसे बनविण्याचा कारखाना (बॉंबे आर्टिलरी ॲण्ड लॅबोरेटरी) तिथे सुरु केला.

या लॅबोरेटरीला त्यावेळी 'रॉकेट रुम' असे म्हटले जात असे. तेथील मजुरांना सोयीचे जावे म्हणून सन १८३२ मध्ये कर्नल जेकब यानेहत्ती दरवाजाच्या बरोबर विरुद्ध दिशेला, पूर्वीला असेल्या झुलत्या पुलाचे (चेन सस्पेंडेड ब्रिज) मजबुतीकरण केले. दोन मजबूत साखळदंडांना अडकवलेल्या गजांच्या मदतीने लाकडे फळ्या अंथरु हा पूल तयार करण्यात आला. ४० वर्षापूर्वीपर्यंत हा पूल व्यवस्थित होता. आता मात्र मधल्या फळ्या गायब झाल्या आहेत.

# सलाबतखान मकबरा



'चांदबिबीचा महाल' या नावो ओळखली जाणारी ही वास्तू अहमदनगर शहराचे बोधचिन्ह बनली आहे. वस्तुत: हा सुलताना चांदबिबीचा महाल नसून मुर्तूझा निजामशाहचा मुख्य वजीर सलाबतखान (दुसरा) (जन्म १५१९) याचा मकबरा आहे. सलाबतखान सन १५८९ मध्ये वारला.


पण आपल्या हयातीतच त्याने सन १५८० मध्ये शाह डोंगरावर ही तीन मजली अष्टकोनी वास्तू बांधली. सर्व बाजूने कमानी असलेल्या या इमारतीच्या तळघरात सलाबतखान आणि त्याच्या पत्नीची कबर आहे. दुसरी पत्नी, मुलगा व कुत्र्याची कबर बाहेरच्या बाजूला आहे. या महालाच्या छतापर्यंत जाण्यासाठी भिंतीतून जिना आहे. भिल्ल स्वातंत्र्य सैनिक इंग्रजांविरोधात येथून आंदोलन चालवित होते. या वास्तूच्या प्रेमात पडून सुरुवातीच्या इंग्रज कलेक्टरने निवास स्थान म्हणून या वास्तूचा उपयोग केला. कमानी बुजवून खोल्या तयार करण्यात आल्या होत्या. ब्रिटीश सैनिकांसाठी आरोग्यधाम म्हणूनही या वास्तूचा उपयोग झाला, पण पाण्याची सोय नसल्याने हा प्रयत्न सोडून देण्यात आला. प्रस्तुत छायाचित्र सन १८८० हेन्री कुसेन यांनी काढलेले आहे.

---

# लकडी पूल

अहमदनगर शहर आणि कॅन्टोन्मेंट म्हणजे लष्करी हद्दीला जोडणारा हा पूल म्हणून त्याला 'लिंक ब्रिज' असे नाव देण्यात आले. या पुलाच्या किल्ल्याकडील बाजूस भुईकोट किल्ल्याकडून लष्कराच्या आर्मर्ड कोर सेंटर ॲण्ड स्कूलच्या मुख्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर लकडी पूल आहे. भिंगार नाला ओलांडण्यासाठी ब्रिटीश आमदानीत म्हणजे सुमारे १५० वर्षांपूर्वी हा पूल बांधण्यात आला. दगडी कमानी असलेल्या या पुलाच्या वरच्या बाजूस लाकडी कठडे असल्याने त्याला 'लकडी पूल' असे नाव पडले. नगर शहर आणि कॅन्टोन्मेंट म्हणजे लष्करी हद्दीला जोडणारा हा पूल म्हणून त्याला 'लिंक ब्रिज' असे नाव देण्यात आले.

यापुलाच्या किल्ल्याकडील बाजूस घोड्याच्या नालेच्या आकाराची कमान उभारण्यात आली आहे. तर दुसऱ्या बाजूस सेंच्युरियन रणगाडे ठेवण्यात आले आहेत.



अलीकडेच हा पूल वाहनांसाठी बंद करुन हेरिटेज ब्रिज म्हणून त्याची जपवणूक करण्यात येत आहे. पुलावर गार्डन, लाईटस् लावण्यात आले असून, बसण्यासाठी बाके ठेवण्यात आले आहेत.

पुलाच्या कठड्याच्या मागील बाजूने लष्करी आस्थापनातील अधिकाऱ्यांचे नामफलक लावण्यात आले आहेत. भिंगार नाल्यातील काटवन काढून तेथे आता देखणे उद्यान फुलवण्यात आले असून, अहमदनगरकरांसाठी ते आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

# दमडी मशीद

दगडावरील अप्रतिम कोरीवकाम आणि कॅलिग्राफीसाठी प्रसिद्ध असलेली एकमेव दमडी मशीद भुईकोट किल्ल्यापासून बुऱ्हाणनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. आशियातील आदर्श १० मशिदींमध्ये तिची गणना होते.



निजामशाहीतला सरदार सहेल खान (शेरखान) याने इसवी इस १५६७ मध्ये ही मशीद बांधली. दमडी हे तेव्हाचं नाण्याचं नाव. किल्ल्याच्या बांधकामाच्यावेळी इथे एक फकिर बसत असे. मजुरांनी दिलेल्या दमड्या साठवून त्यातून त्याने ही मशीद बांधली अशीही कथा सांगितली जाते.

या मशिदीची वास्तूरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. मशिदीच्या सपाट छताची व फरशीची रचना जणू आरशात प्रतिबिंब उमटवे अशी एकसारखी आहे. मिनारांवर तसेच दर्शनी भागात कमळाची फुले कोरण्यात आली आहेत. समोरच्या भिंतीत कुराणातील वचनं अरेबिक व पर्शियनमध्ये बेलबुटीसारखी नक्षीत खोदण्यात आली आहेत.

मशिदीतील संगमरवरी दगडावर 'अल्ला आम्हाला विजय मिळवून द्या' असे लिहिलेले आहे. या मशिदीच्या आवारात एक बारव असून त्यात एक थडगे आहे.

परिसरात इतरही अनेक कबरी आहेत. प्रस्तुत छायाचित्र हेन्री कुसेन यांनी सन १८८० मध्ये काढलेले आहे.

---

# मुलूख मैदान तोफ (अहमदनगर)

१४ फूट ४ इंच लांब ११ इंच व्यासाची ही तोफ इतकी अवजड आहे की तिला वाहून नेण्यासाठी १० हत्ती व ४०० बैल लागत. ब्रिटिशांनी १५० रुपयात या तोफेचा लिलाव करण्याचा प्रयत्न केला होता, पण हा लिलाव कमिशनरने रोखला. निजामशाहीच्या उत्तरार्धात ही तोफ प्रथम परांड्याच्या किल्ल्यावर व नंतर दक्षिणेत नेण्यात आली. ही तोफ सध्या विजापूर किल्ल्याच्या शाह बुरुजावर ठेवण्यात आली आहे. या अद्वितीय तोफेची अनेक छायाचित्रे 'इंडिया ऑफिस लायब्ररी'मध्ये आहेत. प्रस्तुत छायाचित्र हेन्री वेलिंग्टन यांनी सन १८६० मध्ये व हेन्री कुसेन यांनी सन १८८० मध्ये काढलेली आहेत.



अहमदनगर हे मध्य भारतातील महत्वाचे लष्करी केंद्र म्हणून ओळखले जात असे. निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमद स्वत: उत्तम लढवय्या होता. गनिमी कावा वापरुन त्याने शत्रूला नमोहरम करीत अनेक गडकिल्ले जिंकले. मलिक अहमदचा मुलगा बुऱ्हाणशाहने निजामशाहीचे वैभव आणखी वाढवले.

त्याच्या काळात सन १५४९ मध्ये मलिक मैदान नावाची ५५ टन वजनाची अेस्त्र तोफ तुर्की सरदार रुमीखान दख्खनी याने अहमदनगरमध्ये गाळली.

तिचे मुख अक्राळ-विक्राळ मगरीच्या उघडलेल्या जबड्याचे आहे. तांबे, लोखंड व जस्ताच्या मिश्रणातून ती तयार करण्यात आली.

# फराहबक्ष महाल



अहमदनगरचे हवामान कोरडे आणि उष्ण, उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून निजामशाही काळात उद्यानात असलेले दोन जलमहल बांधण्यात आले. फराहबक्ष महाल आणि हश्त-बेहश्त महाल ही त्यांची नावे. चौरसाकृती तलावाच्या मध्यभागी असलेली फराहबक्ष महालाची गुलाबी, अष्टकोनी वास्तू पाहून शहाजहानला आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूनंतर ताजमहालाची कल्पना सूचली असे म्हणतात. हा महाल स १५७६ ते १५८३ या दरम्यान बांधण्यात बांधण्यात आला. मुर्तझा निजामशाह याने न्यामखानाला हा महाल बांधण्यास सांगितले.

नंतर सलाबतखान (दुसरा) याने सन १५८३ मध्ये हे काम पूर्ण केले. घुमट, उंच कमानी व मोठी गवाक्षे असलेल्या या इराणी वास्तूशैलीतील दुमजली महालाच्या मध्यभागी रंगमहाल आहे. तिथे नृत्य-गाणी चालत. मध्यभागी तसेच चारही बाजूला कारंजी असून, त्यासाठी खापरी नळाने पाणी आणण्यात आले होते. या महालाच्या परिसरात पूर्वी चिंच, आंब्याची मोठी बाग होती.

गुलाबांचे ताटवे होते. गाणारे पक्षी होते. बादशाह आपल्या राजस्त्रीया व पाहुण्यांसह मौजमजेसाठी इथे येत असे. अकबराचा सेनापती खानखनान अहमदनगरवर स्वारी करण्यासाठी मोगलांची फौज घेऊन आला तेव्हा त्याचा तळ तेथेच होता. लढाईला जात असताना सदाशिवराव भाऊ पेशवे यांनीही फराहबक्ष महालामध्येच मुक्काम केला होता. त्याचे वर्णन उपलब्ध आहे.

प्रस्तुत छायाचित्र हेन्सी कुसेन यांनी सन १८८० च्या सुमारास काढलेले आहे.


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**मे. विजय फर्टीलायर्जस**

सर्व प्रकारचे रासायनिक खते

बि-बियाणे, किटकनाशके व गुळ पावडरचे




**प्रो.प्रा. लक्ष्मीकांत माणिकवार**

मो.९८९०५४९०४६

मेन रोड, उमरगा,

जि.उस्मानाबाद


# आनंद धाम

अहमदनगरची जमीन या भूमीवर जन्मलेल्या अनेक संतांनी पवित्र केली आहे. त्यापैकी एक जैन संत श्री आनंद ऋषिजी महाराज आहेत. पोस्टल विभागातर्फे रु. ४ / आचार्य आनंद ऋषिजी महाराज यांच्या सन्मानार्थ मुद्रांक छापलेले आहे. आचार्य आनंद ऋषिजी महाराज हे असे एक संत होते, ज्यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान त्यांच्या अनुयायांना त्यांच्या अध्यात्मिक मार्गदर्शनाप्रमाणे विपुल व महत्त्वपूर्ण होते. त्यांचा जन्म १९०० साली शिराल चिंचोली, अहमदनगर येथे झाला आणि १३ व्या वर्षी रतन ऋषिजी महाराज यांच्याकडून दीक्षा मिळाली आणि अशाप्रकारे त्यांनी स्वत:ला आध्यात्मिक उपक्रमातील जीवन व मानवतेसाठी सेवा म्हणून आत्मसात केले. त्याच्या शिकवणुकींमध्ये प्रेम, अहिंसा आणि सहनशीलतेमध्ये खोलवर रुजलेली होती. ते नऊ भाषांमध्ये प्रवीण होते आणि त्यांनी मराठी व हिंदी भाषांतून मोठ्या प्रमाणात लेखन केले. त्यांनी अनेक शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांची स्थापना केली आणि अनेक आरोग्य संस्थांची पुनर्रचना केली आणि नियतकालिकांची स्थापना केली. १९६५ साली त्यांना आचार्य हे नाव देण्यात आले आणि १९९२ मध्ये



त्यांचा स्वर्गवास झाला.आनंद धाम त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बांधण्यात आला.


# मुखेड कृषी उत्पन्न बाजार समिती, मुखेड



शेतकरी बांधवांनी आपला शेतमाल मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील मुख्य बाजार पेठेत व उपबजार पेठेतच विक्रीसाठी आणावा..

* शेतकऱ्यांनी शासनाच्या शेतमाल तारण योजनेचा लाभ घेवा.
* शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळेल.
* शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी दररोज लिलाव पध्दतीने केली जाईल.
* शेतकऱ्यांचा शेतमाल चाळणी करून खरेदी केला जाईल. (कटी लावली जाणार नाही.)
* शेतकऱ्यांचा शेतमाल इलेक्ट्रॉनिक काट्यावार वजन केला जाईल.
* शेतकऱ्यांनी शेतमालाच्या पक्या पावत्या आडत्या व खरेदीदार यांचेकडून घ्यावात.

वरील अटीचे व्यापाऱ्याकडून उल्लंघण झाल्यास त्या बाबत लेखी स्वरूपात बाजार समितीकडे तक्रार नोंदव्यावी. त्यातकाळ चौकशी करून बाजार समिती त्या व्यापाऱ्या विरुध्द नियमानुसार कार्यवाही करील.

तमाम शेतकरी शेत मंजूर,व्यापारी,बांधवांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

| ॲड. श्री. खुशालराव पाटील उमरदरीकर | डॉ. व्यंकटराव माणिकराव सुभेदार | योगीराज भिमराव पवार |
|---|---|---|
| (सभापती) | (उपसभापती) | (सचिव) |
| कृषि उत्पन्न बाजार समिती,मुखेड | कृषि उत्पन्न बाजार समिती,मुखेड | कृषि उत्पन्न बाजार समिती,मुखेड |

* सर्व सन्माननीय संचालक मंडळ कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड जि.नांदेड *

# रणगाडा संग्रहालय

अहमदनगर- सोलापूर रस्त्यावर फराह बक्ष महालाजवळ असलेले आर्मर्ड कोअर सेंटर स्कूल ने १९९४ मध्ये उभारलेले हे संग्रहालय म्हणजे अहमदनगर शहराचेच नव्हे तर संपूर्ण देशाचेच भूषण आहे..आशिया खंडातील या एकमेव संग्रहालयात इंग्लंड,अमेरिका, रशिया, जर्मनी, जपान, फ्रांस आदी देशांची ४० पेक्षा जास्त विविध रणगाडे ठेवण्यात आले आहेत.जमिनीत पुरलेले सुरुंग नष्ट करणारे, रस्त्यातले अडथळे दूर करून सैन्याचा मार्ग मोकळा करणरे, पाण्यात तरंगणारे, असे विविध प्रकारचे रणगाडे येथे आहेत. जालियनवाला बाग हत्याकांडात जनरल डायर ने वापरलेले सिल्वर घोस्ट जातीचे चिलखती वाहन येथे ठेवण्यात आले आहे. खऱ्याखुऱ्या रणगाड्या बरोबर त्यांच्या प्रतिकृती आणि छायाचित्रे व लष्करी ध्वज आदींचे येथे प्रदर्शन होते. पाक युद्धात भारतीय सैन्याने नामोहरम केलेल्या रणगाडा येथे आहे. त्याच बरोबर




बंगला युध्यात भारतीय सैन्याने जप्त केलेला पाकिस्तानचा ध्वजही येथे पहावयास मिळतो. बस स्थानकापासून अंतर ५ किमी आहे.







# शनि शिंगणापूर

अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डीजवळ वसलेल्या एक प्रमुख आणि जागृत क्षेत्र म्हणून शनि शिंगणापूर हे संपूर्ण महाराष्ट्नला परिचित आहे. शनी मंदिरामुळे गावाच्या नावात शनी जोडले गेले. अहमदनगरपासून ३० किलोमीटर अंतरावर नेवासे तालुक्यात सोनई गावापासून जवळच शनिचे शिंगणापूर हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथे शनिदेव स्वयंभू पाषाण रूपात विराजमान आहेत. येथे श्रीशनैश्वराचे स्वयंभू जागृत देवस्थान असून शनैश्वराची मूर्ती ५ फूट ९ इंच उंचीची आहे. या मंदिरात असलेला दगडी स्तंभास शनिदेवाची मूर्ती मानली जाते. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी एका पुरात ही शिळा वाहत सोनई गावाजवळ आली. या स्तंभाला तसा वेगळा आकार नाही. त्या रात्री शनिदेवाने एका गावकर्यामला दृष्टांत देऊन 'मामा-भाच्यांनी मिळून माझी स्थापना करा', असा दृष्टांत दिला आणि गावकर्यांनी ती शिळा उभी करून तिची पूजा करण्यास प्रारंभ केला. विशेष म्हणजे हा देव उघड्यावरच एका चौथऱ्यावर आहे. देव आहे पण देऊळ नाही असे या देवाचे वैशिष्ट्य होय. एका व्यापार्याळने नवस बोलल्यानंतर त्याला शनिदेव प्रसन्न झाल्याने त्याने शिळेभोवती चौथरा बांधला आहे. मूर्तीच्या डोईवर वृक्ष पण नाही. नजिकच्या लिंबाच्या वृक्षाची फांदी डोईवर आली तर ती गळून पडते. शनिदेवास निवारा आवडत नसल्याने या पाषाण शिळेवर कोणताही निवारा नाही.



वर्षप्रतिपदा आणि वर्षातील प्रत्येक महिन्याचे चारही शनिवार येथे यात्रा भरते. शनी देवाला खूश करण्यासाठी येथे तेल वाहिले जाते. रोज हजारो लीटर तेल शनिदेवाला अर्पण केले जाते. शनि अमावास्या व गुढीपाडवा या दिवशी येथे मोठी यात्रा असते. शनि जयंतीस (वैशाळी अमावस्या) येथे उत्सव साजरा होतो.

आख्यायिका :

या स्वयंभू मूर्तीबद्दल अनेक आख्यायिका भाविकात प्रचिलित आहेत. येथील कथाही रोचक आहे. शनी देव येथेच वास्तव्य करतात, असे मानले जाते. त्यामुळे येथे चोरी होत नाही, असे सांगितले जाते. त्यामुळे गावातील घरांनाही कुलपे नाहीत. एवढ्या वर्षांत घरातून कधी एक खिळाही चोरीला गेलेला नाही, असे येथील लोक गौरवाने सांगतात.

या लहानशा गावाची लोकवस्ती सुमारे ३००० असेल पण येथील घरांना दरवाजे नाहीत याचे आश्चर्य वाटते. शनीच्या या नगरीची रक्षण खुद्द शनी देव करतात असे लोक मानतात. चोरी केल्यावर,कोणीही चोर या गावाची सीमारेषा जिवंत अवस्थेत पार करूच शकत नाही असेही सांगितले जाते. तेथे चोरी केल्यास अंधत्व येत असल्याची आख्यायिका भाविकांमध्ये प्रचलित आहे. येथे पर्यटक मोठ्या संख्येने असतात. अगदी जगावेगळे असलेले हे देवस्थान चमत्कारांमुळे खूप प्रसिद्ध पावले आहे.

येथील मंदिरात दर्शनाचे नियम अतिशय कडक आहेत. देव दर्शन दिवसातून कोणत्याही वेळेस घेता येते. शनी बाल ब्रह्मचारी असल्याने महिला दूरूनच दर्शन करतात. स्त्रियांना मात्र चौथऱ्यावर जाऊन दर्शन घेण्यास मनाई आहे. दुरून दर्शन घेता येते. दर्शनापूर्वी आंघोळ करून शुचिर्भूत होणे आवश्यक असते. आंघोळीची व्यवस्था देवस्थानाच्या आवारात कायम आहे.

पुरुष स्नान करून, ओल्या कपड्यांनीच दर्शन घेतात. त्यानंतर शनीच्या मूर्तीवर तीळाचे तेल वाहून प्रदक्षिणा घालतात. दर्शन घेतल्यानंतर भाविक तिथे असलेल्या दुकानातून घोड्याची नाल तसेच काळ्या कपड्यांनी बनलेली शनी देवाची बाहुली खरेदी करतात. घोड्याची नाल घराच्या बाहेर लावल्याने दृष्ट लागत नाही, असे मानले जाते. शिवाय घरात सुख-समृद्धी नांदते.

# निसर्गाची एक सुंदर देणगी : दाभोसा धबधबा



एक उत्तम निसर्ग सौंदर्य लाभलेला असा हा पालघर जिल्हा .जिथं मुंबई , गुजरात सारख्या ठिकाणांहून पर्यटक वर्षभर इथं विकेंड चा आनंद लुटण्यासाठी येत असतात .आणि पावसाळ्यात तर इथं धबधब्यांचा आनंद लुटण्याची मजा काही औरच .

मुंबई पासून १५० किमी अंतरावर असणारा तसेच जव्हार पासून २० किमी अंतरावर असणारा सुमारे ३०० फूट उंचीवरून कोसळणारा आणि जव्हार चं वैभव असलेला हा सुप्रसिद्ध दाभोसा धबधबा .पालघर जिल्ह्यातल्या जव्हार तालुक्यात हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत कड्यांवरून कोसळणारा हा धबधबा पाहून खरोखरच अनोखा अनुभव येतो .या कोसळणाऱ्या धबधब्याचा आवाज कानांत गुंजतो .

जव्हार - सिल्वासा मार्गारवर जव्हार पासून साधारणतः २० किमी वर असलेला ह्या धबधब्याचं डोह बरच खोल असून त्याच पाणी ३०० फूट खोल एका डोहात पडत .हे दृश्य पर्यटकांना अगदी मोहून टाकत .

या डोहात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत .मात्र पायऱ्या ह्या संपूर्ण पणे खचल्या असल्यानं जरा संभाळूनच उतरावं लागतं . कश्याबश्या तुटक्या पायऱ्या असल्यानं खाली उतरण्यासाठी मात्र पर्यटकांना बरीच कसरत करावी लागते . पावसाळ्यात ह्या तुटक्या पायऱ्यांवरून पाय घसरण्याची शक्यता जास्त आल्यानं सावधानता बाळगावी लागते . कारण सतत च्या पावसामुळे ह्या पायऱ्या ओल्या असतात . त्यामुळे ह्या डोहाच्या पायऱ्या उतरताना जरा जपूनच .



ट्रॅकिंग ची आवड असणाऱ्या पर्यटकांसाठी तर हे उत्तम ठिकाण . मोठ्या रस्सी च्या मदतीनं ही ह्या डोहात उतरता येतं . काही हौशी पर्यटक हे रस्सी च्या साहाय्यानं भल्या मोठ्या दगडांवरून डोहात उतरतात . मात्र सुरक्षेच्या दृष्टीनं इथं कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीयेत . म्हणून ज्यांना सवय आहे किंवा यातला अनुभव आहे त्यांनीचं हा पर्याय निवडावा.

निसर्गाच्या कुशीत असलेल्या सुंदर दाभोसा धबधब्याला पावसाळ्यात बरीच पसंती आहे . पालघर जिल्ह्यासह मुंबई , गुजरात हुन ही पर्यटक मोठ्या प्रमाणात इथं आपल्या कुटुंबासहित येतात . सद्या सेल्फी चं वेड सर्वांनाचं .त्यामुळे इथं वरून किंवा डोहजवळ जाऊन सेल्फी घेण्यात चं पर्यटक गुंगून गेलेले दिसून येतात .इथं जायचं जायचं झाल्यास स्वत:ची वाहनं , कार आदी घेऊन जाणच उत्तम .कारण मुख्य रस्त्यावरून बऱ्याच अंतरावर हा धबधबा आहे . अशा इथल्या हिरव्यागार, सुंदर , निसर्गरम्य वातावरणात एकदा आल्यानंतर पुन्हा परतण्याचं मनचं होत नाही .

- निता चौरे,
पालघर, मो.९६३७९८६६००

# केळव्याचा सुप्रसिध्द समुद्र किनारा (केळवे बीच)

उन्हाळा सुरु झाला , विकेंड असला की साहाजिकच आठवण येते ती समुद्रकिनाऱ्यांची... पालघर जिल्ह्याला ही समुद्रकिनाऱ्यांची देणगी लाभली आहे. मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यां व्यतिरिक्त इतरत्र समुद्र किनारे सांगायचे झाले तर ते आहेत पालघर जिल्ह्यात .वसई पासून ते बोर्डी पर्यंत समुद्र चं समुद्र किनारे...

पालघर जिल्ह्यातला चं असाचं एक सुंदर समुद्र किनारा म्हणजे केळव्याचा समुद्रकिनारा..हा जिल्ह्यातला एक प्रसिद्ध बीच असून केवळ जिल्ह्यातूनच नव्हे तर मुंबई तले ही पर्यटक या केळवे बीच ला पसंती देतात . त्यामुळे वर्षभर इथं पर्यटक मनसोक्त आनंद लुटण्यासाठी येत असतात . उन्हाळ्यात आणि विकेंडला तर इथं मात्र बरीच गर्दी असते .

या बीच ची आणखी खासियत म्हटली तर ते म्हणजे किनाऱ्याजवळच असणारं शीतलादेवी मातेचं प्राचीन मंदीर व इथं असणारा प्राचीन किल्ला . शितलादेवी मातेची पौराणिक आख्यायिका असल्यानं हे मंदिर बरच प्रसिद्ध आहे . नवरात्रोत्सवात तर इथं भाविकांची मोठी गर्दी असते.त्यामुळे समुद्र किनाऱ्यावर देखील लोकांची रेलचेल सुरच असते . म्हणूज जर विकेंड ला फिरायचा बेत आखत असाल तर एकदा केळवे बीच ला नक्की भेट द्या . आणि किल्ला त्याचबरोबर मंदिर पाहणं मात्र विसरू नका .

इथं जायचं झालं तर पश्चिम रेल्वेच्या विरार रेल्वे स्थानका हुन किंवा चर्चगेट , मुंबई सेंट्रल , बांद्रा आदी रेल्वे स्थानकांवरून डहाणूकडे जाणारी ट्रेन पकडून 'केळवे रोड' या रेल्वेस्थानकावर उतरून वेस्ट ला स्टेशन बाहेर असणाऱ्या टमटम ,मॅजिक किंवा बस पकडून जाता येत . पालघर रेल्वेस्थानक वर उतरुनही इथं जात येत .पालघर वरून बऱ्याच टमटम, मॅजिक दररोज या बीच वर सुरू असतात . त्यामुळे जाण्या येण्यासाठी वाहनांची कमी नाही .

वाहन ही मंदिरासमोरच घेऊन थांबतात . इथं उतरून मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यास डावीकडे मुख्य मंदिर असून मंदिरात शेंदूर लावलेली शितला देवी ची अतिशय सुंदर अशी मूर्ती आहे .तर उजवीकडे सुंदर असं रामकुंड दिसून येत . यातलं पाणी अगदी स्वच्छ .आणि या पाण्यात छोटे मोठे मासे नी कासवं पर्यटकांना , भाविकांना लहान मोठ्या अशा सर्वांनाचं आकर्षित करतात . सेल्फी काढण्यासाठी तर हा अगदी परफेक्ट स्पॉट .

मंदिरा समोरूनच किनाऱ्याकडे जाण्याचा रस्ता आहे .. मग दिसतो तो शांत , सुंदर मोठा असा समुद्र किनारा. उंचच्या उंच सुरुच्या झाडांखाली बसून समोरचा अफाट समुद्र पाहणं मनाला एक वेगळाच आनंद देऊन जातो.घोडा गाडीत बसून किंवा उंटावर बसून या लांबच लांब बीच ची मनसोक्त सैर ही करता येते . किनाऱ्यावर बरीच खाद्य पदार्थांची दुकानं असून आजूबाजूच्या परिसरात शाकाहारी - मांसाहारी जेवणासाठी हॉटेल्स ही आहेत . इथं राहून बीच ची मजा घ्यायची झाल्यास रिसॉर्ट चा पर्याय उपलब्ध आहे . केळवे गावात बरीच रिसॉर्ट असल्यानं या समुद्रकिनाऱ्या मूळे इथल्या लोकांना चांगला रोजगार मिळाला आहे . इथून सूर्यास्ताचं दृश्य पाहण्याची मजा तर काही औरचं .तर असा हा केळव्याचा मोठा , सुंदर मनमोहून टाकणारा असा समुद्र किनारा पाहता इथून पाय निघता निघत नाहीत .

- निता चौरे,
पालघर, मो.९६३७९८६६००



# नवसाला पावणारी डहाणूची महालक्ष्मी माता

पालघर जिल्ह्यातल्या डहाणूतलं सुप्रसिद्ध महालक्ष्मीचं मंदिर .जे पालघर जिल्ह्यातल्या डहाणू तालुक्या मधल्या मुंबई - अहमदाबाद महामार्गालगत वसलेलं आहे .हे एक जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे .हे पांडवकालीन जागृत देवस्थान असल्याचं सांगण्यात येत.



या महालक्ष्मी च्या मंदिराची ठाणे गॅझेट मध्ये नोंद असून याला पांडव कालीन इतिहास आहे . महालक्ष्मी माता कोल्हापूर हुन सूरत ला जात असताना महालक्ष्मी नं इथं वास्तव्य केलं होतं अशी दंत कथा आहे . हे जागृत देवस्थान असल्या कारणानं भाविकांची इथं नेहमीच मोठी रिघ लागलेली असते .नवसाला पावणारी देवी अशी या महालक्ष्मी महती आहे.या मंदिरात केवळ पालघर जिल्ह्यातले चं नव्हे तर राज्यासह गुजरात आणि राजस्थान वरून ही मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात.

मंदिरात महालक्ष्मी मातेची एक भव्य दिव्य सुंदर अशी मूर्ती आहे .देवीचा सुंदर साज आणि मुख पाहून मन अगदी आंनदीत होऊन जातं .एक प्रसन्न वातावरण चं निर्माण होऊन जातं .

हनुमान जयंती पासून म्हणजेच चैत्र शुद्ध पौर्णिमेपासून ते अमावस्येपर्यंत इथं पंधरा दिवसांची भव्य अशी यात्रा देखील भरते .हे जागृत देवस्थान असल्या कारणानं या पंधरा दिवसांच्या यात्रेच्या काळात भाविक मोठ्या प्रमाणात इथं हजेरी लावतात. नवरात्रोत्सवा दरम्यान ही भाविकांची या मंदिरात बरीच गर्दी असते .लांब लांब हुन भक्त इथं दर्शनासाठी , आपला नवस फेडण्यासाठी साठी येत असतात .डहाणू च्या महालक्ष्मी मातेचं हे देवस्थान पालघर जिल्ह्यात बरच प्रसिद्ध आहे .

- निता चौरे,
पालघर, मो.९६३७९८६६००

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

सत्यमेव जयते शेतकरी गट

अंतर्गत सत्यमेव जयते कृषी सेवा केंद्र

अध्यक्ष सेक्रेटरी सर्व सभासद

महादेव मंदीर, उमरगा, जि.उस्मानाबाद

# डिघोळचे रेणुका माता तिर्थक्षेत्र





गेली अनेक पिढ्यांपासुन ऊस पावसाचा मारा झेलत ताट मानेने ऊभे असलेल्या डिघोळ येथील ऊंच डोंगरावर हेमाड पंथी मंदिरामध्ये वेगवेगळ्या नांवाने संबोधल्या जाणाऱ्या तिन देवीं विराजमान झालेल्या आहेत. भक्ताच्या हकेला धावनाऱ्या या देवीची संपुर्ण महाराष्ट्राच्या काणाकोपऱ्यात ख्याती असुन नवसाला पावनारी डिघोळ येथील रेणुका माता, दसरा व चैत्र वद्य अष्ठीमीला भक्तांच्या आगमनाची आतुरतेने वाट पहात असते.या निसर्ग रम्य वातावरणातील गोदाकाठच्या कुशीत वसलेल्या डोंगरावरील मंदीर परिसरामध्ये, प्रसन्नतेचा आनंद घेण्यासाठी वर्षभर येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात.

परभणी जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर सोनपेठ तालुका आहे.या तालुक्यातील डिघोळ देवीचे म्हणून एका गांव संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.बारा ज्योतिर्लींगा पैकी बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ हे एक ज्योतिर्लींग असुन वैजनाथ येथे दर्शनासाठी येणारे बहुतांश भावीक हे डिघोळ येथील रेणुका मातेच्या दर्शनासाठी येत असतात.परळी येथुन सोनपेठ कडे जाणारा रस्ता या पर्यटक स्थळाकडे घेऊन जातो. परळी ते सोनपेठ मार्गावर १५ की.मी. अंतरावर उत्तरेला एक सिमेंट रस्ता लागतो त्या रस्त्याने पुढे २.५ किमी वर गेल्यास डोंगर माथ्यावर सुबक व अकर्षक असे देवीचे मंदीर आहे.मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात माहुर गडची रेणुका माता व राणिसावरगांवची राणुबाई या दोन देविंचे पाषाणी मुखवटे विराजमान असुन बाहेरील सभामंडपात उजव्या बाजूला तुळजापुरच्या तुळजाभवानी मातेची मुर्ती स्थानापन्न आहे. तर सभामंडपाचे प्रवेश द्वाराला दोन्ही बाजुस टाळोबा आणि टोळोबा हे दोन देविंचे रक्षक मुर्ती स्वरुपात स्थानबद्ध आहेत.तसेच बाजुस मारोती व मंदिराभोवती ईतर वेगवेगळ्या देवतांच्या मुर्त्या आहेत. रेणुका माता,राणुबाई व तुळजा भावानी या तिन मुख्य देविंचे उपपीठ असलेल्या स्थळास त्रिपीठी देवी नावानेही ओळखले जाते. मंदिराचा गाभारा व मुख्य सभामंडप हा संपुर्ण पाषाणी असुन तो हेमाडपंथी सुबक कलेने नटलेला आहे. या मंदिरामध्ये ईसविसन १९ व्या शतकात समर्थ रामदास स्वामी यांनी देविंची स्थापना केली असल्याचे पौराणीक लोक सांगतात.मंदिराच्या जवळ २ किमी पर्यंत एकही गांव किंवा वस्ती नाही.त्यामुळे ईथे नवरात्र व चैत्र तेलधुनी यात्रा वगळता ईतर दिवशी रात्रीचं मुक्कामाला कोणीही थांबत नाही. रात्र होताच पुजारी मंदीर बंद करुन गांवाकडे जातो व सकाळी पुन्हा मंदीर उघडून देविंची पुजा आरती करत असतो.जमीन सपाटीपासुन ३५० फुटापर्यंतच्या ऊंच एका पर्वतावर हे मंदीर विराजमान असुन येथील परिसर वेगवेगळ्या वृक्षांनी आयुर्वेदीक वनस्पतीनी नटलेला आहे. मंदिराच्या समोर एवढ्या उंचीवर एक पाण्याचा हातपंप आहे. आजपर्यंतच्या भर दुष्काळातही या हातपंपाचे पाणी कधीच बंद झाले नाही.हा देवीचाच एक चमत्कार असल्याचे भावीक सांगतात. चैत्र वद्य अष्ठीमीला तेलधुनी नांवाने येथे सुप्रसिद्ध यात्रा भरते.यावेळी दुरवरुन भावीक मिळेल त्या वहानाने मातेच्या दर्शनासाठी येतात. साधारणता अठवडाभर तेलधुनी यात्रा भरते. तसेच दसऱ्यामध्ये दहा दिवस येथे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते.दसऱ्यामध्ये दररोज दिवसभर येथे अन्नदान , होम हवन,देविंच्या गाण्याचा जागरन गोंधळ,आराधी मेळा आसे विविध कार्यक्रम होत असतात. गेली आणेक वर्षांपासून केलेल्या पाठपुराव्यामूळे या मंदिरास शासनाने पर्यटक दर्जा दिला असुन मिळणाऱ्या शासन निधीतून येथील आणेक महत्वपूर्ण विकासकामे मार्गी लागत आहेत.येथील पाषाणी ओवऱ्या,डिकमाळी, दगडी सभामंडप, मंदिराच्या समोर असलेले दोन देविंचे कल्लोळ हे प्राचीन व सुबक कलेचे प्रतीक आहेत.त्यांची होणारी झीज

पहाता पुरातत्व विभागाने याकडे विशेष लक्ष देऊन डागडुगी करण्याची गरज आहे.समोरील बाजुला दलीतांची आई नांवाने एक मंदीर आहे.दर्शनासाठी येणारा प्रत्येक भावीक येथील दलीतांच्या आईचे दर्शन घेतो.परंतु या मंदिराच्या भिंतींची पुर्णता पडझड झाली आहे.या मंदीराचीही डागडुगी करणे महत्त्वाचे आहे.मंदिरापासुन कांही अंतरावर खोकलाई,पोटदुखी आशा देवतांच्या पाषाणी मुर्ती आहेत. आशा प्रकाच्या व्याधी असणाऱ्यांनी या देवतांचे दर्शन घेतल्यानंतर पोटदुखी व खोकल्यासारखे दुर्धर अजार बरे होतात आसे सांगितले जाते. पुर्वी मंदीर परिसरामध्ये निवरा नव्हता. त्याकाळी येथे भक्तांना रहाण्याची सोय म्हणुन संपुर्ण दगडी ओवऱ्या (लादनी) बांधलेल्या आहेत. परंतू आता त्यांचीही झीज सुरु आहे. सध्या या मंदिरास पर्यटण स्थळाचा शासन दर्जा मिळाला असुन,प्रत्येक वर्षी येणाऱ्या शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास निधीतून येथील परिसराचा विकास होतांना दिसत आहे. या माळराणावर येथील अंबादास पुजारी, ग्रामस्थ,वेगवेगळ्या समाजसेवी संस्था,वृक्ष प्रेमी,वृक्ष मित्र महेश जाधव व त्यांचे सहकारी आदिंजन वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष रोपन करुन या डोंगराला अकर्षक बनविण्याचे कार्य करत आहेत.मंदिराचे पावित्र्य टिकून ठेवणे, मंदिर व परिसर सुशोभिकरण आणि देविच्या सदैव सेवेचे कार्य डिघोळ येथील कै.बाजीराव देशमुख यांचे वंशज विजयकुमार देशमुख,रमाकांत देशमुख,अन्नासाहेब देशमुख,रंजित देशमुख हे संपुर्ण देशमुख घराने करत आहेत.या निसर्गरम्य ठिकाणी फेरफटका मारण्यासाठी वर्षभर आणेक पर्यटक येत असतात.तर देविचे भक्तगण येथे येऊन आपल्या मनोमनीच्या ईच्छा पुर्ण व्हाव्यात यासाठी नवस बोलुन देवीसमोर नतमस्तक होतात. व ईच्छा पुर्ण होताच पुन्हा नवस फेडण्यासाठी येथे येतात. त्यामुळे या स्थळास नवसाला पावनारी डिघोळची आई असेही म्हटले जाते. या ठिकाणी भाविक व पर्यटकांचा वाढता ओघ असला तरी या स्थळापर्यंत ये-जा करण्यासाठी आजही मजबूत रस्ता नाही. इथपर्यंत ये-जा करण्यासाठी तिन किलोमीटर अंतराचा मजबूत रस्ता व्हावा हि मागणी गेली आणेक वर्षांपासून भक्तगणांतून केली जात आहे.

-बाबासाहेब गर्जे
तालुका प्रतिनिधी,
सोनपेठ.जि. परभणी


राजधानी हायवेय सर्व्हिसेस

इंडियनऑयल
IndianOil

न्यु बायपास रोड,उमरगा
ता उमरगा,जि उस्मानाबाद




दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

# वर्धा, समुद्रपूर तालुक्याने पर्यटक दृष्टीने टाकली कात

वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर तालुक्याची ख्याती पर्यटनाच्या दृष्टीने कात टाकत आहे. तालुक्यातील वनवैभव,तलाव प्रकल्प,टेकड्या,संतांचे वास्तव्य,स्मृती स्थळे, मंदिर,दर्गा आदी वैभव पर्यटकांना खुणावणारे आहे.

जिल्ह्याच्या टोकाशी असलेला समुद्रपूर तालुका चंद्रपूर आणि नागपूर जिल्हा सीमेला जुळलेला आहे.भारताला काश्मीर ते कन्याकुमारी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.७ तालुक्यातून जातो.यामुळे तालुक्यातला पर्यटन दृष्टीने महत्व वाढीस लागले आहे.

- समुद्रपूर तालुका भौगौलिक दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| भौगोलिक क्षेत्र | ९१८२४ हेक्टर |
| गावे | २२२ |
| लोकसंख्या | १ लाख १६ हजार ९९१ |
| जंगल | ३२५६ हेक्टर |

- तालुक्यात जाणारे मार्ग

उमरेड हिंगणघाट
चंद्रपूर नागपूर
चिमूर हिंगणघाट
वर्धा उमरेड

## गिरडवाशी जपताहेत संतांच्या पावण इतिहासाचा वारसा :

जिल्ह्याच्या टोकाशी असलेल्या समुद्रपूर तालुक्यातील गिरड गावाची ओळख महाराष्ट्राच्या इतिहासात संतभूमी म्हणून केली जाते.गिरड येथील निसर्गरम्य टेकडी परिसर आणि शेजारी असलेला वैविध्यपूर्ण जंगल पर्यटकांना खुणावनारा आणि जणू भाविकांनाही भुरळ घालणारा आहे.शिवाय गिरड भूमीत वास्तव्यास राहालेल्या संताच्या स्मृतींना उजाळा देणारा आहे. याची प्रचीती टेकडीवरील बाबाफरीद दर्खाह, गावातील प्राचीन श्रीराम मंदिर, जगन्नाथस्वामी मंदिर, गाडगेबाबा मंदिर, पायऱ्याची विहीर, चोरवीरा, साखरबाहुली, माता मंदिर, सतीमाता मंदिर, शिव मंदिर, सोनामाता मंदिर आदी संतांच्या वास्तव्यातील स्थळाला दर्शनासाठी भाविकांची आणि पर्यटकांची वर्षानुवर्ष पर्वणी असते.

गिरड गावात अकरा हजार पाचशेचा जनसमूह वास्तव्यास आहे. यात मुस्लीम, हिंदू, बौध्द आदी समाजातील नागरिक कौटुंबिक वातावरणात एकात्मतेने आणि गुणागोविंदाने नांदतात. हेच गिरड गावाचे वैशिष्ट सर्वकष ओळखीचे आहे. येथील बाबा फरीद टेकडी ६६ हेक्टर जागेत विस्तारलेली आहे. टेकडीची उंची साधारणता १०९ मीटर असून समुद्र सपाटीपासून ३६९ मीटर उंची आहे. या टेकडीवरील दर्गा आणि सुरक्षा भिंतीचे बांधकाम भोसलेकालीन आहे. बांधकामासाठी चुना, बेल, रेती, विटा, दगडांचा वापर केला आहे.

येथील टेकडीवर ७७२ वर्षापूर्वी सन १२४४ मध्ये सुफीसंत बाबा फरीद गिरड गावात तपचर्या करण्यास आले. दरम्यानच्या काळात सध्याच्या गिरड सिर्सी मार्गावरील कुबडीचिंच, साखरबाहुली, टेकडी हे ठिकाणे बाबा फरीदांच्या साधनेचे आणि वास्तव्याचे असल्याचा उल्लेख संशोधन शिंपले भाग ३ भोसले कालीन नागपूर या पुस्तकात आहे.

सज्ज्नगडापासून अयोध्येला प्रभू रामचंद्रांच्या दर्शनाकरिता पदयात्रेने १६५० मध्ये निघालेल्या समर्थ रामदासस्वामींचा हिंगणघाट येथिल वणा नदीच्या किनाऱ्यावर हनुमान मंदिर परिसरात तीन दिवसाचा मुक्काम होता.यावेळी हिंगणघाट वरून गिरड येथे आल्यावर तब्बल सव्वा महिणा गिरड येथील श्रीराम मंदिरात मुक्कामी होते.या काळात सिरसी मार्गावरील शिवकुमार दीक्षित यांच्या शेतात रामदास स्वामींनी हनुमान मंदिराची स्थापना केली. येथील हनुमान मंदिर अद्यापही असून या मंदिराचे जीर्ण उद्धार करण्याची गरज आहे. १६५० या वर्षात रामदास स्वामी गिरड येथे राममंदिरात सव्वा महिन्याच्या मुक्कामी असतांना यांच्या स्मृती जागवित सज्ज्नगडावर राहणारे अनुयायी १९९० पर्यंत गिरड येथील राममंदिरात यायचे.या मंदिरात मुक्कामी राहून दासबोधाचे पारायण करायचे.काही काळानंतर हि परंपरा बंद पडली.स्वामी रामदास गिरड येथून रामटेक मार्गाने मध्यप्रदेशातील सानगुढी मार्गाने अयोध्येला गेले.

रामदास स्वामींच्या पावन वास्तव्याने येथील श्रीराम मंदिराच्या इतिहासाच्या वैभवात भर

पडलेली आहे.या इतिहासाची नोंद संशोधक चितळे आणि साहित्यिक म.ना.घाटूर्ले यांनी ऐतिहासिक दस्तायेवजात केली आहे. सन १९५४ आणि १९५६ साली संत गाडगे महाराज गिरड येथे आले.या कालखंडात श्रीराम मंदिरात आणि सार्वजनिक ठिकाणी मुक्कामी होते. या काळात गावात कीर्तनाच्या माध्यमातून जनजागर, खराटयाने रस्ते झाडून स्वछतेचा संदेश दिला. गिरड गावाच्या परिसरात रात्रीचे कीर्तनातून समाजप्रबोधन केले. येथील वास्तव्याच्या प्रीतर्थ संत गाडगेबाबा देवस्थानची उभारणी करण्यात आली आहे. शिवाय दरवर्षी पुण्यतिथी मोहत्सवानिमित्य यात्रेचे आयोजन केल्या जाते.

सन १९६१ ते १९६५ या कार्यकाळात येथील रामजन्मोत्सवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सहभागी झाले होते. चंद्रपूर जिल्यातील गोंदूडा, रामदेगी, नेरी येथील जंगलात साधनेसाठी जाणेयेणे करायचे. यावेळी श्रीराम देवस्थानात काही दिवस मुक्कामी होते. या काळी श्रीराम मंदिराचे मठाधिपती म्हणून रुजू होण्याचा आग्रह नागरिकांनी केला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी नागरिकांची विनंती नाकारून  गुरुकुंज आश्रमाला पसंती दिली. गिरड गावाला संत परंपरा लाभल्याने धार्मिक,सामाजिक वातावरण सामाजिक शिलता जोपासणारे आणि राष्ट्रहित प्रेरित करणारे असल्याची प्रचीती येते.

## चैत्रात फुलते भक्तांचा मेळा :

येथील श्रीराम जन्मोत्सव आणि टेकडीवरील फरीद बाबा दर्ग्यावरील चैत्रात भक्तीचा मेळा फुलला जातो. बाबाफरीद टेकडीवरील भोसलेकालीन दर्ग्याची निर्मिती,



दगडांनी बांधून असलेला तलाव, टेकडीच्या कडा आणि उंचावरून दिसनारे मनमोहक दृश्य पर्यटकांना आणि भाविकांना भुरळ घालते. श्रीराम जन्मोत्सवात आलेले श्रद्धाळू श्रीराम जानकीचे दर्शन घेतल्यावर भाविक



टेकडीवरील बाबा फरीद दर्ग्यावर दर्शनासाठी जातात. येथील उत्सव गुडीपाडव्यापासून ते हनुमान जयंती पर्यंत चालतो. गिरड नगरीत चैत्र महिन्यात भक्त जनाचा मेळा फुलल्याची प्रचीती येते.

## गिरड टेकडीला पर्यटक दर्जा :

टेकडीवरील बाबा फरीद दर्गावर दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची गैरसोय होवू नये याकरिता पर्यटन विकासासाठी शासनाने पर्यटन 'क ' दर्जा दिला आहे. मात्र स्थानीय परिस्थिती लक्षात न घेता विकास कामे करण्यात येत असल्याचा आरोप दर्गा समितीने केला आहे. आवश्यक कामांना प्राधान्य दिल्या गेल्यास पर्यटकांना आणि भाविकांना सोयीचे होईल .मात्र शासन आपल्या पद्धतीने करीत असलेल्या कामाची उपयोगिता फारशी नसल्याची खंत दर्गा समिती व्यक्त करीत आहे. पर्यटक विकासात पुरातन मंदिराचा समावेश करा संतांच्या वास्तव्यातील गिरड नगरीतील मंदिर आणि सामाजिक स्थळांचा विकास पर्यटक विकास आराखड्यातून करावा अशी भावना विविध संस्था आणि देवस्थानच्या विश्वस्थांची आहे.शिवाय गावाच्या विकासात देखील पर्यटन विकास निधीतून विकास कामाला चालना द्यावी अशी मागणी स्थानीय ग्रामप्रशासनाची आहे. गावातील धार्मिक स्थळांकडे जाणारे मार्ग, नाल्या, रस्त्यावर दिवे, गावात सांकृतिक

भवन, क्रीडांगण, वाचनालय, पार्क, चौकाचौकात मुत्रालय, शौचालय, चौकांचे सौन्द्रीकरण आदी विकास कामे गिरडच्या विकासासाठी महत्व पूर्ण आहे.

## सर्वधर्म समभाव आणि एकात्मतेचे प्रतिक बाबा फरीद दर्गा:

सर्वधर्म समभाव आणि एकात्मतेचे प्रतिक असलेला टेकडीवरील बाबा फरीद दर्गा संपूर्ण भारतात सुप्रसिद्ध



यात्रा स्थळ मानल्या जातो. येथील दर्ग्याला पुरातन इतिहास लाभलेला आहे. तसे ऐतिहासिक संदर्भ विविध ग्रंथात आहे. सुफी संत बाबा फरिद सर्वधर्मियांचे दैवत मानले जाते. बाबा फारीस दर्ग्यावर चैत्र महिन्यात मोठी भाविकांची रीघ लागते. शिवाय मोहरम निमित्त उर्स साजरा करण्यात येतो.

काबूलचे राजे फारुखशहांचे वशंज बाबा फरीद होते. बाबा फरीदांच्या आईचे नाव बिबी करसुम आणि वडिलांचे नाव शेख सुलेमान फातेहा होते. यांना पाच मुले आणि ३ मुली असे एकूण ८ आपत्य होते. शेख फरीद यांचा जन्म ११७३ साली मुलतान जवळ खेतवाल ठिकाणी झाला. यावेळी फरीदुद्दिन अतार या सुफिने फरीउद्दीन असद असे ठेवले यामुळे फरीद असे नाव पडले.

फरीद बाबांना शिरणी, गडी साखर, डाळिंबाचे दाने खाण्याची सवय होती. मातीला स्पर्श केल्यास ती साखरेसारखी गोड वाटायची अशी अख्यायिका आहे. शिवाय खोटे बोलणाऱ्या व्यक्तीचा फरीद बाबा राग करायचे. शब्बीर हुसेन चित्सी निजामी लिखित बाबा गंजेश्वर या पुस्तकात संदर्भ देण्यात आले आहे.

बाबा फरीदांचे प्राथमिक शिक्षण खेतवाल येथे झाले.उच्च शिक्षणाकरिता मुलतान येथे पूर्ण केले. येथे बाबांनी अन्नफेह या ग्रंथाचे अध्ययन केले. यावेळी हजरत कुतूबद्दीन बख्तीयार काकी यांना गुरु म्हणून स्विकारले. दरम्यान इराक मध्ये उर्वरित शिक्षण पूर्ण केले. इस्लामी धर्म विधाने, न्याय शास्त्र, दर्शन शास्त्र, याविषयी जगाला ओळख करून दिली. इराक मधील बगदाद शहरात हजरत गौसूलआजम यांच्या समाधी बांधकाम केल्यावर मजुरी नाकारून फरीद बाबा निघून यायचे. हजरत कुतुबुद्दीन बख्तियार काकी यांच्या मृत्यू वेळी बाबा फरीद हासी येथे होते. त्यांच्या मृत्युच्या तिसऱ्या दिवशी दिल्लीत आले. गुरूच्या मृत्यू प्रत्रानुसार बाबा फरीदानी गुरूचा फोषक परिधान करून उत्तरधिकारी म्हणून पुढे कार्य केले.

बाबा फरीदांचे पंजाबी भाषेत श्लोक लोकमान्य आणि रूढ आहे. सैरूल औलिया या पुस्तकातील संदर्भात बाबा फरीद सुफी पंथामध्ये कठोर तपश्चर्या करणारे असल्याचा उल्लेख आहे. तर गंजेशकर या पुस्तकात बाबा फरीदांनी विहिरीत दोराने उलटे लटकून तपश्चर्या केल्याचे संदर्भ आहे.

राजे नसिरुद्दीन महेमूद, मंत्री गयासुद्दिन बलबन सैनिकासोबत बाबा फरीदांच्या दर्शनाकरिता अजोधनला गेले. आणि या राजाने बाबा फरीद यांना ४ गावाची जागीर काही नगद दिनार बाबांना सोपविला. बाबा फरीद यांनी जागीर राजाला परत केली आणि दिनार गरजूंना वाटून दिली.

संशोधन शिंपले भाग तीन भोसले कालीन नागपूर या पुस्तकात सेना धुरंधर मुधोजी भोसले, यांनी आजारपणात गिरड येथील बाबा फरीद यांचे चील्लाह चा नवस



केला. आजार बरं झाल्यावर नवस फेडण्याकरिता जुलै १७८३ मध्ये मुधोजी, दुसरे रघुजी,खंडोजी व व्यन्कोजी भोसले दोन हजार स्वारांना घेवून गिरड येथे तीन दिवसाचा मुक्काम करून नवस फेडला. भोसले नरेशांची बाबा फरीदांवर अढळ श्रद्धा होती.

बाबा फरीद एका चिंचेच्या झाडाखाली तपश्चर्या करण्यास बसले असता रस्त्याने चाललेल्या किराना घेवून चाललेल्या व्यापाऱ्याला बाबा फरीदांनी बंदीत काय घेवून चालला अशी विचारना केली असता व्यापारी चोरांचा सरदार असल्याचे समजून खोटे बोलला. यात दगडे भरलेली आहे असे सांगितले. यावर फरीद बाबांनी आपकी जुबान आपको मुबारक हो असे म्हणताच सगळा बैलबंडीतला किरांना दगडांचा झाला. व्यापाऱ्याने किरणा जमिनीवर टाकून बाबांची माफी मागितली. साखर्बाहुली गावाच्या परिसरात आजही दगडाची सुपारी, गुळ, गहू, तांदूळ, खारीक, काजू, शेंगदाणे, लवंग आदी दगडी किरांना मिळते. मिळणारा किराणा चमत्कारिक आणि गुणधर्म युक्त असल्याने भाविक अंगाला लेप लावतात, बाबाची सुपारी म्हणून मिळणारे दगड प्रसिध्द आहे. याचे संशोधन करण्यात आले आहे. गुणधर्म युक्त काही घटक या दगडात आढळून आले आहे.

या टेकडीवर तपश्चर्या केल्यानंतर बाबा फरीद हासी दिल्लीला आणि तेथून अजोधन (पाकपट्टण) या ठिकाणी ५ मोहरम ६७० हिजरीच्या रात्रीला नमाज अदा करून प्राण त्यागले. फरीद बाबांची समाधी पाकपट्टण या शहरात आहे.

रामजन्मो उत्सव रथयात्रेला १९० वर्षाची परंपरा :

## श्रीराम मंदिराला २०१ वर्षाचा इतिहास : भाविकांचे श्रध्दास्थान –

येथील श्रीराम देवस्थानला २०१ वर्षाचा संत परंपरेचा ऐतिहासिक वारसा आहे.सन १८१५ या काळात रामदास स्वामींच्या नावाने मठ होता. त्या काळी या मठाला किमान १०० वर्ष झाले असावे. असे श्रीराम देवस्थानच्या दस्तऐवजात नोंद आहे. गिरड येथे १८१५ साली पैठणवरून परमहंस सीताराम महाराज राहण्यास आले.त्यांचे गवताच्या झोपडीत वास्तव्य होते. या झोपडीत श्रीराम, लक्ष्मण आणि सीता माताची लाकडी मुर्त्या स्थापित केल्या. तेव्हा पासून रामजन्मोत्सव साजरा करण्याची परंपरा रूढ



झाली.स्वामी रामदास महाराज ३५० वर्षापूर्वी गिरड येथे श्रीराम मंदिरात वास्तव्यास असल्याची इतिहासिक नोंद आहे.

## देशभऱ्यात वायगाव हळदीची ख्याती :

वायगावच्या पिवळ्या सोन्याने घेतली गगण भरारी देशभऱ्यात ख्याती असलेल्या समुद्रपूर तालुक्यातील वायगाव हळदीतील औषधी गुणधर्मयुक्त पिवळ्या सोन्याला



जगभऱ्यातून व्यावसायिकदृष्टीने पसंती मिळत आहे.यामुळे वायगाव हळदीची मागणी वाढली आहे. तालुक्यातील हळद उत्पादकांना आणि शेतकरी शेतमाल उत्पादक कंपन्यांना येत्या काळात पिवळे सोनेच प्रगतीचा मार्ग दाखविणार आहे. वायगाव हळद्या शेतकरी उत्पादक कंपनीने नुकताच ओमान देशातील फातुन बायो या कंपनीशी ओली हळद निर्यातिचा करार केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हळदीच्या विक्री व्यवस्थापनाचा मार्ग सुकर झाला आहे. स्वातंत्रदिनी जिल्हाधिकारी शैलेश नवाल यांच्या प्रमुख उपस्थित वायगाव फार्मर प्रोडूसर कंपनीने एस.डी.एफ. कंपनीच्या मदतीने ओमन येथिल फातुन बायो या कंपनीशी ओली हळद निर्यातिचा करार केला आहे. येथील हळदीला भौगोलिक उपदर्शन जिओग्राफिकल इंडिगेशन

चेन्नईच्या सर्वेक्षणात वायगाव हळदीमध्ये कर्क्यू मिन हा औषधी घटक सहा टक्क्यापेक्षा अधिक असल्याचे सिद्ध झाले आहे. यामुळे वायगाव हळदीला भौगोलिक नामांकन प्राप्त झाले आहे.पाच वर्षांपूर्वी सेलम जातीच्या हळदीच्या तुलनेत वायगाव हळदिवर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या उद्यान विद्या शाखेच्या शास्त्रज्ञांनी संशोधन केले. यात इतर जातीच्या तुलनेत येथील हळदीमध्ये कर्क्यूमिनचे प्रमाण अधिक असल्याचे सिध्द झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या हळदीची मागणी वाढू लागली. वायगाव हळदीच्या जातीत ब्राम्हणी आणि जावळी अश्या दोन प्रजाती आहे.या प्रजाती मोघल काळापासून परंपरांगत पद्धतीने जपलेले वाण , इतर हळदींपेक्षा तिप्पट औषधी गुण, कोठल्याही रासायनिक खताचा वापर न करता पुर्णतः नैसर्गिक पध्दतीने घेतण्यात येणारे पिक सध्या शेतशिवारात बहरलेले आहे.मुघल काळात तत्कालीन बादशहाने येथील शेतकऱ्यांना हळद उत्पादनासाठी जमिनीचे ३०० पट्टे दिल्याचे व तेथुनच हळद उत्पादनाला चालना मिळाल्याचे गावकरी सांगतात.

येथे हळदीचे उत्पादन आजही परंपरांगत पद्धतीनेच घेतले जाते. हळद उकळण्यासाठी आधुनिक साधणे असतानासुद्धा तांब्याच्या हंड्यामध्ये हळद उकळली जाते तर हळद काढण्यासाठी कुदळीचा वापर करतात. वायगावच्या हळदीचे वाण नष्ट होण्याच्या मार्गावर असतांना शेतकरी कंपनीने केलेला कराराणे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहे.

विक्री व्यवस्थेची साखळी तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्याच्या हाती आल्याने शेतकऱ्यांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

वायगाव हळदीतील गुणविशेषता :

वर्धा जिल्हयात समुद्रपूर तालुक्यातील वायगाव गाव हळद लागवडीत अग्रेसर होते. यामुळे हळदीचे पीक ' वायगावची हळद ' म्हणूनच प्रसिद्ध झाले..समुद्रपूर तालुक्यात वायगाव ( हळद्या ) सह नारायणपूर , नंदोरी , मंगरूळ , डोंगरगाव , पवणगाव,वासी , कोरा , समुद्रपूर , बेलघाट,मांडगाव, गिरड , मुरादपूर, खैरगाव,शिवणफळ ,उन्दिरागाव आदी गावांमध्ये १३०० हेक्टर मध्ये वायगावच्या हळदीचे उत्पादन घेतले जाते. वायगावच्या हळदीमध्ये इतर हळदींपेक्षा तिप्पट औषधी गुण आहे . यात औषधी गुणधर्म असणारे curcumin ( कुर्कुमीन ) घटकाचे प्रमाण सहा ते सात टक्के असते तर इतर हळदीमध्ये हेच प्रमाण दोन टक्क्यांपर्यंतच आढळते. म्हणजेच हळदीमध्ये जवळपास तिप्पट औषधी गुणधर्म या हळदीत आढळते. हळदीचा रंगही गडद पिवळा आहे. मोहरीच्या फुलासारखा गडद रंग आढळतो. हळदीची चवही एकमेवाद्वितीय आहे.तेलाचे प्रमाण सुध्दा जास्त आहे .डब्यात भरलेल्या हळदीला लवकरच तेल सुटते तर सुगंधही मन तृप्त करणारा आहे. खाद्यात अगदी थोड्या प्रमाणात जरी हळद टाकली तरी पदार्थाचा रंग बदलतो . ही हळद आरोग्यदायी असून व्यक्तीची रोग प्रतिकारकक्षमता वाढविते , कॅन्सर, मेंदूविकार, वातविकार, सर्दी, ताप, खोकला, त्वचाविकार आदी आजारांवर ही हळद हितकारक आहे. वायगावच्या हळदीमध्ये जावळी , बामणी अन् भेंडी असे तीन स्थानिक स्तरावर प्रकार आहेत . यातील जावळी प्रकारात सर्वाधिक औषधी गुण आहेत.

- गजानन गारघाटे,
समुद्रपूर, वर्धा
९८८१५७६६०५







# इंदापूर तालुका ओळख (पुणे)

इंदापूर हे तालुक्याचे ठिकाण असून पुणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यांपैकी एक आहे. या गावाला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभला असून या तालुक्याची निर्मिती १९२० मध्ये झाली. पौराणिक काळात इंदापूरचे नाव 'इंद्रपुरी' असे होते. पुणे जिल्ह्यातील सर्वात निकृष्ट कमी उत्पादन देणारा म्हणून हा तालुका ओळखला जाई. म्हणून शेजारच्या निजामी प्रदेशात रयत उपजिविकेस स्थलांतर करीत असे. १८ व्या शतकातील एका दस्तऐवजावरुन इंदापूर परगण्यात केवळ ८५ गावांचा समावेश होता. इंदापूर आणि कळंब हे दोन कसबे होते. १८१८ सालच्या देहझाड्यात एका गावाची भर पडून ८६ गावे झाली. इंदापूर तालुका १८.०७ ते १८.१२ओ उत्तर अक्षवृत्त आणि ७५.०२ओ ते ७५.०३ ओ पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान वसलेला आहे. हा तालुका सोलापूर, पुणे, सातारा, अहमदनगर या शहरांपासून समान अंतरावर असून राष्ट्रीय महामार्गामुळे मुंबई-हैद्राबाद सारख्या मोठ्या शहरांना जोडलेला आहे. इंदापूर तालुक्यातून पुणे हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ जात असून पुण्यापासून इंदापूर हे अंतर १३५ किमी आहे. तसेच भिगवण, बारामती, दौंड ही रेल्वेस्थानके इंदापूरपासून जवळ आहेत. इंदापूर तालुक्याचे एकूण क्षेत्र १,४६,७९१ हेक्टर असून त्यापैकी जंगलव्याप्त ३१,५३३ हे. क्षेत्र, शेतीला उपलब्ध नसलेले एकूण क्षेत्र ७२,५८९, लागवडीयोग्य क्षेत्र ६४,५५५ इतके आहे. इंदापूरच्या वायव्येस डिकसळ गावापासून भिमा नदी इंदापूर तालुक्यात प्रवेश करते. सीमेवर वायव्य ते उत्तरेस ईशान्य व पूर्वेस पूर्ण गोलाकार भिमा नदीचे पात्र सध्या उजनी जलाशय व्याप्त आहे. भीमा नदीवर सुप्रसिध्द उजनी धरण असून पाण्याचा फुगवटा सुमारे ५० किमी आहे. त्याचा उपयोग कृषी उत्पादन व मत्स्य पालनासाठी, औद्योगिक वसाहतीसाठी व प्रामुख्याने पिण्याच्या पाण्यासाठी देखील होत आहे. उजनी जलाशयात २२ गावे जलमय झालेली आहेत. इंदापूर तालुक्यात एकूण महसूली गावे १४३ असून १२२ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत

- शब्दांकन
पत्रकार देवा राखुंडे
प्रतिनिधी इंदापूर, पुणे

अजंठा
UNIFORMS
SINCE 1984
We Build Branded
Quality Uniforms
53, Main Road, Omerga,
Dist.Osmanabad-413606
Cell : 9421872309

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
सौरभ इंजिनियरिंग
जीआय, पियुसी पाईप व फिटींग



प्रोप्रा. चंद्रमोहन गांधी
उमरगा, जि.उस्मानाबाद
राजधानी पंपाशेजारी, मोरे कॉम्प्लेक्स, मेन रोड,

# इंदापूर तालुक्याचा इतिहास (पुणे)

प्राचीन सातकर्णी राजवटीप्रमाणे देवगिरीच्या यादवांची राजवट बराचकाळ इंदापूरवर होती. सन १२९४ मध्ये मुसलमानांचे दक्षिणेत आगमन झाले असले तरी इ.स.१३०८ पर्यंत यादवांचेच राज्य या प्रदेशावर होते. काही काळ अफगान सरदार हसन गंगू बहामनी याची सत्ता या विभागावर होतो. इ.स.१४५७ मध्ये बहामनी राज्याचे विघटन झाले. त्यावेळी इंदापूरचा भाग अहमदनगरच्या निजामशाहीत गेला. विजापूरचा पहिला सुलतान युसुफ आदिलशहा याच्या काळात इ.स.१४९० मध्ये इंदापूरचा सर्वप्रथम उल्लेख आढळतो. इ.स. १५६२ पर्यंत इंदापूरचा भाग काही काळ निजामशाहीकडे तर काही काळ आदिलशाहीकडे राहिला. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे इंदापूरचा जुना उल्लेख १६ व्या शतकाच्या शेवटच्या दशकातदेखील आढळून येतो. इंदापूर हा गाव मराठा राज्य संस्थापक असलेल्या शिवाजी राजे भोसले यांच्या घराण्याचा गाव म्हणूनच इतिहासात प्रसिद्ध आहे. मालोजी राजे भोसले सन १५९१ ते १६०६ या काळात निजामशाहीत एक सरदार होते. इ.स. १६०५ मध्ये इंदापूर या ठिकाणी आदिलशहा आणि निमशहा यांच्यात युद्ध जुंपले. याच लढाईत छत्रपती शिवाजीराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले सन १६०६ मध्ये या लढाईत लढताना मृत्यू पावले. इंदापूरच्या जुना कसबा व नवी पेठ यांच्यामधून वाहणा-या ओढ्याकाठी सरकारवाडा म्हणून ओळखल्या जाणा-या वास्तूशेणारी मालोजीराजे यांची समाधी बांधण्यात आली. इ. स. १६३६ मध्ये शहाजीराजांनी आदिलशाहीत चाकरी सुरु केली त्याचवेळी इ.स. १५४० मध्ये शहाजीराजांच्या जहागिरीत इंदापूरचा समावेश झाला. कवी परमानंद यांनी 'शिवभारत' या ग्रंथात असे म्हटले आहे की, शहाजीने शरणागती पत्करताना आपली इंदापूरची जहागिरी स्वत:जवळच ठेवून उर्वरित प्रदेश मुघल आणि आदिलशहात वाटून टाकला. पण इंदापूरच्या जहागिरीचे सर्वाधिकार इ.स. १६४५ च्या सुमारास आपल्या मुलाच्या म्हणजेच शिवाजीराजांच्या नावे केले. औरंगजेबाच्या कारकिर्दीत सन १६९५ ते १७०० या काळात मुघलखान हा ठाणेदार असून त्याला दोन ते तीन हजाराची मनसब देण्यात आली होती. पुढे १८ व्या शतकात पेशवाईत घोडदळ व पायदळ असलेले लष्करी अणे म्हणून पुढे आले. इंदापूर आदिलशाहीत येत असले तरी तेथे प्रत्यक्षात एक स्वायत्तराज्य होते.

-शब्दांकन
पत्रकार देवा राखुंडे,
प्रतिनिधी इंदापूर,
पुणे

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

जिजामाता माध्यमिक
व उच्च माध्यमिक विद्यालय

अध्यक्ष
मा. सौ. उर्मिलाताई ढवळे
(माजी सभापती महिला व बालकल्याण जि. प. जालना)



मुख्याध्यापक
मा. श्री. जी. एन. जाधव

सचिव
मा. प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे

निमखेडा ( खुर्द ) ता. जाफराबाद जि. जालना

# इंदापूर तालुक्यातील धार्मिक स्थळे

इंदापूर शहरामध्ये प्राचीन मंदिरे, दर्गा, मश्जिद तसेच देवी देवतांची मंदिरे ही धार्मिक व सांस्कृतिक वैभवाचे साक्षीदार आहेत. यामध्ये गणेशोत्सव, नवरात्र, देवांच्या यात्रा, जयंती उत्सव यांचा समावेश होतो. इंदापूर शहराचे मुख्य दैवत इंद्रेश्वर किंवा महादेव असून त्यावरुनच इंद्रपूर-इंदापूर नाथ झाले असावे.

इतरही अनेक देवस्थाने येथे आढळून येतात. त्यामध्ये महत्त्वाचे इंद्रेश्वर मंदिर, व्यंकटेश मंदिर, सिध्देश्वर मंदिर, राममंदिर, खंडोबा, लक्ष्मी, रोकडाई, मारुती,मार्तंड, नरसोबा इ. या सर्व देवालयास पूजा अर्चेसाठी उत्सवासाठी काही इनाम जमिनीही देण्यात आलेल्या होत्या. सिध्दरामेश्वर हे लिंगायत पंथाचे प्रचारक व प्रसारक असल्याने या मंदिरास लिंगायत समाजाबरोबरच इतर जाती धर्माचेही लोक दर्शनासाठी येतात. श्रावणात प्रत्येक सोमवारी येथे भाविकांची गर्दी असते. याठिकाणी प्रसिध्द असलेले व्यंकटेश्वराचे मंदिर बालाजीच्या मुख्य मंदिराचे मूळ देवस्थान असल्याचे सांगितले जाते. बालाजीच्या यात्रेवेळी इंदापूरच्या व्यकटेश मंदीरात ज्योत पेटवली जाते. तसेच दत्त मंदिर, राम मंदिर, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर हो जुनी मंदिरे आहेत. इंदापूर शहरातील धार्मिक स्थळांमध्ये प्रस्थापित धर्मस्थळे व लोकदैवते यांचाही समावेश असल्याचे दिसून येते. प्रस्थापित प्रमुख धर्माशी संबंध नसलेली परंतु बिशिष्ट लोकसमूहाने, श्रध्देने आपली मानलेली देखते ही लोकदेवते होती. ग्रामीण भागात राहणा-या लोकांचे जीवन शेतीशी संबधित असल्याने त्यातूनच भावनिक गरजांनुसार लोकदेवते आकाराला आली. निसर्ग रुपाशिवाय काही अव्यक्त, अमूर्त शक्ती अनुकूल या प्रतिकूल कार्य करतात. या श्रध्देतून त्या शक्तीचे दैवतीकरण झाले. यामध्ये लक्ष्मी, रोकडाई, मरिआई, तुकाई इ. मातृदेवतांबरोबरच वेताळ, भैरवनाथ, मारुती, म्हसोबा इ. पुरुष देवतांचाही समावेश होतो. या देवतांच्या उपासनेमुळे त्या संतुष्ट होऊन रोग व संकटे निवारण करतात, अशी लोकांची समजूत असल्याचे दिसून येते. धार्मिक जीवनाला देव-देवतांच्या पूजे-अर्चेतून अभिव्यक्ती प्राप्त होते. माणसांना भक्ती करण्यासाठी प्रतिभागी आवश्यकता असते. या भक्तीच्या आविष्कारातून अनेक देवालयांची निर्मिती झाली. माणसाच्या जीवनात धार्मिक स्थळास अथवा देवालयांना अनन्य साधारण महत्व आहे. ही देवालये सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक रुढी, परंपरा वारसा जपून ठेवण्याचे कार्य हो धार्मिक स्थळे करीत आहेत. धार्मिक स्थळांच्या माध्यमातून भजन, किर्तन, प्रवचनाद्वारे वाहमयीन व कलात्मक मूल्यांचे जतन, आचार विचारांचे व संस्कृतीचे अभिसरण घडून आल्याचे दिसून येते.

-शब्दांकन : देवा राखुंडे
इंदापूर, पुणे

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



सुखदेव पाटील नवले
मो.९४२३४५७२६२

अध्यक्ष
श्री जगदंबा संस्थान डावरगांव देवी ता. जाफराबाद,जि. जालना
माजी चेअरमन :
जालना तालुका अशासकीय शिक्षक सहकारी पतसंस्था म. जालना ,
माजी मुख्याध्यापक :
श्री शिवाजी हायस्कूल गांधी चमन जालना,
माजी अध्यक्ष :
महाराष्ट्र राज्य कलाध्यापक शिक्षक महामंडळ शाखा, जालना )



# मालोजीराजांची गढी

इंदापूर, सुपे, चाकण, बारामती या परगण्यातील महत्त्वाचे ठिकाण म्हणून मालोजीराजे भोसले यांच्या गढीचा मान आहे. निजामशाहीचे सरदार म्हणून मालोजीराजे या गढीतून जहागिरीचा कारभार बघत असत. छत्रपती शिवरायांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्याकडे दक्षिणेतील इंदापूरचा परगणा होता. ते या ठिकाणी येवून राहत असत. दक्षिणेतील राजकिय लढायांमध्ये आपले शौर्य, धैर्य त्यांनी सिध्द केले. ते ज्या वेळी मोहिमेवर नसत, त्या वेळी विश्रांतीसाठी त्यांचा या गढीवर मुक्काम असे. या गढीची रचना अतिशय नियोजनबद्ध करण्यात आली होती. गढीला मातीचेच, परंतु अतिशय मजबूत असे आठ बुरूज होते. नजीकच अन्नधान्य साठवणुकीसाठी, शस्त्रसाठा ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

मालोजीराजे हे इंद्रेश्वराचे निस्सीम भक्त होते. सूर्योदयाच्या वेळी सूर्याला नमन करण्यासाठी ते जेव्हा बाहेर येत, त्या वेळी गढीवरून सूर्याबरोबरच इंद्रेश्वराचे दर्शन होईल, अशी व्यवस्था करण्यात आली होती. गढीबरोबर इंदापूर शहराचेही शत्रूंपासून संरक्षण व्हावे, याकरिता तट बांधण्यात आले होते. या तटाच्या बाहेर हत्ती, घोडे यांची पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून टाक्या बांधल्या होत्या. या टाक्यांत व इंद्रेश्वर मंदिर परिसरात पाण्याची कमतरता भासू नये, असे नियोजन करण्यात आले होते. आजघडीला टाक्यांची पडझड झाली असली, तरी त्याखालच्या खापरी जलवाहिन्या त्या वेळच्या स्थापत्य कौशल्याची चुणूक दाखवतात.

इंदापूर या ठिकाणी आदिलशहा आणि निजामशहा यांच्यामध्ये इ.स. १६०५ मध्ये युद्ध जुंपले. याच लढाईत श्रीमंत मालोजीराजे भोसले इ.स. १६०६ मध्ये लढताना मृत्यू पावले. इंदापूरचा जुना कसबा आणि नवी पेठ यांच्या मधून वाहणा-या ओड्यांच्या काठी टेकडीच्या पायथ्याशी 'सरकारवाडा' म्हणून ओळखल्या जाणा-या वस्तूशेजारी मालोजीराजे यांची समाधी बांधण्यात आली. मालोजीराजे इंदापूरात स्वर्गवासी झाले हे त्यांच्या घुमटीच्या उल्लेखावरुन समजते. अद्यापही खालच्या दोन थरासह ती आढळते. १६८२-८३ च्या एका थळझाड्यातील नोंदीनुसार या समाधीच्या पूजे-अर्चेसाठी साडेसात बिघे जमिन नेमून दिलेली होती, असे दिसते आणि ही अगदी इंग्रजी राजवटीतही कायम राहिली.

मालोजी राजे इंदापूर येथे ज्या ठिकाणी राहत ती एक गढी होती. या गढीचे बांधकाम पूर्णत: दगडी होते. तसेच ही गढी शहराच्या पश्चिम वेशीजवळ आहे. गढीजवळ भार्गवराम तलाय असून गढीजवळच काळी मशिद आहे. सद्यस्थितीत गढीची पडझड झालेली असून गदीवर बुरुज अस्तित्वात आहेत. आजही त्या ठिकाणी इंदापूर तहसिलदार, कचेरी, भूमिअभिलेख कार्यालय, कारागृह अस्तित्वात होते . मात्र २०१८ साली याची दुसरीकडे स्थलांतर करण्यात आले.

-शब्दांकन
पत्रकार देवा राखुंडे,
प्रतिनिधी इंदापूर,
पुणे



(मालोजीराजे यांच्या दगडामध्ये घडलेल्या पादुका सध्या इंद्रेश्वर मंदिरात ठेवण्यात आल्या आहेत.)

# अहिल्यादेवी होळकरकालीन विहिर (पुणे)

इंदापूर तालुक्यात अहिल्याबाई होळकर यांनी त्या काळी पाण्याची सोय व सुविधा देण्यासाठी चार विहीरी खोदल्या. त्या आजही सुस्थितीत अस्तित्वात आहेत. व त्या त्या गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सध्या त्याच विहीरींमधून होत आहे, हे वैशिष्ट्य आहे. या विहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे आकार हा महादेवाच्या पिंडीसारखा आहे. संपूर्ण दगडी बांधकामात सुस्थितीत विहीरींचे पक्क्या चुन्यात बांधकाम केलेले दिसून येते.

विहिरीमध्ये गणपती व महादेवाची पिंड ठेवण्यासाठी देवकोष्टके आहेत. विहीरीत उतरण्यासाठी दगडी पाय–यांची सोय असून पूर्वी मोटेने पाणी शिंदण्याच्या सोयी होत्या. गावालगत असणा–या या विहिरी प्रामुख्याने कळस, शेळगांव, पिटकेश्वर, लाखेवाडी या ठिकाणी आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत.



(अहिल्याबाई होळकर यांनी त्या काळी पाण्याची सोय व सुविधा देण्यासाठी खोदलेली पिटकेश्वर येथील विहीर )



(पिटकेश्वर येथील अहिल्याबाई होळकरकालीन शिलालेख विहिरीत आढळून आला.)



# भादलवाडी येथील चित्रबलाक पक्षांचे माहेरघर

इंदापूर तालुक्यातील भादलवाडी येथे ब्रिटिशकालीन तलाव आहे. या तलाचाच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे या तलावाकडे भारतातील दुर्मिळ कपाटे मारत दुर्मिळ चित्रबलाक पक्षी आकर्शित झाले आहेत. पुणे येथील इला फाऊंडेशनच्या वतीने चित्रबलाक पक्षांच्या जीवनमानाचा अभ्यास करण्यासाठी या पक्षांना मोठ्या प्रमाणात रिंगींग करण्यात आले होते. तर वन विभागाने हा राखीव वन म्हणूनही घोषित केला होता. भारतात फार कमी भागात या पक्षांचे अस्तित्व आहे. यापैकी उजणी भागात हे पक्षी दृष्टीत पडतात.

भादलवाडी येथील तलावात चित्रबलाक पक्ष्यांचे मोठे 'सारंगगार' म्हणजेच वसाहत असल्याचे त्यांनी केलेल्या पाहणीमध्ये दिसून आले. सायंकाळच्या वेळी चित्रबलाक व तलावामध्ये असलेल्या इतर सुमारे पन्नास प्रकारच्या पक्ष्यांच्या कवायती पाहणे, हा सुखद अनुभव पर्यटकांना मिळतो. भादलवाड़ी तलावाची रचना अत्यंत आकर्षक आहे. चारही बाजूने उंच टेकड्या व उशाला उजनी जलाशय त्यामुळे या भागात वर्दळ कमी असते. त्यामुळे अनेक पक्ष्यांनी या भागात आपल्या वसाहती थाटल्या आहेत.

तलावाच्या मध्यभागी असलेली काटेरी वृक्ष व भोवतालचे पाणी यामुळे पक्ष्यांना नैसर्गिक संरक्षण मिळते. सन २००३-२००४ मध्ये प्रथमच भारतातील दुर्मिळ चित्रबलाक पक्ष्यांचे विणीच्या हंगामासाठी डिसेंबर महिन्यात आगमन झाले होते. त्यानंतर दिवसेंदिवस पक्ष्यांची संख्या सातत्याने वाढत गेली. डिसेंबरमध्ये

आगमन झाल्यानंतर पुढील पाच ते सहा महिने या पक्ष्यांचे भादलवाडी तलावात वास्तव्य असते. चित्रबलाक पक्ष्यास इंग्रजीमध्ये 'पेंटेड स्टॉर्क' असे म्हणतात. हा पक्षी आकाराने ९३ सें.मी. उंच असून त्याच्या अंगावर वेगवेगळ्या रंगाची छटा असते. चोच पिवळ्या रंगाची व लांब असते. पहिल्या पंखांना काळी किनार व पंखांवर गुलाबी व हिरव्या रंगाच्या छटा असतात. चित्रबलाक पक्ष्याचा डौलदार व रुबाबदारपणा पक्षीमित्रांना भुरळ घालतो. याशिवाय तलवावर दुर्मिळ पक्षी, राखी बगळे, पाणकोंबड्या, पाणकावळे, मोर, युरोपियन भोरड्या, बंचक, बगळे, खंड्या आदि सुमारे पन्नास जातींचे पक्षी मोठ्या संख्येने आढळून येतात. या पक्ष्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना, खाद्याची उपलब्धता, पिलांसाठी योग्य

सुरक्षा पर्यटन विभागाच्या वतीने उपलब्ध करुन दिल्यास भादलवाडी तलाव महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर आले नामंवत कोरू शकेल यात शंका नाही. त्यासाठी वनविभाग, जलसंधारण विभाग व पाटबंधारे विभाग यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे.

-शब्दांकन
पत्रकार देवा राखुंडे,
प्रतिनिधी इंदापूर,
पुणे



(भादलवाडी येथील जलाशयावरील चित्रबलाक पक्षी )

# नरसिंह मंदीर नीरा नरसिंहपूर

निरानरसिंहपूर हे स्थान आग्नेय दिशेस असून पुणे जिल्याचे ते शेवटचे टोक आहे. क्षेत्राच्या एका बाजूने निरा नदी तर दुसऱ्या बाजूने भीमा नदी आणि तिसऱ्या बाजूस या उभयतांचा संगम. तीन बाजूने पाणी व एका बाजूस जमीन असे हे रमणीय स्थान आहे. या क्षेत्राचा आकार सिंहाच्या नाखासारखा आहे. येथील श्री नरसिंह हा महाराष्ट्र ,कर्नाटक आणि मध्य-प्रदेश यातील अनेक नरसिंह भक्तांचा कुलस्वामी आहे.या सर्व भक्तांचे श्री नरसिंह हे अधिष्ठान आहे.ते या क्षेत्रास मानतात.इतकेच काय तर ज्यांचा कुलस्वामी नाही अशा हि अनेकांना क्षेत्राचे महात्म्य व रमणीयता जाणवली व ती त्यांनी मान्य केली.अनेक भक्त येथे दर्शनासाठी येतात व नरसिंहाचा आशीर्वाद घेतात तसेच या क्षेत्राला शास्त्रीय महत्व देखील आहे.असे म्हणजे शास्त्रज्ञानी या क्षेत्राचा अभ्यास केला होता. त्यात असे दिसून आले कि निरा- नरसिंहपूर हे पृथ्वीचे मध्यस्थान/नाभिस्थान आहे. तसे शास्त्रीय पुरावे देखील आहेत.

हे एक भू वैज्ञानिक सत्य आहे.जे अनेक लोकांना निरा-नरसिंहपुरला भेट देण्यास आकर्षित करतात. तसे खूप पुरावे आहेत कि या पवित्र स्थानाला खूप मोठा इतिहास आहे.पूर्वी पासूनच हे स्थान प्रसिद्ध आणि धार्मिक आहे. आपल्याकडे असा पुरावा आहे कि पूर्वी प्रभू रामचंद्र यांनी आपली पवित्र यात्रा रावणाचा वाढ केल्यानंतर मुनी अगस्ती यांच्या सांगण्यावरून पूर्ण केली. त्यांनी हि यात्रा निरा-नरसिंहपूर येथूनच सुरु केली होती.हे स्थान खूप सुंदर आणि धार्मिक आहे. अनेक मुनी आणि भक्त येथे पूजेसाठी येतात. असे म्हटले जाते कि महर्षी व्यास सुद्धा येथे काही कालावधीसाठी राहिले होते.समर्थ रामदास यांनी दोन वेळा निरानरसिंहपूर येथे भेट दिली याची प्रचीती येते. शके १५५३ च्या एकादशीस समर्थ पंढरपुरास आले होते.चंपाषष्ठी साठी त्यांना पालीच्या खंडोबाला जायचे होते.ते येथे आले होते आणि त्यांनी संगमावर स्नान ,संध्या आटपून त्यांनी एक सुदर कीर्तन सादर केले होते.

निरा आणि भीमा नदीच्या संगमावर असलेला अंडाकृती प्रचंड असा घाट शके १५२७ मध्ये बांधून पूर्ण झाला.हे बांधकाम कोणी त्रिमलापाळ दाधजी मुधोजी यांनी केले.सदरील बांधकाम सतत ३ वर्षे चालू होते. पुढे शके १७८७ साली रघुनाथ राव विन्चुरकर यांनी देवालयाचा एकदरीत जीर्णोद्धार केला त्यासंबंदीचा शिलालेख देवालयात उपलब्ध आहे. सध्याचे श्रींचे देवालय हे उतुंग व भव्य असे असून पेशवे काळातील वास्तुशिलाचा एक उत्तम नमुना आहे. देवालयाच चारही बाजूंनी रुंद व भक्कम असा भक्कम तट आहे. श्री मूर्तीचा प्रमुख गाभारा त्या पुढील गर्भागार,रंग शिलेचा सभामंडप हे संपूर्ण दगडी बांधकाम असून दगडी छतावरील नक्षी व विविध देवाच्या मूर्ती लक्षणीय आहेत. घडीव दगडी खांब कुशलतापूर्वक आहे. पितळी दरवाज्यापुढे लाकडी मंडप असून त्यापुढे भक्त प्रल्हादाचे मंदिर आहे. रंग शिळेच्या मंडपाचे दोन्ही बाजूस तीन दरवाजे आहेत.ह्या सर्व दगडी दरवाज्यावर जय विजय घडविलेले असून, पितळी दरवाज्यावरील जय-विजयाची सुबकता व मुद्रा विलोभनीय आहेत.वेगवेगळया प्रकारच्या नक्षी, घाटदार खांब ,कंगोरे प्रमाणबद्ध व अतीव देखणा असा पितळी दरवाजा येथे आहे. भगवान विष्णूंनी वराह हा तिसरा अवतार धारण करून हिरण्यकशिपुचा वध केला. बंधू वाढणे संतप्त होवून हिरण्यक शिपुने तपाचर्या करून अनेक वर मिळवले. मग मात्र तो पिसाळला.उन्मत्त हिरण्यकश्यपूने देवाशी उगड उगड वैर मांडले.देवांचा राजा इंद्र तो देखील याच्या या करनीने हबकला.हिरण्यकश्यपूचा वध करावा हा हेतू मनी धरून इंद्राने एक कृती केली.हिरण्यकश्यपू राजधनीत नाही हे पाहून त्याने राजधानीवर स्वारी केली. व त्याची गर्भवती पत्नी कयाधू चे हरण केले.या कयाधू सह इंद्र स्वर्गलोकी जात असतानाचा महर्षी नारदांनी इंद्राची भेट घेऊन त्यास सांगितले देवेंद्र या सतीस यत किंचितही पीडा करू नकोस. हिच्या गर्भस्त महान भागवत भक्त असून त्याच्या रक्षणार्थ श्री महा विष्णू अवतार घेतील. नारदांनी हि आज्ञा मानून नारदाच्या कयाधू हिस आश्रमात ठेवून त्याने प्रयाण केले. महर्षी नारदाचा आश्रम हा नरसिंहपुरीच भीमेच्या काठी कोटी तीर्थावर होता. तेथेच सती कयाधू तेथेच प्रसूत झाली.महान भगवत भक्त जन्मास आला. नारदांनी त्याला निरा-भीमा

संगमावर ओम नमो नारायण असा मंत्र देवून गुह्यज्ञान सांगितले. असा भक्त प्रल्हाद नित्य निरा-भीमा संगमी जाऊन तेथे ताप करी. त्याने तेथील वाळूकेची नरसिंह मूर्ती करून तिची मनोभावे अर्चना करावी. असेच ई दिवसी ताप फळास आले. विष्णूंनी मूर्तीमध्ये श्री नरसिंह रूपी दर्शन दिले. व प्रल्हादाला आशीर्वाद दिला. नरसिंह पुरी देवालयात तीच वाळूची नरसिंह मूर्ती सिंहासनावर विराजमान आहे.हि मूर्ती पश्चिमाभिमुख आहे.हि वाळूची मूर्ती विरासनस्थ, उजवा पाय गुडघ्यात मुडपून उभा, डाव्या पायाची मांडी घातलेली, उजवा हात उजव्या गुडघ्यावर,डावा हात कंबरेवर आहे.रुंद छाती, बारीक कमर, मुख सिंहासारखे रुंद व उग्र ,भव्य डोळे अशी उग्र चर्या आहे. मुख ,छाती ,कामर सिंहासारखे तर हात पाय मानवी वाटतात. नरहरी शामराज - नरसिंहाच्या मुख्य गाभाऱ्यात श्री नरसिंहाच्या दोन मूर्ती असून दुसरी मूर्ती काळ्या पाषाणाची असून ब्रह्मदेव कृत नरसिंह मूर्ती आहे.त्यात मूर्तीस शामराज असे म्हणतात. म्हणून जय घोषात नरहरे शामराज असा जय घोष होतो. देवालयाच्या आतील बाजूस असणाऱ्या परिवार देवता खालील प्रमाणे

८.१) शेजघर : हे रंगशिळेच्या गाभाऱ्यात असून शेजघरात दोन पलंग आहेत.एक श्री नरसिंहाचा व दुसरा शामराजाचा पलंगावर गाद्या ,गिर्द्या ,उश्या व श्रींची प्रतिमा आहे.

८.२) स्तंभ-नरसिंह : रंग शिळेच्या सभा मंडपातील एका स्तंभावर हिरण्यकश्यपूच्या वधाचा प्रसंग कोरलेला आहे.

८.३) लक्ष्मी मंदिर : श्री नरसिंहाचे डावे बाजूस श्री महालक्ष्मीचे मंदिर आहे. श्री महालक्ष्मीची रेखीव व सुंदर मूर्ती गंडकी शिळेची आहे.मूर्ती उभी आहे.पूजा बांधल्यावर बसल्यासारखी दिसते. या मंदिराचे शिखर हे दगडी आहे.हे शिखर निरा नदीच्या पात्रापासून सुमारे १५० फुट उंच आहे.शिखराच्या दोन दगडामध्ये एक लहानशी पहात आहे.त्यातून दिवस रात्र पाणी जीरपते.उगमस्थान अज्ञात असलेला हा लहानसा पाझर येथे गुप्त गंगा म्हणून ओळखला जातो.हा एक चमत्कारच आहे.तर्क शास्त्राने याचा उलगडा करता येत नाही.

८.४) भक्त प्रल्हाद मंदिर : श्री नरसिंहाच्या समोर लाकडी सभामंडपात भक्त प्रल्हादाचे मंदिर आहे. हात जोडून उभी राहिलेली ही मूर्ती काळ्या पाषाणाची आहे.प्रल्हाद कृत नरसिंह मूर्ती व प्रल्हाद मूर्ती एकमेकांच्या समोर असून नरसिंह मूर्तीच्या पायांच्या समपातलीस या मूर्तीचे मस्तक येते हे एक विशेष आहे.

८.५) श्री दत्तात्रय मंदिर : दत्तासाठी एक छोटेसे देवालय बांधलेले आहे.हे बांधकाम संपूर्ण लाकडी असून दत्तमूर्ती पांढऱ्या संगमरवरी दगडाची आहे.हि मनोहर मूर्ती सिंहासनावर स्थापित आहे.

८.६) भीमा शंकर : देवाच्या उजव्या बाजूस भीमा शंकराचे छोटेसे देऊळ आहे. शाळूकिंच्या मानाने पिंडी उंच आहे.

८.७) विठ्ठल-रुक्मिणी : भीमा शंकराच्या उजव्या बाजूस छोट्या देवळात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती आहेत.दोन्ही मूर्ती पाहिल्यास पंढरपूरची आठवण येते.

८.८) राघवेंद्र स्वामी वृंदावन : मद्व संप्रदायाचे श्रद्धास्थान मंत्रालय स्थित श्री राघवेंद्र स्वामी हे भक्त प्रल्हादाचा अवतार होत.वृंदावन प्रवेशानंतर त्यांचा प्रत्यक्ष वास मंत्रालय क्षेत्री आहे.मंत्रालय सवे निरा नरसिंहपूर क्षेत्री मी विशिष्ट काळी निवास करेल अशी त्यांची भविष्यवाणी असल्याने शके १८५० साली श्री राघवेंद्र स्वामींचे वृंदावन श्री नरसिंह देवालयात बांधले गेले.दरवर्षी श्रावण महिन्यात आराधना महोत्सव साजरा केला जातो.

८.९) शालीग्राम : शाकंबरीच्या मंदिराजवळ शालीग्रामाच्या आकाराचा एक मोठा पाषाण आहे.

८.१०) तरटी नरसिंह : मोठा ओटा त्याच्या केंद्र स्थानी तरटी वृक्ष त्याच्या खाली श्रींच्या चार पादुका असून मंदिरा शेजारच्या दुसऱ्या तरटी वृक्षास पार बांधलेला आहे.

८.११) शाकंबरी : अठरा भूजांनी युक्त अशी देवीची मूर्ती या मंदिरात आहे.

८.१२) काशी विश्वेश्वर : खोल गाभारा असलेले शिकार युक्त व महादेवाच्या पिंडी प्रमाणे दिसणारे एक ओबडधोबड मध्यम देऊळ ,समोर बसविलेला एक मोठा दगडी नंदी व गाभाऱ्यातील पिंडी शाळुंका हा काशी विश्वेश्वर येथे आहे.पिंड काढली असता खोलगट भाग दिसतो त्यात तीन लिंग आहेत ते ब्रह्मा ,विष्णू आणि महेश

८.१३) काळा दत्त : काशी विश्वेश्वराच्या उजव्या बाजूस एका देवळात पाषाणाची दत्ताची मूर्ती आहे.त्यास काळा दत्त असे म्हणतात.

८.१४) मुहूर्त गणपती : एका स्तंभावरील कमानीत गजाननाची मूर्ती आहे.मुख्य देवालय बांधण्याअगोदर ही मूर्ती स्थापन केली.

८.१५) काळभैरव : पूर्व दरवाज्याकडे भैरव नाथाचे देऊळ ओवरीत आहे.हे स्थान सोनारी येथील भैरव नाथाच्या

दोन मूर्ती आहेत.

८.१६) रामेश्वर : लक्ष्मी मंदिर लगत एक रामेश्वराचे हे देऊळ आहे.

८.१७) प्रचंड घंटा : देवालयाच्या पश्चिम दरवाज्याकडे प्रल्हाद मंदिराच्या पाठीमागे वाजविण्याची जी प्रचंड घंटा बांधलेली आहे.ती श्री लक्ष्मी नरसिंह संनादिनी म्हनुन ओळखली जाते.ही घंटा वसई येथील पोर्तुगीज चर्च मधील प्रार्थनेसाठी वापरल्या जात होत्या. इ.स. १७३९ साली पुण्याचे पेशवे चिमाजी अप्पांनी वसई जिंकल्यानंतर त्या लुटून पुण्यास आणल्या.श्रीमंत पेशवे यांनी या घंटा निरनिराळ्या देवस्थानाला पाठवून दिल्या.त्यापैकीच एक सदाशिव माणकेश्वर यांच्या प्रयत्नाने निरा नरसिंहपूर येथे आणण्यात आली.सोनार जातीतील बाबा नावाचा पैलवान याच काळात होऊन गेला.देवालयाचा माडीजवळ याचा पुतळा असुन मोठ मोठी झाडी तो सहज उपटीत असे.वरील प्रचंड घंटा याने डाव्या हाताने पेलून उजव्या हाताने बांधली आशी आख्यायिका आहे.

## नीरा भीमा संगम घाटाची वैशिष्टे –

नीरा भीमा या नद्याच्या संगमावरील घाटामध्ये शिल्प सौंदर्य लक्षणीय आहे. घाटाच्या पायऱ्यात बसविलेल्या मोठ्या दगडातून हत्तीचे शिल्प घडविले आहेत.संगमात स्नान करून संगम घात चडत असताना आपली सोंड वर करून भक्ताला अभिवादन करून स्वागत करतात. हत्ती व सिंह यांची जोडी लक्षह वेधते शिवाय मगरीचे पाच शिल्प आहेत.

सोळखांबा मंदीर – धाधजी मुधोजी यांनी संगम घाट बांधला तसेच या घाटावर सोळा दगडी खांबांनी युक्त असे दगडी देव आहेत.या देवालयाच्या मध्यभागी आश्वस्थरुपी नरसिंह गणपती मारुती शिवलिंग व वटवृक्ष या देवता आहेत. या पाराचा जीर्नोद्धार रघुनाथ विंचूरकर यांनी केला. देवालयाच्या पुढच्या बाजूस दीपमाळ व जानकेश्वर नावाचे शिवमंदिर आहे. सतीपत्नी जानकीबाई यांच्या स्मरणार्थ रघुनाथ विंचूरकर यांनी शके १८०३ साली हे शिवमंदिर बांधले.

## नीरा नदीवरील पवित्र तीर्थे –

लक्ष्मी तीर्थ : मुख्य देवालयाच्या पश्चिम दरवाजाच्या डाव्या बाजूस घाट असून त्यावर श्रीलक्ष्मीचे देवालय आहे.या स्थानीय लक्ष्मीने तपश्चर्या केल्याने तिचा चंचलत्वाचा दोष निघून गेला.त्यामुळे या तीर्थास लक्ष्मी तीर्थ म्हटले जाते.

पद्म तीर्थ : लक्ष्मी तीर्थाच्या वरील बाजूस पद्म तीर्थ आहे.लक्ष्मीने तप केले तेव्हा श्री नरसिंह प्रसन्न झाले. भागवत दर्शनाच्या आनंदाने लक्ष्मीच्या हातातील पद्म या स्थानी गळून पडले.तसेच कुबेराला धनप्राप्ती याच ठिकाणी झाली.

शंख तीर्थ : नरसिंहाचे शंख नावाचे आयुध या ठिकाणी वास्तव्य करते.

पिशाच्च विमोचन तीर्थ : पित्र-पिशाच्च योनीतून मुक्त होण्यासाठी या तीर्थावर स्नान करणेविषयी सांगितले आहे.या तीर्थावर नारायण नागबली , त्रिपिंडी (पिंडदान) , कालसर्प योगशांती , ग्रहशांती , नक्षत्र शांती या सारखे विधी केल्याने सर्व दोष नाहीसे होतात.

नरसिंह तीर्थ : हिरण्यकश्यपूचा वाढ केल्यानंतर श्री नरसिंहानि याच स्थानी वास्तव्य केले . हे स्थान एकांत रम्य असून येथे नीरा नदीवर घाट बांधला आहे.या घाटावर डोंगर कपारीतील मंदिरात श्री नरसिंहाची तांदळास्वरूप मूर्ती आहे.बाजूस यात्रेकरूंसाठी ओवऱ्या बांधल्या असून त्यापैकी एका ओवरीत मारुतीची मूर्ती आहे. येथील एकांत इतका अदभूत आहे की येथे जलप्रवाहाच्या ध्वनीशिवाय अन्य कोणताही ध्वनी येथे ऐकू येत नाही. तसेच याठिकाणी हंसतीर्थ , इंद्रतीर्थ, तारातीर्थ, दुर्वासतीर्थ ,कपिलतीर्थ, गणेशतीर्थ इत्यादी तीर्थे आहेत.

## श्री'स होणारे नित्य पूजा विधी व उपचार –

काकड आरती : पहाटे पाच वाजता सूर्योदयापूर्वी पूजाधिकारी देवालयाची द्वारे उघडून श्री'सह सर्व परिवार देवतांना काकड्याणे ओवाळतात.यावेळेस श्रींस खिचडीचा नैवैद्य दाखविला जातो.

प्रातःपूजा : सकाळी ७ वाजता पहिल्या प्रहरात हि पूजा पूर्ण होते.श्री नरसिंह व श्री शामराज या दोन्ही मूर्तींस पंचामृत स्नान घालून षोडशोपचार पूजा होते.नरसिंहपूर प्रथेनुसार ऋग्वेदीय व सामवेदीय सुक्तांनी तसेच पौराणिक मंत्रांनी पूजा केली जाते.नंतर श्री मूर्तीस पोशाख परिधान केला जातो.धूप दीपाने आरती होऊन श्रीस पायसाचा नैवेद्य दाखविला जातो.नंतर परिवार देवतांची पूजा केली जातो.

माध्यान्हपूजा : दुपारी १२ वाजता श्रींस पुरणपोळीचा महानैवेद्य दाखविला जातो.व महाआरती केली जाते.

सायंपूजा : सायंकाळी ७ वाजता श्रींस पंचोपचारे मंत्र स्नान घालून धूप दीप नैवेद्य युक्त पूजा केली जाते.या वेळी नगार खाण्यातील नगारा नौबत ,झांज , घाटी वाजवली जाते.

शेजारती : रात्रौ ९ वाजता श्रींची शेजारती केली जाते.शेजारती नंतर चम्पूप्रार्थना म्हणण्यात येऊन श्रींस दुधाचा नैवेद्य दाखविण्यात येतो.या सर्व विधी नंतर श्री नरसिंहाची क्षमा मागून पूजाधिकारी द्वारे बंद करतात.

मराठी वर्षामध्ये होणारे सण व उत्सव –

चैत्र : गुढी पाडव्याच्या दिवशी श्रींना पवमान (पंचसुक्त) अभिषेक करण्यात येतो.व अलंकार पूजा बांधण्यात येते तसेच मंदिरात गुढी उभारण्यात येते.रामनवमी दिवशी रामजन्म सोहळा तसेच हनुमान जयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.या दरम्यान शिखर शिंगणापूर येथे श्री महादेवाच्या दर्शनासाठी यात्रेकरू मोठ्या प्रमाणावर येतात.

वैशाख : वैशाख नवरात्र महोत्सव  हा येथील सर्वात मोठा उत्सव. वैशाख शुद्ध ६(षष्ठी) श्रींचे नवरात्र उत्सवास प्रारंभ होऊन वैशाख शुद्ध १४ (चतुर्दशी)या दिवशी नरसिंह जयंती सायंकाळी जन्मकाळ सोहळा होतो.वैशाख शुद्ध १५ (पौर्णिमा) या दिवशी पारणे केले जाते त्या रात्री श्रींच्या पादुका पालखीत ठेवून सवाद्य मिरवणूक काढली जाते. दुसरे दिवशी दही हंडी काला व लळीत होऊन उत्सवाची समाप्ती होते या दरम्यान उत्सवामध्ये श्रींसमोर भक्ती संगीत , भजन , व्याख्यान , प्रवचन व रात्रौ नारदीय कीर्तन सेवा इत्यादी कार्यक्रम केले जातात. उत्सव काळात श्रींस विविध अलंकार पूजा चंदनउटी पूजा , पुष्प रचना पूजा , महावस्त्र पूजा बांधण्यात येतात.संपूर्ण वैशाख महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नरसिंह भक्त कुलधर्म कुलाचार करण्यासाठी येतात.

जेष्ठ : जेष्ठ शु. १ ते जेष्ठ शु. १० या दशहार पर्वकाळामध्ये श्रींस अनेक भक्तांकडून सेवा अर्पण केली जाते. वटपौर्णिमेस सुवासिनीकडून वडपूजन केले जाते.

आषाढ : आषाढी एकादशीस श्रींना महापूजा करण्यात येते. आषाढ शु. १५ ( गुरु पौर्णिमा ) स भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येतात.

श्रावण : नागपंचमीच्या दिवशी मंदिरामध्ये नागपूजन व सामुदाईक श्रावणी केली जाते. तसेच गोकुळ अष्टमीस सप्ताह आयोजन करून श्रीकृष्ण जन्म साजरा केला जातो.

भाद्रपद : गणेश चतुर्थी उत्सव  मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.गणपती अथर्वशीर्ष पठण व गणेश यागाचे आयोजन केले जाते.

आश्विन : अश्विन शु.१ ते अश्विन शु.९ शारदीय नवरात्र उत्सव मंदिरामध्ये साजरा केला जातो. दसऱ्याच्या दिवशी श्रींस व महालक्ष्मीस महाअभिषेक , महावस्त्र पूजा अर्पण करण्यात येते.सायंकाळी सीमोल्लंघणासाठी श्रींची पालखी निघते.गावाच्या वेशीवर जाऊन आपटा पूजन करून सोने लुटण्याचा कार्याक्रम होतो.नरक-चतुर्दशी दिवशी पूजाधिकारी दंडवते यांच्याकडे कुरवंड्या श्रींस ओवाळतात. श्रींस अलंकार पूजा बांधलेली असते.श्रींची पालखी संगमावर जाते.

कार्तिक : बलीप्रतीपदेदिवशी पहाटे श्रींस अभ्यंग स्नान घालून श्रींस अलंकार पूजा बांधली जाते ,या दिवशी डिंगरे पूजाधिकारी यांच्याकडे कुरवंड्या असतात. याहि दिवशी पालखी संगमावर जाते. तुळशी विवाह- कार्तिक शु.१२ या दिवशी श्रींचा तुल्शीशी विवाह लावला जातो.वैकुंठ चतुर्दशीस गरुडाची (वाहन) सवाद्य मिरवणूक काढली जाते.

मार्गशीर्ष :  मार्गशीर्ष शु. पौर्णिमा या दिवशी दत्त जयंतीचा उत्सव होतो.शके १७८७ साली रघुनाथराव विंचूरकरांनी देवालयाचा जीर्णोद्धार करून याचा उत्सर्ग केला होता.याचा वर्धापनदिन प्रतिवर्षी मार्गशीर्ष व.९-१० या दिवशी केला जातो.

पौष : भोगीच्या दिवशी श्रींची पालखी निघते.मकर संक्रांतीचे दिवशी सुवासिनी श्रींस व लक्ष्मीस वाणवसा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात.

माघ : माघी एकादशी व महा शिवरात्रि या दिवशी नीरा-भीमा संगम स्नान करून भक्त दर्शनास येतात.

फाल्गुन : पौर्णिमेचे दिवशी देवालायामध्ये होळीकापूजन करतात. रंगपंचमीचे दिवशी श्रींस श्वेत रंगाचा पोशाख परिधान करून श्रींचे अंगावर केशरी रंगाची उधळण केली जाते.

नरसिंहपूरला भेट देण्याची योग्य वेळ :-

नीरा नरसिंहपूर येथे वर्षभरामध्ये कधीही येऊ शकता.पावसाळ्यामध्ये तुम्ही नीरा व भीमा या दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांचा आनंद घेऊ शकता.हिवाळा व उन्हाळा या दोन ऋतूमध्ये आल्हाददायक वातावरणामध्ये येऊ शकता.

निवास व्यवस्था :- नीरा नरसिंहपूर देवालयात भक्तांसाठी देवालयात खोल्या उपलब्ध आहेत व क्षेत्रोपाध्याकडे निवास व भोजन व पूजाविधी करण्याची सोय आहे.तसेच लॉजिंगसाठी टेंभुर्णी येथे व्यवस्था आहे.

-शब्दांकन
पत्रकार देवा राखुंडे,
प्रतिनिधी इंदापूर, पुणे

# इंदापूर येथील ऐतिहासिक इंद्रेश्वर मंदिर

## इंद्रेश्वर मंदिराचा इतिहास

इंद्रश्वेर महादेव मंदिर हे शहरातील इसवी सन बाराव्या शतकातील पौराणिक मंदिर आहे. सतत पाण्याच्या धारा निर्माण होतात अशा शहरातील पाणदरा येथे ऋषी,मुनींनी मंदिरातील पुरातन शिवलिंगाची स्थापना केल्याची आख्यायिका सांगितली जाते. छ. शिवरायांचे आजोबा मालोजीराजे यांच्या गढीच्या पायथ्याशी हे मंदिर आहे. याच मंदिरात मालोजीराजेंच्या पादुका ठेवण्यात आल्या आहेत.

लोकवर्गणीतून या इंद्रेश्वर मंदीराच्या जिर्नोध्दाराचे काम करण्यात आले. लोकवर्गणी, देणगीतून हे देखणे देवालय साकारले गेले आहे. इंदापुरातले शिल्पकार अनिल चौगुले, बाबासाहेब वीटकर यांनी अथक परिश्रमातून सुबक असे शुभ्र शिखराचे बांधकाम केले आहे. २०१७ साली महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला तेली समाज बांधवांच्या वतीने सातशे किलो वजनाचा काळ्या पाषाणात घडवलेला नंदी शिवराज भिसे, अभिजीत जठार, महेश भिसे यांच्या हस्ते श्री इंद्रेश्वर ट्रस्टच्या स्वाधीन करण्यात आला असून पंढरपूरचे मूर्तिकार मंडवले यांनी ही नंदीची मूर्ती घडवली आहे. इंदापूरचे ग्रामदैवत श्री इंद्रेश्वर महादेव मंदिराचा वास्तुशांत, कलशारोहण, शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना सोहळा योगवेदांत पंडिता १००८ महामंडलेश्वरी माता गीता भारती यांच्या हस्ते पार पडला. तत्पूर्वी, पूर्वीच्या मंदिरातील पुरातन शिवलिंग नव्या मंदिरात प्रतिष्ठापना करण्यासाठी आणण्यात आले. योगवेदांत पंडिता १००८ महामंडलेश्वरी माता गीता भारती यांच्या हस्ते विधिवत पूजा करून तसेच, मान्यवरांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा सोहळा, मंदिराचा वास्तुशांत, कलशारोहण आणि ध्वजस्तंभ आदी सोपस्कार करण्यात आला. या मंदिरावर बसवनेत आलेला पितळी ध्वज हा अलाबाद येथून मागवण्यात आला असून जीर्णोद्धाराच्या कामासाठी आत्तापर्यंत वीस लाख रुपये जवळपास खर्च झाला.

प्रासाद वास्तुशांत पिठांची पूजा त्यामध्ये गणपती पूजन, पुण्याह वाचन, मातृका पूजन, ६४ योगिनी पूजन, घृत




मातृका पूजन, एकलिंग तो भद्रपूजन, नवग्रह पूजन, वास्तूपीठ पूजन, क्षेत्रपाल पूजन, ब्रह्मामंडल पूजन, होमहवन विधी पूर्ण करुन या मंदिरातील मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा ११ मार्च २०१७ रोजी पार पडला. यावेळी एका दिवसाला तीन टप्प्यात ७५ जोडपी अशी सलग सात दिवस होम हवन पूजेसाठी बसवण्यात आली होती. इंद्रेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र वाशिंबेकर, माजी नगराध्यक्ष अशोक इजगुडे, संदीप वाशिंबेकर, अजिंक्य इजगुडे, भावेश ओसवाल, आस्वाद जौंजाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी दि. २३ मार्च २०१६ रोजी हाती घेतलेले मंदिर जीर्णोद्धाराचे काम वेळात तडीस नेले.

-शब्दांकन,
पत्रकार देवा राखुंडे,
प्रतिनिधी इंदापूर, पुणे



# अक्कलकोट

स्थान : सोलापूरपासून ४० कि. मी. अंतरावर, महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवर.
सत्पुरूष: श्री स्वामी समर्थ.
विशेष : अक्कलकोट स्वामी समाधी मंदिर, वटवृक्ष मंदिर, खंडोबा मंदिर शिवपुरी, राजेरायन मठ,मल्लिकार्जुन मंदिर (जंगम मठ)...

अक्कलकोटची भूमी ही स्वामींच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. सोलापूरहून स्वामी जे अक्कलकोटला आले ते शेवट पर्यंत तेथेच राहिले. अक्कलकोट हे मुख्यतः तालुक्याचे ठिकाण असून ते सोलापूर जिल्ह्यात आहे. सदर क्षेत्र हे महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमेवर आहे. समर्थ भक्त हे ठिकाण पवित्र आणि प्रासादिक मानतात. हजारो भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे स्वामी आज हि येथे आहेत अशी भक्तांची पूर्ण श्रद्धा आहे.

१)श्री वटवृक्ष मंदिर :

अक्कलकोटचा विकास मुख्यत्वे करून या मंदिराचे व्यवस्थापनाने झाल्याचे दिसते. येथे एक भव्य स्वामी मंदिर आहे. त्यात मुख्यतः श्रीच्या पादुका, शिवलिंग, स्वामींच्या स्मृती वस्तु, प्रवचन हॉल छोटीशी निवास व्यवस्थाही आहे. या परिसरात प्रवेश करताच मन स्वामीचरणी गुंतून जाते. स्वामींनी अनेक लीला याच परिसरात केलेल्या आहेत. या परिसरात वटवृक्षा खाली छोटयाशा मंदिरात स्वामींच्या पादुका आहेत त्याला कांन लावल्यावर अनेक वादयांचे आवाज येतात असा भक्तांचा अनुभव आहे. स्वामींचा त्यांचे जीवन कालात सर्वत्र वावर होता पण जास्त येथे व चोळप्पाचे मठात होता.

अनेक सिद्ध पुरुष त्याकाळी व नंतरही या ठिकाणी येऊन गेल्याने हे पावित्र्य वाढलेलेच आहे. वटवृक्ष मंदिरातही सकाळी अभिषेक, रुद्रापठण चालते. येथे अनेक जुने फोटो लावलेले आहेत. येथेच मारुती मंदिर, व शिव पिंड आहे. सातत्याने येथे भजन कीर्तनाचे व आध्यात्मिक प्रवचनेही चालतात. त्रिकाल आरती होते. जवळच संस्थानचे ऑफिस आहे. भक्त द्रव्य रूपाने येथे



सेवा अर्पण करू शकतात. सदर ट्रस्ट मार्फत येथे मंदिरालगत भक्त निवासाची व्य वस्था आहे. तसेच गाणगापूर रस्त्याला अद्ययावत असे भक्तनिवास ५-६ इमारती स्वरूपात भक्तांच्या सेवेस हजर आहे. तेथे छोटेखानी उपहार गृह आहे. येथेच स्वामींचे कायमस्वरूपी संग्रहालय आहे यात स्वामींच्या जीवनदर्शन घडवणारे फोटो व वस्तू आहेत. त्यातील काही फोटो अचम्बीत करतात. येथेही स्वामींची एक मूर्ती आहे. येथे पार्किंग व राहण्याची उत्तम सोय आहे.

अक्कलकोटचे स्वामी वटवृक्ष मंदीरात पोचल्यावर श्रीस्वामी महाराजांची शांत मूर्ती पहिल्यावर भान विसरायला होत. माणसाचे अहंभाव आपसुक गळूनपडतात. त्या आनंदाचे विश्लेषण करता येणे अशक्यअसते, परंतु डोळ्यात आपोआप आनंदाश्रु तरळतात. ही कोणती शरणागती असते जी देताना राग लोभ मत्सर मोह व मायेने ग्रासलेल्या मनुष्यासही आनंद देते, कळतनाही. असे वाटते की जगात हेच एकमेव चरणद्वय आहेत जेथे डोके टेकवून आपले सुख दुःख, पाप-पुण्य, सारे मनोगत, मनोरथ सांगून टाकावे.बालहट्ट हट्ट धरावा. रुसावे-फुगावे, लाड करवून घ्यावे! स्वामी महाराजांकडे अशी कोणती जादू आहे ज्यामुळे शहरातून आलेली तरुणाई सुद्धा तासन् तास पारायणाला बसतात. रांगेत गोंगाट करणारी बच्चे कंपनीही गाभार्यात पोचल्यावर शांत होतात! खरच, स्वामी महाराजांनी

अक्कलकोटला प्रकट होवून आपल्या सर्वांचे आयुष्य उजळून टाकले आहे!

जे अनन्य भावाने मला शरण येतात, त्यांचा योगक्षेम मी स्वतः चालवतो. स्वामी नाम सदा मुखी वसो. स्वामी कमलचरणी मम नित्य प्राणविसावा मिळतो. स्वामी कमलचरणी विसावुन तरी पाहा तुम्ही सर्व प्रचिती येतसे स्वामी अभय वचनाची भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे

## २)समाधी मठ :

चोळप्पाचे निवासस्थान व नंतरचे समाधी स्थान हे एसटी स्टँड जवळील बुधवार पेठेत आहे.हा जुने खानी वाडा सध्या नूतनीकरण चालू आहे. जवळच स्वामींनी पुनर्जीवित केलेली विहीर, स्वयंभू गणपती, स्वामींचा दंड, पादुका या प्रासादिक वस्तू येथे दर्शनास उपलब्ध आहेत. दररोज सकाळी येथे पूजा, अभिषेक, लघुरुद्र, महापूजा इ. धार्मिक विधी भक्त अत्यंत श्रद्धेने करतांना दिसतात.

अभिषेकानंतर समाधी वस्त्रांनी पुसून त्यास सोवळे व करवतकाठी उपरणे पांघरतात. समाधीवर



स्वामींचा मुखवटा ठेऊन त्यावर फुलांची आरास करतात. हे दृश्य अतिशय नयन मनोहर असते.

प्रदक्षणा करून नमस्कार करताना स्वामींच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचा भास होतो हे मात्र नक्की. स्वामींच्या काळा पासूनच या वास्तूला महत्व आहे.



# श्रीगुरुमंदिर



-बाळप्पा महाराज मठ, अक्कलकोट, जि. सोलापूर

धारवाड जिल्ह्यातील (कर्नाटकराज्य) श्रीमंत सराफ बाळप्पा वयाच्या ३० व्यावर्षी संसाराचा त्याग करून अक्कलकोटला गुरुशोधार्थ गेले. श्रींनीअनुग्रह देऊन आपल्या आत्मलिंग पादुका त्यांना देऊन मठ बांधण्याची आज्ञा केली आणि म्हटले, माझ्या आत्मलिंग पादुका घेऊन त्यावर एखादा उत्तम मठ स्थापन कर. तेथे फुलझाडे लावून बाग कर व ठरलेले वार्षिक उत्सव करीत जा. म्हणजे चांगले फळ मिळेल. त्यानुसार बाळप्पांनी मठ स्थापन केला. प्रस्तुतमठात समर्थांचा दंड, छाटी, कंठमणी, माळ इत्यादी पवित्र वस्तू ठेवलेल्या आहेत. बाळप्पांनीश्रीसमाधीस्थ झाल्यानंतर भारतभर संचार करून शेवटी अक्कलकोटला स्वामी मठ स्थापन करून श्रींचा कीर्तीध्वज फडकविण्याचा मान मिळविला. त्यांच्यानंतर त्यांचे शिष्य गंगाधर महाराज व गजानन महाराज यांनी ती धुरा वाहून नेली. यामठात गुरुपौर्णिमा, दत्तजयंती,स्वामी जयंती वगैरे उत्सव मोठ्या उत्साहाने पार पाडले जातात.

## जंगमांचे शिव मंदिर :

स्वामींनी शिवलींगावर शेणी रचून अग्नी पेटविला. जंगम चिडले व स्वामींना मारण्यास आले. ३ दिवस अग्नी पेटत होता. ३ दिवसा नंतर शिवलींगाला काहीही हानी न होता, ते अधिच तेजस्वी झाले.




## शेखनूर दर्गा :

स्वामी कित्येकदा ह्या दर्ग्यावर येत. मन्नत मागण्याकरता आलेल्या कित्येकांना स्वामी सांगत की दर्ग्यावर चदर चढवा. तिथल्या फकीराना भोजन द्या.



मा.सुरेशजी दिवटे
अध्यक्ष,
विश्व शांती शिक्षण प्रसारक मंडळ,


मा.निवृत्ती दिवटे
मुख्याध्यापक,


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
ज्ञानसागर वरिष्ठ महाविद्यालय,
जाफराबाद, जि.जालना

# या क्षेत्री केव्हा व कधी यावे

अक्कलकोट (सोलापूर, महाराष्ट्र) -

अक्कलकोटचे वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्तावतारी सिध्दपुरुष होते. पंजाब राज्यात पानिपत जवळ छेलीया खेडेगावी गणेश मंदिराजवळ जमीन दुभंगून अष्ट वर्षाची मूर्ती प्रकट झाली. त्या मूर्तीने लगेचस्वामी समर्थ हा मनुष्यरूपी देह धारण केला. त्यानंतर त्यांनी कर्दळीवनात जाऊन ३०० वर्षे तपश्चर्या केली. ३००वर्षे तप करतांना त्यांच्या अंगावर वारूळ निर्माण झाले. एका लाकूड तोड्याने झाडतोडतांना त्याच्या कुरहाडीचा घाव स्वामींच्या मांडीला लागला. त्यामूळे त्यांची तपश्चर्या भंग होऊन स्वामी लोक कल्याणासाठी कर्दळीवनातून बाहेर पडले.

फिरत फिरत स्वामी १८४४ साली मंगळवेढ्यास आले. तेथे बारा वर्षे राहून चैत्र शुध्द द्वितीया १८५६ साली अक्कलकोटला आले. अक्कलकोटला त्यांचे वास्तव्य २२ वर्षे म्हणजे त्यांचे समाधी काळपर्यंत होते. त्यांचे चरित्र चमत्काराच्या कृतीने भरलेले आहे. त्यांचे वास्तव्यनेहमी वटवृक्षाच्या खालीच असे. त्यावेळचे इंग्रजपत्रकार व इतिहासकार जनरल अल्कार्ट हे अक्कलकोटला आले असता त्यांनी स्वामींचे दर्शन घेऊन ब्रिटन मध्ये गेल्यावर असे जाहीर केले की, आजच्या काळात प्रभू येशू पहावयाचे असेल तर ते अक्कलकोटला आहे. स्वामींनी चैत्र शुध्द त्रयोदशी सन १८७८ मध्ये अक्कलकोट इथे दुपारी १२ वाजतासमाधी घेतली.

अक्कलकोट हे सोलापूर पासून ३५ कि. मी. अंतरावर आहे. सोलापूरहून अक्कलकोटसाठी नियमीत बससेवा आहे. इथे राहण्यासाठी भक्त-निवास आहे व अन्नक्षत्र मंडळातर्फे



दुपारी १२ व रात्री ८ वाजता महाप्रसादाची सोय आहे. परब्रह्म परमेश्वर सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराजांचे परमशिष्य भक्तशिरोमणी संजीवन योगी श्रीमद सद्गुरू श्री आनंदनाथ महाराज विरचित भजनानंद लहरी अभंग मध्ये आपल्या स्वामी भक्तांना सांगतात;

जारे जारे जारे अक्कलकोटीं जारे।।साधोनियां घ्यारे आपुल्या हीता।।१।।
यारे यारे यारे मनोभावें यारे ।। शांतिसुख घ्यारे पायांपाशीं ।।२।।
घ्यारे घ्यारे घ्यारे स्वामीनाम घ्यारे।।दूर होती फेरे चौऱ्यांशीचे।। ३।।
न्यारे न्यारे न्यारे शुद्ध भाव न्यारे।। मेळउनी घ्यारे मोक्षपदा ।। ४ ।।
आनंद म्हणे तरी सोय दवडू नका।।सांगतसे सुखालागीं तुमच्या।। ५।।

-रुद्रया स्वामी,
अक्कलकोट, सोलापूर


**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,**
हिंगणघाट, जि.वर्धा

- तीन माध्यमिक शाळा ■ दोन उच्च माध्यमिक विज्ञान
- एक उच्च माध्यमिक कला ■ एक व्यवसाय अभ्यासक्रम.
- तीन मराठी प्राथमिक ■ दोन इंग्रजी कॉन्व्हेन्ट, ■ एक रात्र शाळा

रमेश धारकर - सचिव
श्याम भीमनवार - उपाध्यक्ष
गोकुलदास राठी - अध्यक्ष

दिपावलीच्या शुभेच्छा!

वैशिष्ट्ये
- सर्व शाळा आखिल भारतीय शिक्षा संस्थान दिल्ली विद्याभारतीशी संलग्र.
- सर्व भौतिक सुविधायुक्त, सुसज्ज इमारत, पटांगण, स्वच्छता गृह.
- सुसज्ज प्रयोगशाळा, संगणक कक्ष, स्वतंत्र पाक गृह.
- दरवर्षी निकाल वृध्दी - शतप्रतिशत निकालकडे वाटचाल.
- विद्याविभुषित शिक्षक, आचार्य वृन्द.
- दर्जेदार संस्कारक्षम शिक्षण, आचार्य वृन्द.
- राष्ट्रनिष्ठ नागरीक तयार करण्याचा संकल्प.
- सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून शाळा संचालन.

कार्यकारिणी सदस्य : विजयसिंग मोहता, प्रमोद हंबर्डे, बळवंत वाघे, विजय अग्रवाल, भुपेंद्र शहाणे, संजय देशपांडे, शरद मुरसे, रमेश टपाले, सहसचिव बळीराम चव्हाण.

# नवसाला पावणारी डावरगांव देवीची जगदंबा माता



भाविक भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी तसेच जाफराबाद तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जातीय धर्मियांचे पवित्र व मोठ्या श्रद्धेचे देवस्थान म्हणून डावरगांव देवी येथील जगदंबा मातेची ख्याती महाराष्ट्रभर आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला अर्थातच हनुमान जयंतीला देवीची मोठी यात्रा असते. तसेच नवरात्र उत्सव अश्विनी शुद्ध प्रतिपदे पासुन ते विजयादशमी पर्यंत ९ दिवस विविध काकडा, हरिपाठ, कीर्तन सप्ताह, देवी भागवत कथा आदींचे आयोजन केले जाते. भाविक भक्तांच्या नवसाला पावणारी व हाकेला धाव घेऊन येणारी अशी मातेची कीर्ती असल्याने महाराष्ट्रभरातील भाविक येथे मोठी गर्दी करून मातेच्या चरणी नतमस्तक होऊन आपला नवस बोलतात.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, आजच्या विज्ञान व आधुनिक युगात देवाधिकांना न मान्यांची तसेच विश्वात देवाचे अस्तितत्त्वात नसल्याचे बोलल्या जात असले तरी भक्तांना येणारा सु:खद दु:खद अनुभव व दैवी चमत्कारामुळे अनेकांची देवावर असलेली भोळी भाबडी श्रद्धा कायम ना कायम असल्याने अनेक ठिकाणी दिसून येते. त्यापैकी डावरगांव देवी येथील मातेचे स्थान असून पूर्णा नदीच्या तीरावर उंच आशा निसर्गरम्य व मनमोहक रमणीय टेकडीवर निजामकालीन जगदंबा मातेचे हेमाडपंथी मंदिर वसलेले आहे. या मंदिराच्या पूर्वाभिमुख देवीचा तांदळा असून हजारो भाविक आपले नवस फेडण्यासाठी मनोभावे हजेरी लावतात. आपला नवस बोलून पूर्ण व्हावा यासाठी भावीक नवसाचे नारळ देवीच्या समोर दरवाजाला बांधून ठेवतात. व नवस पूर्ण झाल्यास नारळ सोडून घेत नवस फेडला जातो. यात्रेच्या दिवशी लहान बालकांना वाजत गाजत हळदी लावून व लिंबाचा पाला सर्व अंगाला गुंडाळून पूर्णा नदीतील महादेव मंदिरापासून ते जगदंबा मातेच्या मंदिरा पर्यंत आणल्या जाते. ही प्रथा निजामकालीन असल्याचे बोलल्या जात आहे. दर पौर्णिमेला आरती ,नामसंककीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. या चमत्कारीक दैवी शक्तीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात भर जगदंबा मातेची श्रद्धा आजही भक्तच्या मनामध्ये असल्याने भक्त नतमस्तक होऊन मातेची मनोभावे सेवा करीत आहे.या देवस्थानाला पर्यटन स्थळाला दर्जा प्राप्त असून शासनातर्फे परिसर विकासाची कामे झालेली आहे.

–प्रताप नवले,
तालुका प्रतिनिधी
जाफराबाद, जि.जालना,


परभणी कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी

स्थापना : ०५.१२.१९४२ फोन : २२२७०६

| | | |
|---|---|---|
| श्री विलास माणिकराव मस्के | श्री दिलीप सुंदरराव आवचार | श्री समशेर सुरेशराव वरपुडकर |
| सचिव | उपसभापती | सभापती |
| गणेशराव घाटगे | विजयराव जामकर | सोपानराव आवचार |
| तानाजीराव भोसले | बाळासाहेब रसाळ | चंद्रकांतराव पांगरकर |
| सौ.लताबाई इंगळे | सौ.काशीबाई रेंगे | गंगाप्रसाद आनेराव |
| पांडूरंगराव लोखंडे | विनोदराव लोहगांवकर | संदिपराव झाडे |
| घनश्यामराव कनके | संदिपजी भंडारी | रमेशराव देशमुख |
| फैजुल्ला खान अहमद खान पठाण | रामराव आरगडे | नारायणराव कच्छवे |

वैशिष्टे
- मराठवाड्याती प्रमुख बाजार पेठ • वजन मापाची चोख व्यवस्था (३० मे.टन भुईवजन काट्यासह)
- ईनाम योजने अंतर्गत मार्केट यार्डातील ईलेक्ट्रानिक्स भूईवजन काट्यावर शेतीमालाची गेट एंट्री शेतीमालाची
- गुणवत्ता तपासणी संगणकीय जाहिर लिलाव व शेतकऱ्यांच्या खात्यात ऑनलाईनव्दारे रक्कम अदाई
- शेतमाल तारण कर्ज योजने अंतर्गत शेतकऱ्यांनी तारण ठेवलेल्या शेतीमालावर ६ टक्के व्याजदराने २४ तासांचे
- आंत तारण कर्ज अदाई • शेतकऱ्यांना मार्केट यार्डवर आवश्यक त्या सुखसोई उपलब्ध
- विक्री केलेल्या शेतीमालाची रक्कम विक्रेत्यास त्वरीत मिळवून देण्याची चोख व्यवस्था व हमी
- शेतीमाल विक्री संबंधी तक्रार झाल्यास त्वरीत निर्णय • नविन अग्निशमन वाहन खरेदी.
- काटन टेक्नालॉजी मिशन अंतर्गत कापूस विक्रीची उघड लिलाव पध्दतीने चोख व्यवस्था
- शेतकऱ्यांना एसएमएस व्दारे व भ्रमणध्वनीव्दारे बाजार भावाच्या माहितीच्या सुविधा
- प्रोजेक्शन टिव्ही व एमआडी (मार्केटिंग इन्फार्मेशन डिस्प्ले) वर राज्यातील प्रमुख बाजार पेठाची बाजार भावाची माहिती • शेतकऱ्यांना स्वच्छ व निर्मळ माल विक्रीस्तव आणण्यासाठी प्रचार व प्रसिध्दी यंत्रणा

# ब्राम्हा विष्णू महेशाचे वास्तव्य असलेले महाराष्ट्रातील एकमेव हेमाडपंथी मंदिर....!

## उमरगा शहराचे ग्रामदैवत हेमाडपंथी महादेव मंदिर....... एक रहस्य....!

हजारो वर्षापूर्वी बनलेले हे मंदिर सतयुगापासून अस्तित्व असलेले अनेक पुरावे आढळतात. मंदिराच्या देखरेख वा रखरखावासाठी इ.स. १९६५ ला धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये मंदिर कमिटीचे नोंदणी करण्यात आली. व प्राचिन काळापासून चालत आलेली परंपरा प्रतिवर्षी जत्रा, शहरातून श्रींच्या काटीची भव्य मिरवणूक, जंगी कुस्त्या व विविध पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन करून एक आगळा-वेगळा पुरातन सांस्कृतिक ठेवाचे उमरगा शहरात जतन केले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऐयातून व देशातील विविध प्रांतातून भाविकभक्त व जिज्ञासू वृत्तीचे संशोधक येथे या हेमाडपंथी मंदिरात ब्राम्हा विष्णू महेशाच्या दर्शनासाठी येतात.




महाराष्ट्रातील हा एकमेव हेमाडपंथी मंदिर आहे, जिथे एकाच मंदिरात ब्राम्हा विष्णू महेश म्हणजेच सृष्टीचा कर्ता करविता आणि संहार करणाऐया देवताचे दर्शन होते. श्रावणशुध्द ते भाद्रपद शुध्द या कालखंडात सुर्याची कोवळी किरणे मंदिरातील विष्णूच्या गाभाऐयातील पिंडावर पडतात, ही अभूतपूर्व अकल्पनिय बाब आहे. हे दृश्य पाहण्यासाठी भाविकांची एकच गर्दी दिसून येते.

मंदिराच्या आरंभीला समोर जय आणि विजय द्वार रक्षक दोन्ही बाजूस आहेत. सप्तपाताळ म्हणजेच सात पायऐया चढल्यावर मुख्यप्रवेशद्वार आहे. या पायऐया चढताना विविध चित्रे हत्ती, देवी-देवतांच्या प्रतिमा अतिशय सुंदर उत्कृष्ठ रूपात कोरीव काम केलेले दोन्ही बाजूस दिसते. प्रवेशद्वाराच्या मुख्य खांबावर एकाच दगडात ब्राम्हा विष्णू महेशाचे कोरीव काम केलेले दिसते. त्यात मध्यस्थानी शिवपार्वती, डाव्या बाजूस चतुर्मुखब्राम्हा आणि उजव्या बाजूस विष्णूचे कोरीव लेणीचे रूप पाहून भाविक तृप्त होतात. पुरातण काळापासून असे म्हटले जाते की, जो कोणी रुग्ण वा आजाराने(दु:खाने) ग्रासलेला भक्त गर्वहीण पुर्ण श्रध्देने या द्वारातून प्रवेश करतो, त्याचे दु:ख नष्ट होते, असे अनेकांना अनुभुती आलेली आहे. अशी अख्यायिका आहे.

मंदिरातील मध्यमंदिरातील नंदीच्या मागे अष्टदल आहे. जे की एकाच दगडामध्ये कोरलेले आहे, हे पाहणाऐयाला अशक्य बाब वाटणार हे नक्की. असे अष्टदल मंदिराच्या मंडपात चारही बाजूला असून एकूण पाच दिसून येतात. मध्य मंडप हा सोळा खांबी आहे. मंदिराच्या मध्यभागी मंडपात नंदीच्या जवळ उभे राहून वरी पाहिल्यास सहरुा दल म्हणजे हजार पाकळ्यांचा कमळाचे कोरिव काम अचंबित करणारे दिसून येते, तर सोळा खांबापैकी मध्यभागी असलेल्या चार मुख्य खांबावर चार तुळया आणि प्रत्येक खांबावर तीन-तीन अष्टदल आहेत व विशेष स्वागतासाठी स्वागत मुर्तीचे पाषाणात कोरीव भरीव चित्र उठून दिसते.

मुख्य प्रवेशद्वाराच्या आत आल्यावर उजव्या बाजूस मंदिर आहे, तो ब्राम्ह देवाचे वास्तव आहे. या मंदिराच्या प्रवेश द्वारावर देखील ब्राम्ह देवाचे कोरीव नक्षत्र दिसून येते, तर या मंदिराला दोन गाभारे आहेत. मधल्या गाभाऐयामध्ये ब्राम्ह देवाची मुर्ती नयनाला तृप्त





करते. ही मुर्ती अष्ट कोनावर प्रतिष्ठित आहे. या मुर्तीच्या समोरच, शेंदून घेण्यासाठी पाण्याचे आड(विहीर) आहे. पण ती विहीर सद्यस्थितीत बंद करण्यात आली आहे.

मुख्य प्रवेशद्वाराच्या आत आल्यावर अगदी नजरे समोर असलेले मंदिर म्हणजे साक्ष्यात विष्णू वास्तव्य आहे. या मंदिराच्या प्रवेशदारावर वरच्या बाजूस विष्णू देवताचे मुर्तीचे कोरीव काम केलेले असून, मधल्या गाभाऐयात अष्टदल आहे. विष्णू देवताच्या मुख्यद्वाराच्या उंबऐयावर स्वयंभू (सोंड नसलेला) गणतीचे दर्शन होते. व लहानमोठएा देवी-

देवतांच्या कोरीव नक्षीकाम केलेले आहे. विष्णू देवताच्या गाभाऐयामध्ये साक्षात विष्णू देवताचे अडीच फुटाची मुर्ती अष्टकोनी लिंगावर स्थानापन्न असलेले पाहून मन तृप्त होते. या मुर्तीच्या समोरच करकरीत काळ्या अखंड पाषाणाचे शिवलिंग आहे.

मुख्य प्रवेशद्वाराच्या आत डाव्या बाजूला सृष्टीचा संहार कर्ता प्रभू महेशाचे मंदिर आहे. या मंदिराच्या मुख्यद्वारावर एकाच दगडामध्ये नटराज-शंकर व नंदीचे कोरीव काम केलेले दिसून येते. आतमध्ये प्रवेशद्वारावर डाव्या सोडाचा गणपती विराजमान आहेत. गाभाऐयामध्ये दीड फुटाचे शिवलिंग आहे, तर साळुंक्याची रुंदी चार फुट बाय चार फुट आहे व लांबी पाच फुट आहे. या शिवलिंगावर दक्षिण बाजूस बाणालिंगाचे कोरीव काम अविश्वसनिय असे आढळून येते. अत्यंत दुर्मिळ व प्रभावी असे हे शिवलिंग आहे. मुख्यमंदिराच्या मध्यभागी मध्यमंडपामध्ये नंदीकेश्वर(नंदी) विष्णू देवताकडे मुख करून विराजमान आहे. या मंदिराच्या मध्य मंडपात वरच्या बाजूस सहस्त्र दलाच्या खाली आठ दिशेने, आठ दिशाचे देवता अतिशय सुंदर, अप्रतिम घडणावळीचे कलाकुसर कोरीव साच्यामध्ये केलेले आहे. हा एक सतयुगापासून अस्तित्वात असलेला हेमाडपंथी मंदिराचा अजब, अद्भुत, अकल्पनिय, अवर्णनिय मंदिर आहे. मंदिराच्या इशान्य कोनाला बारव विहीर आहे. व या विहिरीध्ये देवी-देवतांच्या नानाविध मुर्तीचे दर्शन होते. मंदिराच्या सोळा खांबावर केलेले कोरीव कलाकुसर विज्ञानालाही लाजवेल असे काळ्या पाषाणात भरीव कोरीव काम केलेले आहे. जणू एका खांबावर केलेले कलाकुसर पाहण्यास दिवसही अपुरा पडणार हे नक्की....!

मंदिराच्या बाहेरील चोहू बाजूने अवलोकन केल्यास एकूण नऊ मंदिर देवळ्या दिसून येतात. त्यात अत्यंत बारीक कलाकुसरीने नानाविध नऊ देवतांच्या अचंबित करणारे मुर्तीचे दर्शन होते. तर मंदिराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या मंदिर देऊळात विष्णू देवताची मुर्ती दिसुन येते व त्या खाली बजरंगबली पवनपुत्र हनुमानाचे वास्तव स्वरुप दिसते.

- सचिन प्रकाशराव बिद्री,
उमरगा जि. उस्मानाबाद
मो.नं. ९५९५९५०००७






# संत सहवासाने भारावलेले श्रीक्षेत्र गोरटे

महाराष्ट्रातील, नांदेड जिल्ह्यातील, उमरी तालुक्यात निसर्गाच्या सानिध्यात वसलेले हे तीर्थक्षेत्र म्हणजे *श्रीक्षेत्र गोरटे.* शीर्डी संस्थानचे पहिले अध्यक्ष, साईबाबांचे शिष्य तसेच जगप्रसिद्ध अशा *गजानन विजय* या संत गजानन महाराज यांच्या चरित्र ग्रंथाचे लेखक संतकवी दासगणू महाराज व त्यांचे शिष्य स्वामी वरदानंद भारती यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली ही नगरी आहे.नांदेडपासून पंचेचाळीस किमी अंतरावर असलेले हे तीर्थक्षेत्र अतिशय पवित्र असे ठिकाण आहे .साईबाबांच्या सांगण्यावरूनच संतकवी दासगणू महाराजांनी नांदेडच्या परिसरात पाऊल टाकले संत चरित्र लिखाणाच्या निमित्ताने तसेच कीर्तने करण्याच्या निमित्ताने या परिसरात पन्नासच्या दशकात सर्वप्रथम आले.हा परिसर लिखाणाच्या तसेच साधनेच्या दृष्टीने महाराजांना आवडल्यामुळे व गोरटे येथील भाविक कै. आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांची आई... कै.आनंदीबाई देशमुख गोरठेकर यांच्या आग्रहाने महाराज या गावी येऊन राहू लागले .दासगणू महाराजांच्या पश्चात त्यांचे शिष्य स्वामी वरदानंद भारती यांनी शिष्य परिवाराच्या आग्रहास्तव या ठिकाणी संतकवी दासगणू महाराजांची वस्त्र समाधी बांधली आहे. येथील परिसर जवळपास चार ते पाच एकरचा असून त्यात गोशाळा, बगीचा, संजीवनी स्मृती दालन, भोजन मंडप, कीर्तन मंडप, ध्यानमंदिर असा विस्तीर्ण पसरलेला आहे .इथे जो भाविक येतो तो येथील स्वच्छता ,पावित्र्य पाहून भारावून गेल्याशिवाय राहत नाही





या पवित्र भूमीची स्वच्छता आणि पावित्र्य राखण्याचे काम गोरठा येथील भाविक मोठ्या श्रद्धेने करत असतात. संतकवी दासगणू महाराज व त्यांचे शिष्य स्वामी वरदानंद भारती यांनी साधनेसाठी प्रयत्नपूर्वक तयार केलेले हे स्थान आहे. ही दोन संतांची तपोभूमी आहे आणि त्यामुळेच त्या वातावरणाचा सर्वसाधारण भाविकाला सुद्धा लाभ होतो .इथे वर्षभर अनेक कार्यक्रम होत असतात त्यामध्ये संतकवी दासगणू महाराज यांची जयंती, श्रीरामनवमी, दशहरा अधिकमास, गुरुपौर्णिमा, स्वामी वरदानंद भारती पुण्यतिथी महोत्सव, युवा शिबिर असे अनेक कार्यक्रम वर्षभर होत असतात. येथे आल्यानंतर राहण्याची व्यवस्था आहे .परंतु इथे आल्यानंतर जास्तीत जास्त वेळ साधनेत घालवणे अपेक्षित आहे. इथे संतकवी दासगणु महाराज व स्वामी वरदानंद भारती यांची पूर्ण ग्रंथसंपदा विक्रीसाठी तसेच वाचनासाठी उपलब्ध आहे. येथील स्वामी वरदानंद भारती यांच्या समाधीनंतर बांधण्यात आलेले त्यांचे चित्ररूप चरित्र अर्थात संजीवन स्मृति दालन जीवनाला खरी संजीवनी देणारे असेच आहे .महाराष्ट्रातील प्रत्येकाने एकवेळ तरी अवश्य भेट द्यावी असे हे ठिकाण.धन्यवाद!

-श्री मारोती मिरेवाड,
सह संभाजी सावंत,
तालुका प्रतिनिधी,
९८५००७१८१०, ९७६३०२१०१६

# तिळसा येथील प्राचीन शिवमंदिर

मुंबईपासून शंभर किलोमीटर नाशिक पासून १२६ किलोमीटर अंतरावर वाडा तालुका आहे. या तालुक्यापासून आठ किलोमीटर अंतरावर तिळसा या गावात तीळसेश्वराचे प्राचीन शिवमंदिर आहे. वाडा बस स्थानकातून येथे जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने बसची व्यवस्था केलेली आहे तर खाजगी जीप व मिनीडोअर ही उपलब्ध आहेत. मंदिर परिसरात हॉटेल नसल्यामुळे येथे जाण्यापूर्वी पाणी व इतर अन्नपदार्थ सोबत घेऊन जाणे सोयीचे होईल.





नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील ब्रम्हगिरी पर्वतातून उगम पावलेली वैतरणा नदी तिळसा येथून वाहते या नदीपात्रातील खडकांवर उभे असलेले पांडवकालीन शिवमंदिर आहे. हे मंदिर लाखो शिवभक्तांचे श्रद्धास्थान आहे दरवर्षी महाशिवरात्रीला या ठिकाणी मोठी एकदिवसीय जत्रा भरते व या जत्रेत लाखो भक्त शिवशंकराच्या दर्शनासाठी गर्दी करतात.

तालुक्यातील खेड्या पड्यातून व शेजारील तालुक्यातुन सुद्धा भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. येथील नदीपात्रात पडलेल्या गोल खड्ड्यांमध्ये असलेले देवमासे हे या ठिकाणचे वैशिष्ट्य आहे. हे मासे इतर दिवशी दिसत नाही फक्त शिवरात्रीच्या दिवशीच दिसतात या माशांनपैकी एका माश्याच्या नाकात नथ असल्याचे बोलले जाते हा मासा फक्त शिवरात्रीला पहाटेच दिसतो हा मासा ज्याला दिसतो तो भाग्यवंत समजला जातो अशी येथील शिवभक्तांचे भावना आहे.

- संजय लांडगे
प्रतिनिधी,
वाडा, पालघर

महाराष्ट्रातील सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा



कामरान खान

● एहसास जिंदगी ट्रस्ट अध्यक्ष

● परभणी जिल्ह्यात जण कल्याणासाठी नेहमीच अग्रेसर राहून काम करत असतात

● सर्व रोग निदान शिबीर , रक्तदान शिबीर, गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक साहित्य वाटप गरजू गरीब नागरिकांना राशन वाटप अश्या विविध सामाजिक उपक्रम एहसास जिंदगी ट्रस्ट चे अध्यक्ष कामरान खान हे करत असतात

तमाम जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

प्रल्हाद जाधव
जिल्हा उपाध्यक्ष
जिल्हा सामाजिक न्याय विभाग
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



जि.बुलढाणा

# अक्कलकोट संस्थान

स्वतंत्र भारतात विलीन होण्यापूर्वी अक्कलकोट हे अठराव्या शतकापासून अस्तित्वात असलेले स्वतंत्र संस्थान होते. फतेहसिंहराजे भोसले हे संस्थानाचे पहिले अधिपती होते. हे संस्थान डेक्कन स्टेट्स एजन्सीच्या आधिपत्याखाली होते. संस्थान ४९८ चौरस मैलांत पसरलेले होते. संस्थानाची सीमा हैदराबाद संस्थान व बॉम्बे प्रेसिडेन्सीला लागून होती. इ.स. १९०१च्या गणतीनुसार संस्थानाची वस्ती ८२,०४७ होती तर अक्कलकोट शहरात ८,३४८ व्यक्ती रहात होत्या. इ.स. १९११ साली संस्थानाने २६,५८६ रुपयांचा महसूल वसूल केला व त्यातील १,००० रुपये ब्रिटिश राज्याला खंडणी म्हणून दिले. ब्रिटिशांच्या दृष्टीने हे संस्थान नॉन-सॅल्यूट स्टेटया प्रकारांत मोडायचे. इ.स. १७०८मध्ये राणोजी लोखंडे याना पहिल्या छत्रपती शाहूंनी दत्तक घेतले आणि त्याचे नाव फतेहसिंहराजे भोसले झाले. इ.स. १८४८ पर्यंत अक्कलकोट सातारा संस्थानचा एक भाग होते. जेव्हा साताऱ्याच्या शाहूंना ब्रिटिश सरकारने राज्यभ्रष्ट केले, तेव्हापासून अक्कलकोटला स्वतंत्र संस्थानाचा दर्जा मिळाला. त्यानंतर, स्वतंत्र भारतात विलीन होईपर्यंत अक्कलकोटमध्ये कोणतीही राजकीय घटना घडली आहे. संस्थातले स्थैर्य आणि संस्थानिकाचा शिवाजीमहाराजांच्याघराण्याशी असलेला संबंध बघून अक्कलकोटच्या भोसले घराण्याचे अनेक मराठा सरदार घराण्यांशी नातेसंबंध जुळले.

## अक्कलकोटचे प्रमुख संस्थानिक

१७०७-१७६०- फतेहसिंहराजे भोंसले

१७६०-१७८९ - शहाजीराजे (बाळासाहेबराजे) भोसले

१७८९-१८२२-दुसरे फतेहसिंह राजे (अप्पासाहेबराजे) भोंसले

१८२२-२३ - मलोजी (बाबासाहेब) भोसले



१८२३-१८५७ - दुसरा शिवाजी (अप्पासाहेबराजे) भोसले

१८५७-१८७० - दुसरे मालोजी (बुबासाहेब) भोसले

१८७०-१८९६- तिसरा शिवाजी (बाबासाहेबराजे) भोसले

१८९५-१९२३- कॅप्टन फतेहसिंहराजे (तिसरे) भोसले

१९२३-१९५२ - विजयसिंहराजे भोसले

१९५२-१९६५ - जयसिंहराजे भोसले

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वर्षभरातच वल्लभभाई पटेलांनी अक्कलकोट संस्थान भारतात विलीन केले आणि मुंबई इलाख्यात दाखल केले. भाषावार प्रांतरचना झाल्यावर अक्कलकोट आणि त्याचा सातारा जिल्हा महाराष्ट्र राज्याचा एक भाग झाला.

भरदस्त अशारितीने आशिया खंडातील पहिले क्रमांकावर असलेला शेकडोच्या संख्येने सशस्त्र संग्रलाय आहे .बाहेरील म्हणजेच विदेशातील लोकही हे पाहण्यासाठी गर्दी असते...

## अक्कलकोट रोड रेल्वे स्टेशन

हे सोलापूर जिल्ह्याच्या अक्कलकोटगावाजवळील रेल्वे स्थानक आहे. येथे सगळ्या पॅसेंजर गाड्या तसेच काही एक्सप्रेस गाड्या थांबतात.

-रुद्रया स्वामी,
अक्कलकोट, सोलापुर

समस्त जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

डॉ. राजकुमार कानडे
एम.एस. (आर्थो)
अस्थिरोग व फ्रॅक्चर तज्ञ

डॉ. शशि कानडे
एम.बी.बी.एस. डी.जी.ओ.
स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ

आरोग्य नगर, उमरगा, जि.उस्मानाबाद



समस्त जनतेला दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

कोंडीबा खरात
सरपंच

जांभोरा, सिंदखेड राजा, जि.बुलढाणा



# बाळापूर शहर पर्यटन स्थळा करीता निसर्गाकडून लाभलेली नैसर्गीक देण !

बाळापूर : राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर, मनव महेशया दोन्ही नद्यांच्या मधोमध नैसर्गिक असे निसर्गरम्य वातावरणात वसलेलं बाळापूर शहर खरोखर पर्यटनासाठी निसर्गाकडून लागलेली देण आहे. बाळापूर शहराची अकोला जिल्ह्यात नव्हे तर विदर्भातील वैभव श्रीमत परगणा म्हणून नावजलेल्या सर्वधर्मियांनी धार्मिक वृत्तीतून वैभवाची साक्षअनेक वास्तुळून आजही उभ्या आहेत. यामध्ये ऐतिहासीक किल्ला, घोड्याचे स्मारक म्हणून बांधण्यात आलेली छत्री, चिंतामणी पाश्वनाथ मंदीरबालादेवी मंदीरचिंचपॅड मंदीर नागसेन बुध्द विहार, पुरातन अष्टकोनी विहीर पुरातन काळातील महत्वाच्या मशिदी, विरशैव समजाचा मठ या सह अनेक पुरातन आठवणी आजही उभ्या आहेत.

बालादेवी मंदिर आणि किल्ला यांच्या पुढील व





मागील बाजूस असलेल्या मनकर्णिका व महेश ह्या दोन्ही नदयामध्ये पारस औष्णिक विज प्रकल्पाच्या धरणाचे पाणी पुरेशा प्रमाणात साचलेले असल्यामुळे शासनाने दोन्ही नदी पात्रामध्ये बोटीची जर व्यवस्था केली तर पर्यटकांना या निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद घेता येईल व बाळापूर शहरात पर्यटनाला चालना मिळेल.

पुरातत्व विभागाने सदर किल्याची दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक असा निधीची सुध्दा तरतुद केली आहे परंतु यामध्ये असलेलीशासकीय कार्यलये आणि परिसरात असलेले अतिक्रमण जो पर्यंत तेथून हटविल्या जात नाही तोपर्यंत किल्ला व छत्रिचे सौदर्याकरणाचे काम होऊशकणार नाही.

बाळापूर शहरात जर उपरोक्त पर्यटनास आवश्यक अशा सुविधा शासनामार्फत राबविल्या तर बाळापूर शहरापासुन केवळ १८ कि.मी अंतरावर असलेल्या संत नगरी शेगांव येथील भाविक शेगांव येथे आल्यावर निसर्गरम्य पर्यटनाचा लाभ निश्चित घेतील. अशा प्रकारे पर्यटनाला चालना देणारे विविध उपक्रम राबविल्यास पर्यटकांना याहर इतर ऐतिहासी वास्तु म्हणजे जैन धर्मियांचे पवित्र स्थळ श्री चिंतामणी पाश्वनाथ, श्री गोडीजी पाश्वनाथ मंदिर आणिलोकागच्छ केशवजी जैन मंदीर या ठिकाणी येणाच्या संख्येत वाढ होईल तसेच या ठिकाणी असलेली खानका-ए-- नक्शबंदीया या पुरातन

मस्जिद मुस्लीम धर्मियांचे पवित्र स्थळ असुन या ठिकाणी विविध उर्दू ग्रंथाचे ग्रंथालय असुन मस्जीद मध्ये असलेले कमळाची फुले असलेले तळे आणि रेखीव नक्षीकाम मन मोहीत करुन घेणारे आहेहि मस्जीद मनकर्णिका नदीच्या काठावर वसलेली असुन इतिहासाची छाप सोडणारी आहेतसेच बाळापूर शहरापासुन ५ की.मी. अंतरावर शेगांव रोडवर असलेली अष्टकोनी आकाराची पाय विहीर ऐतिहासीक वास्तु केलेचा उत्तम नमुना आहेबाळापूर पासुन जवळच असलेल्या पारस येथील बाबुजी महाराज संस्थान करीता आणि वझेगांव येथील निसर्ग सौदर्य परिसराकरीता पर्यटन विभागाकडून निधी सुध्दा उपलब्ध झाला मात्र त्या निधीचा वापर केवळ एक सभागृह बांधण्या पुरता झाला. बाळापूर हे पर्यटन स्थळ घोषीत होऊन या ठिकाणी पर्यटन केंद्र होण्याची आवश्यकता आहे.



असे विविधतेने नटलेल्या नैसर्गिकबाळापूर शहरातपर्यटनाची जोड मिळाल्यास निश्चितपणे महाराष्ट्राच्या नकाशावर पर्यटन स्थळ म्हणून ओळखल्याजाईल व त्याच बरोबर पर्यटनामुळे शहरात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल.

बाळापूर शहराला पर्यटन स्थळासाठी नैसर्गिक देण आहेपर्यटनास साजेस करण्यासाठी आवश्यक कल्पकतेतून विकास साधणारे नेतृत्व नसल्याने नैसर्गिक देण असुनही पर्यटन स्थळ होऊ शकले नाही हि मोठी शोकांतिका आहे.

–अमोल जामोदे,
प्रतिनिधी
बाळापूर अकोला



# आजनसरा गावात लक्षीमीबाई पोटी पांडुरंग अवतरले

हिंगणघाट तालुक्यातील आजनसरा या छोट्याशा गावी कार्तिक पौर्णिमेला ई स १८०० कै श्री लक्ष्मीबाई व नीलाजी पाटील कुसुरकर या विठ्ठलभ क्त दंम्पत्याच्या घरी दिव्य संत सत्पुरुष श्री भोजाजी महाराज यांचा जन्म झाला संत भोजाजी महाराजांचे आई वडील हे दोघेही विठ्ठलभक्त होते दोघेही पती-पत्नी वडिलधाऱ्यांची सेवा करणे प्राणीमात्रांविषयी भाव ठेवून निर्लेप वृत्तीचे जीवन जगत होते सुदैवाने त्यांना ईश्वराने चांगले समृद्ध जीवन दिले होते पिढीजात भरपूर शेतीवाडी मिळालेली होती मिळालेल्या श्रीमंततिने ते उतले नाही किंवा मातले नाही मिळालेल्या त्या संपत्तीचा उपयोग समाजातील गोरगरीब जनतेसाठी करून सतत पांडुरंगाचे चिंतनात आपले आयुष्य खर्ची घालत होते सुदैवाने त्यांची धर्मपत्नी लक्ष्मीबाईची उत्तम सात असल्याने दोघेही अखंड आनंदात राहात असे दरआषाढी व कार्तिकीला हे दाम्पत्य पंढरपूरला जाऊन आपली सेवा विठ्ठल चरणी अर्पण करीत त्यांचा संसार सुखाचा सुरू होता परंतु एकच खंत होती त्यांच्या संसारवेलीवर अद्याप फुल फुलले नव्हते त्यामुळे नीलाजी चे वडील बालाजी कुसुरकर हे नातवंडाचे तोंड पाहण्यासाठी आतुरलेले होते नाताचे कौतुक पाहण्यासाठी ते नेहमी पंढरपूरच्या विठ्ठलाला आळवायचे नीलाजी हे पत्नीसह दरवर्षी वारीला नित्यनेमाने जात असत एकदा पंढरपूरच्या वारीला नीलाजी हे पत्नीसह निघाले असता त्यांचे वडील बालाजी यांनी त्यांना पंढरपूरच्या पांडुरंगाला मला नातवंडाचे तोंड पाहण्याची इच्छा आहे ही आपली प्रार्थना श्री विठ्ठला चरणी मांडण्याची विनंती केली निलाजी पत्नीसह पंढरपूरला आले नेहमीप्रमाणे हे दोघे श्री विठ्ठलाचे नामस्मरणात तल्लीन होते पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघाले पंढरपुरात पाय ठेवताच एकच चमत्काराचे अनुभूती दोघांनाही येऊ लागली प्रथम पंढरपुरातील नामदेवाची पायरी जवळ या जोडप्याला एका वृध्य जोडपे ने गाटले निलजी च्या मस्तकावर हात ठेवत ते म्हणाले वडिलांनी जी इच्छा व्यक्त केली ती पांडुरंगा पासून मागुन घे तो कृपाळू आहे भक्तांची मनोकामना तो अवश्य पूर्ण करतो असा आशीर्वाद देत ते वृद्ध जोडपे गुप्त झाले लक्ष्मीबाई पांडुरंगाच्या दर्शनासाठी मंदिरात आले तर काय आश्चर्य



पांडुरंगाच्या गळ्यातील हार नीलाजिच्या गळ्यात पडला अधिकस्य अधिकम् फलमअसे या दांपत्याला झाले दुधात साखर पडल्याचा अनुभव त्यांना आला या वेगळा अनुभवाने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले प्रत्यक्ष भगवंत आपल्या घरी येत आहे हा साक्षात्कार झाल्याने ते अधिकच आनंदित झाले त्या आनंदात दोघेही पती-पत्नी परतीचा प्रवास आपल्या घरी आजनसरा साठी निघाले कारण आज पर्यंत जगासाठी अज्ञात असलेले गाव आता पुढील काही वर्षात प्रति पंढरपुर होणार होते त्याची मूर्त वेळ आली होती श्री विठ्ठलाची अनेक वर्षापासून कुसुरकर घराण्याची भक्ती आता फळाला येऊ लागली होती कारण प्रत्यक्ष भगवंताने असा संदेश दिला होता पंढरपूर वरून परतीच्या प्रवासाला वाटते त्यांना अनेक शुभशकुन झाले आजनसरात येऊन सारे वृत्तांत कथन केले त्यातील प्रत्येक शब्द विठ्ठला चरणी असलेल्या श्रद्धेच्या साक्षात्कार देत होता सोबतच आपल्या घरात कुणीतरी येणार असल्याचा आनंद होता पांडुरंगाचे मनोमन आभार मानत बालाजीच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले कारण प्रत्यक्ष त्यांच्या दैवताने त्यांना कल

दिला होता आपल्या ह्रदयातील सारी तळमळ त्यांनी ईश्वरापुढे मांडली व अंतकरणातून प्रार्थना केली पांडुरंगा मी तुला शरण आहे मला मार्ग दाखव तू दाखवशील त्याच मार्गाने मी जाईल या अनन्य भावाने शरण गेल्यावर प्रत्यक्ष परमेश्वराची नाईलाज होतो अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करण्यासाठी तयार झाला त्यात अर्जुन निष्ठेने विठ्ठलाला शरण गेलेल्या कुसुरकराच्या वंशात आपला अंश पाठविण्यास परब्रह्म तयार झाला अजून सोबत नीलाजिला एक एक चमत्कार दाखवून आपली प्रचिती पंढरीनाथ देत होता स्वप्नात निलाजिला दृष्टांत दिला तुझ्या वडिलांची आर्त हाक माझ्या कानी आली माझा अंश स्वरूपात तुझ्या पत्नीच्या पोटी जन्माला येईल प्रत्यक्ष पंढरी अजून सर याला अवतरेल व चंद्रभागा तीर्थ रूपाने भक्तांच्या व्याधी दूर करून अनेकांच्या जीवनात आनंदाचा सागर निर्माण करेल या दृष्टांता नंतर लक्ष्मी बाईला दिवस गेले परंतु या लक्ष्मीनारायण आणि स्वप्निल आजीच्या पत्नीला दृष्टांत दिला रुक्मिणी लक्ष्मी कुंकू लावले तर लक्ष्मीबाई श्री विठ्ठल रुक्मिणी ला साष्टांग नमस्कार केला प्रत्यक्ष रुक्मिणीने लक्ष्मीबाईची खान नारळाने ओटी भरली क्षणात वीज चमकावी तसा लख्ख प्रकाश पडला या घटनेत लक्ष्मीबाई नामस्मरणात अधिकच फुलू लागल्या कीर्तनाची त्यांना आवड होतीच त्यात जास्तीची भर पडली पुढे कार्तिक पौर्णिमेला ई स १८००ला त्या प्रस्तुत झाल्या प्रत्यक्ष ब्रह्मने त्यांच्या पोटी जन्म घेतला भोजाजी महाराज हे बालपणापासून भक्तीत रमले होते राम कृष्ण हरी विठ्ठल केशवा या मंत्र दैवत त्यांच्या मुखातून होत असे श्री विठ्ठल नामात सतत दंग राहत असल्याने त्यांनी संसारा वरची आसक्ती वृत्तीची संपूर्णतः ताकद त्यांच्यात आली होती त्यामुळे त्यांच्या नैमित्तिक कार्यात त्यांच्या तर आली होती त्यामुळे त्यांच्या नौतिककार्यास प्रत्यक्ष पांडुरंगच येऊन मदत करीत होता एकदा शेतीत खळात ज्वारीचा मळणी बैलाच्या साह्याने सुरू होती भोजजीना अचानक समाधी लागली ते एका ठिकाणी बसून ध्यानमग्न अवस्थेत बसून चिंतनात मग्न झाले मळणी थांबली तेवढ्यात एक वृद्ध व्यक्ती आला त्याने मळणीचे काम सुरु केले आकाशात ढग भरून आले पाऊस धो धो बरसू लागला त्या अवस्थेतही भोजाजी आपल्या समाधीत शेतात कोणीच नव्हते पाऊस गेल्यानंतर वडील शेतात आले त्यांनी पाहिले भोजाजी समाधी ध्यानस्थ बसलेल्या खळातील ज्वारीची मळणी पूर्ण झालेली त्या ठिकाणी एकहि पावसाचा थेंब पडला नाही ही गोष्ट गावात पाण्यासारखी पसरली गावातील लोक त्या ठिकाणी येऊन पाहू लागले आचार्याने तोंडात बोटे घालू लागली हे सामान्य व्यक्ती नसून ईश्वरी अवतार आहे याची खात्री पटू लागली आणि भोजाजी हे परमहंसहे झाले त्यांची माहिती सर्वदूर पसरू लागली चंदनाच्या दरवळाने कीर्तीचा सुगंध चौफेर धावू लागला आहे आज आजनसरा हे तीर्थक्षेत्र



जय भोजाजी- आजनसरा येथे महाराजांच्या प्रांगणातील भव्य दहिहांडीचा माळा.

झाले आहे.विदर्भातीलच नव्हे तर बाहेर राज्यातील भक्त या पावन भूमीत नतमस्तक होऊन आपल्या ऐपतीप्रमाणे पुरणपोळीचा नैवद्य अर्पण करू लागले प्रतिपंढरपूर म्हणून नावारूपाला आलेला येथील श्री संत भोजाजी महाराज यांचे तीर्थस्थान महाराष्ट्र शासनाने 'क' दर्जाचा पर्यटन स्थळाचा दर्जा दिला असून या ठिकाणी भव्य निवास व्यवस्था उभी राहत आहे रस्ते नाल्या व विविध विकास कामाचे दर्जेदार काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे बुधवारी व रविवारी या ठिकाणी मोठी यात्रा भरते संपूर्ण विदर्भातील एक लाख भक्त दर्शनासाठी येतात विशेष म्हणजे या ठिकाणी जवळपास पाचशे ते सहाशे स्वयंपाक होतात पुरणपोळीचे महत्त्व प्रचंड प्रमाणावर या ठिकाणी पुरणपोळी शिजवली जाते व मोठ्या प्रमाणावर या प्रसादाचा आस्वाद घेतात अनेकांवर श्री संत भोजाजी महाराज यांनी आपली कृती सावली धरली आहे

–राजु खांडवे, हिंगणघाट वर्धा

# निसर्गरम्य पर्यटन स्थळ ; सहस्त्रकुंड धबधबा



पावसाळा म्हटलं की सर्वांनाच हवेहवेसे वाटते,त्या नभातून कोसळणारा मुसळधार पाऊस,शरीराला झोंबणारा थंडगार वारा, गावकाठवरून दुथडी भरून वाहणारे नदी नाल्या..सर्वत्र हिरवाईने बहरून गेलेलं सुंदर निसर्ग, याचा मनसोक्त आनंद सर्वच घेतात.तसा पावसाळा सर्वांनाच आपुलकीची वाटते, त्यातच एखादी सहल निघाली तर वा.. मौजमजाच असेल.. असाच एक ठिकाण जे की सर्वांना आकर्षित करते,पावसाळा आला की, त्या ठिकाणाची आठवण येणे साहजिकच आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील इस्लापुर पासून ४किमी अंतरावर असलेलं सहस्त्रकुंड धबधबा. सहस्त्रकुंड धबधबा हा मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर आहे.धबधब्याच्या अलीकडचा भाग नांदेड जिल्ह्यातील (मराठवाडा) किनवट या तालुक्यात मोडतो तर पलीकडचा भाग यवतमाळ जिल्ह्याच्या (विदर्भ) उमरखेड या तालुक्यात येतो.

पावसाळ्यात हा धबधबा अधिक खुलून तर येतोच शिवाय पावसाळ्यात हा धबधबा पर्यटकांच्या गर्दीनेही फुलून जातो.नांदेड जिल्ह्यातील सहस्त्रकुंड धबधबा नांदेडपासून अवघ्या १०० किलोमिटर अंतरावर आहे.या वर्षी मृगनक्षत्राने चांगलीच निर्सगावर हात ठेवल्याने धबधब्यातून कोसळणाऱ्या धारा मोठ्या झाल्या आहेत. यंदाच्या पावसामुळे अजस्त्र बनलेला, स्वतःला खोल दरीत झोकून देऊन तुषारांचे वैभव निर्माण करणारा हा सहस्त्रकुंडचा धबधबा पर्यटकांचे मन आकर्षित करून घेतले.

सुंदर अश्या निसर्गरम्य वातावरणात स्वतःला झोकून घेण्या इतके स्पष्टमय, तेजधार वाहणारे ते धारा व त्यातून निघणारे तुषार पाहून मानसिकतेची भान हरवते. वरूनराज्यानी पाठीवरचा हात मागे घेतल्याने गेल्या काही वर्षापासून हा धबधबा कोरडा ठाक पडला होता.आता मात्र निसर्गाने निसर्गाला स्वतःत ओढुन घेतल, स्वतःच्या आंगावरती हिरवी शाल पांघरून घेतल,हे जग हरितमय केल. सहस्त्रकुंड धबधबा हा निसर्ग निर्मीती आहे. इथल्या मातीला जानीव असेल या मातीचा इतीहास, पर्यावरणाच्या कुशीतल्या धबधब्यांचा रहस्य, पुराणे काही वेगळच सांगून जात, परंतू प्रत्यक्षात काही वेगळच घडलेल आसत, महाराष्ट्रात आसे अनेक ठिकाण आहेत जे निसर्गाने स्वःतला त्यागून आपाल्याला रहस्यमय केल,निसर्ग हे खरच खुप अजब गोष्ट आहे. या मानवी, सजिव सृष्टीचा निर्माता निसर्गाच्या सानिध्यातून झाला. हाच निसर्ग या मानवांना कधि आनंदी जिवन जगवतो तर कधी दुःखी. मला वाटते प्रत्येक दुःखी व्यक्ती एक वेळ निसर्गाच सौदर्य अनुभवावे, निसर्गाच्या चक्रात समर्पण व्हावे, नक्कीच मनाला शांती, व जगणास धिर मिळेल, असाच अत्भुतमय जिवनाला जिशा देणारा पैनगंगेवरील धबधबा प्रत्येक पर्यटकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे.

गेल्या तिन वर्षापासून मि या धबधब्याच्या परिसरात असतो, गेल्या तिन वर्षापासून मला हा धबधबा फुलून व अनंदाने खेळणारा कधी अनूभवला नाही. मात्र आजची दिलेली धबधब्याला भेट हे अस्मरणीय ठरली, ३० ते ४० फुट उंचावरून कोसळणारा तो धारा, त्यातून उढणारे तुषारांचे वैभव फवारे, व एक अजब ऐकू येणारा तो संगीतमय आवाज तो छण स्वतःला विसरून, काही काळ त्या कोसळणाऱ्या धारांत गूरफटून जातो.

सहस्त्रकुंड धबधब्याच्या काठावर पर्यटकांसाठी बगीचा तयार करण्यात आला आहे. बागेत विविध रंगाची फुलपाखरे पर्यटकांची मने मोहून टाकीत आहेत. ही बगीच्या म्हणजे पर्यटकांच विश्रांती साठी निसर्गाच्या खाणीतला तो क्षण, हिरवळीच्या हिरवीगार व धारांच्या थंठगार शरीराला झोंबणाऱ्या वाऱ्यांच्या स्पर्शाने स्वतःला विसरून एक वेळ तल्लीनतेने जगण्याची उभ या धबधब्यांच्या परिसरात मिळते, तेलंगणातील अदिलाबाद जिल्हा या

धबधब्या लगत असल्याने या पर्यटनास्थळांना तेथील पर्यटकाची जास्तीत जास्त गर्दी दिसते,पावसाळ्यांचे अनंदाने स्वागत करण्यासाठी महाराष्ट्र भरातून पर्यटक या स्थळी तुटून पडतात, पावसाळ्यात सुरवात होणारा पवित्र श्रावण मास या महिण्यात या पर्टकांचा आनंद लूटतांना हजारो भावीक दिसतात.धबधबांच्या काठावर असलेल्या पंचमुखी महादेव मंदीर म्हणजे भावीकांच श्रद्धा स्थान, बानगंगा या नावाने प्रसिद्ध असलेल्या पैनगंगेवरील धबधबा व शिवशंकराच मंदिर हे महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात प्रसिद्ध आहे. पावसाळी पिकनिक म्हणजे नांदेड जिल्ह्यात किनवट-माहूर तालूक्याची आठवण येते, दोन दिवसांची सहल निघाल्यास सहस्त्रकुंड धबधबा पाटोपाठ निसर्गरम्य वातावरणात दडलेल माहूर येथील रेणुका मातेचे मंदिर , दत्त शिखर, अनसूया मातेचे मंदिर आणि परिसरातील हिरवाईने नटलेल्या डोंगर-दर्‍यापण पाहता येतील, आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणार्‍या किनवट विभागात आदिवासी समाज अधिक प्रमाणात अढळून येतात, पक्षी , प्राणी व अन्य वन प्राणी या भागात जास्त प्रमाणात निदर्शनास येतात. यामुळे या प्रांताला



हरित प्रांत म्हणूनही ओळखले जाते. सहस्त्रकुंड धबधबा महाराष्ट्रातच नव्हे तर आंध्रप्रदेश, तेलंगणा सह देशभरात अनेक राज्यात प्रसिध्द आसल्याने देशभरातील पर्यटकांची या निसर्गमय वातवरणात पैनगंगेवर धोधो वाहणार्‍या धबधबा पाहण्यास पावसाळ्यात अफाट गर्दी उसळून येते, कोसळणार्‍या धार्‍यांचे उडते कारंजे चेहर्‍यावर आनंदोस्वत उभारून दिसते.अश्या अभयरम्य परिसाराला ऐकवेळ नक्कीच भेट द्या.

-सय्यद मुजीब
प्रतिनिधी, मुखेड, नांदेड
मो.नं : ८८८८३५७०४८

सर्व भारतीयांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

- शुभेच्छुक -
भाग्यवंती बोअरवेल्स
ॲन्ड अर्थ मुव्हर्स
भाग्यवंती फायनान्स,
अक्कलकोट
प्रोप्रा. प्रमोद म. गोरे मो.:९०२८४०९८८८
प्रोप्रा. समर्थ वि. गोरे मो.:७३०४८४९९९९
अक्कलकोट, जि.सोलापूर

सर्व भारतीयांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

- शुभेच्छुक -
मे. विरभद्रेश्वर
फायनान्र्स
प्रोप्रा. केदार माळशेट्टी
मो. : ९९२१९६५५११
अक्कलकोट, जि.सोलापूर

# पुरातन शिवमंदिर मल्लिकार्जुन

शेवगाव पासून सात किलोमीटर अंतरावर असलेले घोटण या गावी पुरातन शिवमंदिर मल्लिकार्जुन या नावाने प्रशिध्द आहे. ब्रम्हा ,विष्णु,महेश विधात्याची तीन रूपे,ब्रम्हा–पृथ्वीचा निर्माता,विष्णु–पृथ्वीचा पालनकर्ता व महेश–संहारकर्ता भगवान म्हणजे शिवशंकर अर्थात महादेव या शिवाला विविध नावाने संबोधले जाते. हे असे शिवाचे नावे महादेव, शिव, महेश, भालचंद्र, निलकंठ, शंकर, भोलेनाथ, पशुपतीनाथ, उमापंती भगवान शंकर भोलेनाथ या नावाने प्रसिद्ध आहे. आपल्या भक्ताच्या अस्सिम भक्तीवर प्रसंन्न होवून त्यांना वरदान म्हणुन त्यांनी स्वतःचेच रूप प्रदान केलेल्या अनेक आख्यायिका व शिवलिंगाची महती ऐकतो हेच विविध शिंवलिंग बारा ज्योतिर्लिंग या नावाने ओळखले जातेसौराष्ट्रे सोमनाथं च/श्री शैले मल्लिकाजुर्नम्/उज्ञायिन्यां महाकालमोकार ममलेरम//परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमाशंकरमं/सेतू बंधे तु रामेशं,नागेशं वारूकावने //वाराणस्यां तु विशं,त्रंबकं गौतमीटते/हिमालये तु केदारं,घृसृंणेश शिवालये //१२ ज्यातिर्लिंगापैकी एक म्हणजे श्री मल्लिकार्जुनेश्वर ज्याचे मुळ स्थान आंध्रप्रदेशातील कुर्नुल जिल्हाच्या श्री शैल पर्वतात पाताळगंगेच्या परिसरात कदली बिल्ब वनात आहे.व त्याचेच एक रूप म्हणजे श्री क्षेत्र घोटण येथील श्री मल्लिकार्जुनेश्वर, श्री मल्लिकार्जुनेश्वर घोटण गावाची आख्यायिका हस्तिनापुरचे राजपुत्र पुंड राजाचु पुत्र म्हणजे पांडव ते अज्ञानवासात असतांना जरासंघ व कौरव यांनी मिळुन विराट असणारे गोधन म्हणजे गायी पळवुन आणावयाचे ठरविले यांचा मुख्य सुत्रधार विराट राजाकडुन अपमानीत झालेले गुरूबंधु द्रोनाचार्य होते.कौरव व जराधंन सैन्याने विराट राज्याच्या नगरीवर हल्ला करून लाखो खिल्लारी गार्यीना पळविले. त्यातील एक कळप चौखुन उधळला व दंडाकारण्यात आला.जेथे मल्लिक ऋषी आपल्या शिष्यासह वास्तव्यास होते.तेथे येवून स्थिरावला त्या गायीचा संभाळ मल्लिक ऋषी यांनी केला. व त्यांच्या निवासाची व्यवस्था देखील त्यांनी केली.त्या ठिकानास संस्कृत मध्ये गोठान असे संबोधतात.गोठन म्हणजे गार्यीचे वास्थव्याचे ठिकाण होय. त्याच ठिकाणी कालांतराने तेथे



छोटीशी वस्ती निर्मान झाली.व या गोठाणचे अपभ्रंश होवून 'घोटण' हे नाव रूढ झाले.पुढे अर्जुनाने विराट राजाच्या गायीचा शोध घेत मल्लिक ऋषीच्या आश्रम परिसरात प्रवेश केला.त्या नरश्रेष्ठाचे मल्लिक ऋषीनी मोठ्या प्रेमाने स्वागत केले.काही दिवस तेथे वास्थव्य करून मल्लिक ऋषी व अर्जुनाने मिळवून एका शिकलिंगाची स्थापना केली.तेच मल्लिकार्जुनेश्वर होय.अशी १२ मंदिरे घोटण परिसरात होती.परंतु मोगल आक्रमनाने त्यातील काही मंदिरे जमीनदोस्त झाली.व आजमितीसघोटण येथे अशी पाच मंदिरे अस्तीत्वात आहेत.इतर मंदिराचे ही अवशेष आढळुन येतात.त्यातील मुख्य मंदिर मल्लिकार्जुनेश्वर शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणुन पहावयास मिळते.ते शिल्पकलेत कैलास लेण्यांच्या तोडीत भासते.देवगिरीचे यादव राजे रादेवराय व कृष्णदेवराय यांच्या काळात त्यांचा जिर्णाध्दार करण्यात आला होता. साधरण ६५० वर्षापूर्वी यादवांच्या दरबारातील प्रसिद्व वास्तु विशारद हेमांद्री याने त्या मंदिराचे बांधकाम एका विशिष्ट पद्धतीने केले.व ती पद्धत पुढे 'हेमाडपंथ' या नावाने ओळखली गेली जाते.यवनी'मोघल' आक्रमनापासुन हे सुंदर मंदिर वाचावे यासाठी त्याकाळी ते मंदिर शिखरापर्यत पांढ.या मातीत पुरण्यात आले होते.त्याचा कळस हल्लेखोरांनी नाहिसा केला होता. दगडी कळस नंतर विटांनी मिनारा सारखा किंवा सुफी संताच्या मंदिरासारखा बांधण्यात येवून त्यास चुना देण्यात आला.ते मंदिर मातीत कळसापर्यंत गाडण्यात आले.आशा प्रकारे मंदिर मोगली आक्रमनापासुन वाचवण्यात आले.आजही या मंदिराला चुना देण्याची पद्धत आहे.या मदिराची भव्यता व कलाकुसर व इतिहास याची महती शासनास

पटल्याने ते मंदिर भारतीय पुरातत्व खात्याने ताब्यात घेतलेले आहे.बारा ज्योतिर्लिंगापैकी आंध्रप्रदेशातील कुर्नूल जिल्ह्यातील श्री शैल्यम मल्लिकार्जुनेश्वर ,जसे पाताळगंगेच्या तीरावर वसले आहे.या प्रमाणे हे मंदिर सुद्धा बेलगंगा नदिच्या चोहोबाजुने ८ फुट दीड व ७फुट उंचीच्या मजबुत दगडी तटबंदी आहे.पुर्वाभिमुख दुमजली प्रवेशद्वार आहे.या प्रवेशद्वारातुन वरती नगारखाना होता.हे संपुर्ण मंदिर दगडी असुन मंदिरासमोर महादेवास प्रिय असलेले बेलाचे झाड आहे.मंदिर परिसरात चार दिपमाळा असून त्यावर चढुन हलवल्यास हलतात परंतु त्यांच्या बांधकामावर अजिबात परिणाम होत नाही.हे मंदिर संपर्ण दगडी खांबावर उभारले आहे.नक्षीकाम मुर्तीकला व शिल्पकला रेखीव असुन त्याला तोड नाही सभामंडपासमोर पश्चिमेस भव्य अशी नंदिची दगडी मुर्ती आहे.नंदिसमोरून सभागृहात प्रवेशताच जमिनीवर प्रचंड अशी कासवाची शिल्प कोरलेले नजरेस पडते.सभामंडपात डाव्या कोप.याला ओवरीत असलेले गणेश मूर्ती आपले लक्ष वेधुन घेते.ही मूर्ती अतिशय भव्य व कलाकुसरयुक्त आहे . या मूर्तीचे दर्शन घेवून आपन मंदिरात प्रवेश घेतो.तेव्हा ६फुट लांब रूंद व९फुट खोलीचा गाभारा आपल्या नजरेस पडतो. त्या खोलगट गाभा.यात मल्लिकार्जुनेश्वराची पिंड आहे.गाभ.याच्या वरच्या बाजुला ओवरीत प्रदक्षिणा मार्गावर पश्चिमेकडे तोंड असलेली पार्वतीची मूर्ती आहे.गाभ.यातील शिवलिंगावर तांब्याचे कवच आहे.गाभा.यावर २३ फुट ३२ फुट उंचीचे शिखर आहे.मंदिरासमोर ३८ खांबी सभामंडप आहे.दरवाज्याच्या कपाळपट्टीवर देवाच्या १२ अवतारमूर्ती कोरल्या असून उजव्या व डाव्या बाजुस चार चार चोपदार व भालदार सुभेदार अशा मूर्ती आहेत.गाभा.याच्या दक्षिणेस बाहेर पडण्यास दगडी दरवाजा आहे.वत्याच्यावर समोर मंदिराच्या दक्षिणेला आणखी एक प्रवेश द्वार आहे.या द्वाराच्या डाव्या बाजूस दोन समाधी स्थळे आहेत.पण त्या कोनाच्या आहेत त्याचा संदर्भ कोठेही सापडत नाही.

काहीच्या मते मल्लिकार्जुनेश्वराचा भक्त बलरामाची ती समाधी आहे.त्याच्या जवळच दोन पिंपळ व औदुंबर वृक्ष आहे.त्यामुळे दत्तभक्ताचेही ते श्रद्रास्थान आहे.मंदिराच्या बाहेर दगडी तटबंदिच्या बाहेर साडेतीन एकर जमिन देवस्थानच्या मालकीचे आहेत.उता.यावर त्यांची नोंद देवस्थानास इनाम अशी आढळते त्यास पारातत्व



खात्यामार्फत तारेचे कंपाउंड केलेले आहे.मंदिर परिसर दगडी फरशीने पुर्णपणे झाकलेला असल्याने बाराही महिने तेथे स्वच्छता आढळते.श्रावण महिन्यात येथे कायम भाविकांची गर्दी असते .तिस-या सोमवारी ग्रामस्थामार्फत येथे कुस्त्यांचा भव्य हगामा भरवला जातो .अशा या मल्लिकार्जुनेश्वराची यात्रा चैत्र शुद्ध त्रयोदशीला भरते. त्यानिमित्ताने येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते त्या नंतर मंगळवारी पहाटे गोदावरीच्या शुद्ध जलाची गावभर मिरवणुक काढुन त्या जलाने शंकराला अभिषेक घातला जातो. रात्री पालखी मिरवणुक वाजतगाजत आकर्षक विद्युत रोषणाई व भव्य शोभेची दारूकाम यांच्या सहायाने निघते. व रोज पहाटे ४.३० वाजता शंकराच्या आरतीने व शंकर पार्वती विवाहाने त्याची सागंता होते . सकाळी कलावंताच्या हजे-या व दुपारी कुस्त्यांचा जंगी हगाम्याने सांगता होते.त्यासाठी सर्व ग्रामस्थ नियोजन करतात .व यात्रा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतात,हे ऐतिहासिक वास्तु शिल्प परिसराचे एक 'श्रद्धास्थान' व 'दैवत' म्हणुन नावारूपास येत आहे.

-रामनाथ रईकर,<br>
शेवगाव,<br>
अहमदनगर

# जागृत देवस्थान-भूषणगड ची हरणाई देवी

महाराष्ट्रातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान व परिसरातील अनेक ग्रामस्थांची कुलदेवता असलेल्या श्री हरणाई देवीचा महिमा अपरंपार आहे.सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील भूषणगड या शिवकालीन डोंगरावर या देवीचं आकर्षक मंदिर आहे.जवळच एक गणेश मंदिर, महादेव मंदिर, डोंगराच्या मध्यभागी श्री म्हसोबा मंदिर,भुयारी देवी मंदिर अशी छोटी मंदिरे आहेत.समुद्र सपाटी पासुन सुमारे ३००० फूट उंचीवर असलेला हा किल्ला पुरातन असून सुस्थितीत आहे.या किल्लयावर भुयार आहे,म्हणून भुयाराजवळील देवींच्या मंदिरास भुयारी देवी नाव पडले. किल्लयाच्या सभोवताली वनीकरण केल्यामुळे किल्लयावरून पायथ्याला सर्वत्र जंगल दिसते.श्री हरणाई देवीचे मंदिर पश्चिम मुखी आहे.समोरच १० किलोमीटरवर औंध चा किल्ला आहे. या किल्लयावर श्री यमाई देवीचं जागृत मंदिर आहे.दोन्ही किल्ले एकमेकांसमोर अगदी सुस्पष्ट दिसतात. अनेक वर्षा पूर्वी या दंडकारण्यात श्री हरणाई व श्री यमाई देवीचं वास्तव्य होते.त्याकाळी औंध नगरी अतिशय सुख समाधानात नांदत होती.अशा परिस्थितीत औंधासुर नावाचा भयंकर राक्षस येथील ऋषीमुनी व जनतेला त्रास देत होता.त्यानं कठोर तपस्या करून हरणाई देवीचा वर मिळवला होता,त्यामुळे तो राक्षस उन्मत झाला होता. औंध नगरी च्या जनतेनं श्री यमाई देवीला या राक्षसाच्या त्रासातून मुक्त करण्याचे साकडे घातले. श्री यमाई व श्री हरणाई दोघी बहिणी-बहिणी होत्या. श्री यमाई देवी व औंधासुर यांच्या मध्ये घनघोर युद्ध झाले. यमाई देवीने केलेल्या प्रहाराने औंधासुर रक्ताच्या थारोळ्यात पडला व आई हरणाई अशी किंचाळी फोडली.हरणाई तिथं प्रगट झाली. दोघींनी ही त्या राक्षसाला मूळ रुपातील दर्शन दिले.त्याने हात जोडून क्षमा मागितली अन प्राण सोडला. अशी आख्यायिका आहे. इथे वर्षभर अनेक भाविक देवीच्या





दर्शनासाठी व पर्यटक म्हणून येत असतात. प्रत्येकाने एकदा तरी भेट द्यावी, असं हे देवस्थान आहे.

-डॉ. विनोद खाडे,
प्रतिनिधी,सातारा


सर्व भारतीयांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



- शुभेच्छुक -

प्रदिप मल्लिनाथ पाटील

**सरपंच** - समर्थनगर ग्रामपंचायत
**ता.अध्यक्ष** - भाजपा युवा मोर्चा
ता.अक्कलकोट.

# रांजणगाव गणपती मंदिर

महागणपती (रांजणगाव) हे पुणे जिल्ह्यात शिरूर तालुक्यातील गणपतीचे देऊळ आहे. हे देऊळ अष्टविनायकांपैकी एक आहे. अष्टविनायकातील सर्वांत शेवटचा गणपती (की चौथा?) म्हणून रांजणगावचा महागणपती ओळखला जातो.

## महागणपती (रांजणगाव) आख्यायिका:



त्रिपूरासुर राक्षसाचा वध करण्यापूर्वी शंकराने गणपतीची येथे पूजा केली होती. हे मंदिर शंकराने बांधले असून त्याने उभारलेल्या गावाला मणिपूर असे नाव दिले.

मंदीरा मागचा इतिहास:-

या मंदिराचे बांधकाम नवव्या व दहाव्या शतकातील आहे. श्रीमंत माधवराव पेशवे नेहमी या मंदिराला भेट द्यायला यायचे. मंदिरात असलेली मूर्ती ही दर्शनी मूर्ती आहे. मूळ मूर्ती मात्र तळघरात दडलेली आहे असा समज असून ती २० हात व १० सोंडी असलेली असावी असा तर्क आहे. मंदिरात इंदूरचे सरदार किबे यांनी सभामंडप बांधलेला आहे व गाभारा श्रीमंत माधवराव पेशवे यांनी बांधला असून शिंदे, होळकर आदी सरदारांनीही बांधकाम तसेच इनामाच्या स्वरूपात मोठे साहाय्य दिले आहे. माधवराव पेशव्यांनीच या मूर्तीसाठी तळघर बांधले.

मंदिररचना:-

येथील मूळ मूर्ती सध्याच्या मूर्तीच्या मागे (की तळघरात?) असल्याचे सांगितले जाते. तिला मोहोत्कट असे म्हटले जाते. या मंदिराचे बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण आहे. रांजणगावच्या गणपतीचे मंदिर पूर्वाभिमुख असून, मंदिरात दिशासाधन केले आहे. उगवत्या सूर्याची किरणे थेट मूर्तीवर पडतील, अशी मंदिराची रचना आहे. त्यामुळे उत्तरायणात, दक्षिणायनात व माध्यान्हकाळी गणेशाच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. मंदिरातील गणपतीची मूर्ती पूर्वाभिमुख, डाव्या सोंडेची, मोठ्या कपाळाची व आसनमांडी घातलेली आहे. मूर्ती अत्यंत मोहक असून दोन्ही बाजूला ऋद्धि-सिद्धी उभ्या आहेत. दरवाजापाशी जय व विजय हे दोघे रक्षक आहेत. गणेश चतुर्थीच्या दोन दिवस आधी व त्या दिवशी या ठिकाणी मुक्त प्रवेश असतो.

रांजणगाव कसे जायचे:-

पुणे-अहमदनगर रस्त्यावर व पुण्यापासून ५० किलोमीटरवर रांजणगाव येथे हे देऊळ आहे.

-अनिल सोनवणे
शिरूर, पुणे

सर्व अक्कलकोटवासियांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !





स्वामी इडली गृह
व लंच होम

प्रो. स्वामी बंधु
९४२३५८७१४५, ९१५८५२६९२७
८६६९१३१०८०
अक्कलकोट, जि.सोलापूर

# नांदेड येथील प्रसिद्ध पर्यटन स्थळ ....गुरुद्वारा..

शीख धर्म पंथाच्या गुरुंनी आपल्या धर्म प्रचार,प्रसारासाठी देश-विदेशात भ्रमंती केली,अन मानवतेचा सिद्धांत जोपासत जनसामान्यांत आपले विचार पेरण्याचे काम या पंथांनी केल. देशभरात जिथे जिथे या धर्मगुरुनी यात्रा केली,भ्रमण केल तिथे तिथे आज त्यांच्या स्मरणार्थ गुरुद्वारा उपलब्ध आहेत.यातलच प्राचीन व ऐतिहासिक गुरुद्वारातला एक म्हणजे नांदेड शहरातील सचखंड गुरुव्दारा हा अतिशय महत्वाचा असून अमृतसर येथील सुवर्ण मंदीरानंतर नांदेड येथील गुरुव्दाराचे नांव घेतले जाते. शीख समाजांचे १० वे गुरु गुरुगोविंदसिंघजी यांच्याच स्मरणार्थ हा गुरुव्द्वा बांधण्यात आला आहे.नांदेड शहरातील मध्यभागी एस.टी. बसस्थानक व रेल्वेस्थानक पासुन १ कि.मी. अंतरावर आहे हा गुरुद्वारा नांदेड ची ओळख बनून राहिला आहे.

श्री गुरु गोविंद सिंह हे शीख धर्माचे दहावे गुरू होय. त्यांचा जन्म १६६६ मध्ये पाटना येथे गुजरीजी व श्री गुरु तेगबहादुरजी यांच्या गरीब कुटुंबात झाला. त्यावेळी गुरु तेगबहादुरजी बंगालमध्ये होते. त्यांच्या म्हणण्यानुसार गुरुजी यांचे नाम गोविंद राय असे ठेवण्यात आले होते. नंतर १६९९ मध्ये बैसाखीच्या दिनी गुरु गोविंद राय हे गुरु गोविंद सिंह बनले होते. त्यांचे बालपणाचे पाच वर्ष पाटना येथेच गेले.धर्म व समाजाच्या संरक्षणासाठी गुरु गोविंद सिंहजी यांनी १६९९ मध्ये खालसा पंथाची स्थापना केली. खालसा पंथाच्या माध्यमातून त्यांनी जातीय भेद नष्ट करून समानता प्रस्तापित केली. शीख बांधवामध्ये आत्म-सन्मानाची भावना वाढीस लावली.

सन १७०८ पूर्वी शीख पंथांचे गुरू गोबिंद सिंग जी धर्म प्रचारासाठी आपल्या काही अनुयायांसमवेत नांदेड शहरी वास्तव्यास राहिले. ते आपल्या कुटुंबांना गमावले होते,इथे त्यांच्या स्मरणार्थ नियमीत कीर्तने भजने होत. बऱ्याच धर्मद्रोह्यांनी गुरूंच्या कार्याला विरोधही केला,त्यांच्यावर प्राणघातक हल्ला ही केले,मात्र गुरुंनी त्या कर्मांठाचे आपल्या तलवारीने चार हात केले. त्यात गुरु घायाळ झाले होते.बऱ्याच दिवसांनी बरे होताच. गुरुंना अखेरचे दिवस आठवायला लागले. त्या वेळी गुरुंनी पाच पैसे आणि



नारियळ गुरू ग्रंथांच्या चरणी ठेवून आपल्या अनुयांना गुरू ग्रंथांच्या चरणी सोपवले,गुरू ग्रंथच हे तुमचे या पुढे गुरू असणार, तेच सामजिक,मानवता धर्माची शिकवण देणार अस सांगून शीख धर्म पंथाचे दहावे व शेवटचे गुरू गोबिंद सिंग नांदेड येते १७०८ मध्ये शेवटचा स्वास घेतला. काही आख्यायिका असेही सांगतात की,गुरू गोबिंद सिंग आपल्या साथीदार असलेला घोडा दिलबाग समवेत जिवंत असतांना परलोकात गेले. ज्या ठिकाणी शेवटचं दर्शन दिले,त्याच ठिकाणी आजचा भव्य गुरुद्वारा बांधण्यात आला.

येथील गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हुजुर अबचलनगर साहिब या नावने पण ओळखला जातो. गुरुद्वाऱ्याची सध्याची इमारत महाराजा रणजीत सिंग यांनी इ.स. १८३० मधे बांधली. हे शीखांच्या पाच तक्तांपैकी एक आहे. हा गुरुद्वारा श्री गुरु गोविंद सिंघ यांच्या समाधीवर बांधलेला आहे . गुरुद्वाऱ्याच्या आतल्या रूम ला अंगीथा साहिब असे म्हटले जाते. या गुरुद्वाऱ्याचे बांधकाम इ सन १८३२ ते १८३७ मध्ये झाले आहे.इथे ऐतिहासिक साधनांचाही स्मृतीच्या स्वरूपात भाविकांना पाहायला मिळते. गुरुद्वारा हा विशाल असून,देशभरातील भाविक येथे गर्दी करतात. काही दिवसांपूर्वी गुरू श्री गोबिंदसिंगजी यांनी दिलेल्या गुरु ग्रंथाच्या दीक्षा दिनास ३०० वर्ष पूर्ण झाल्याने नांदेड शहरात भव्य गुरुता गद्दी चा उत्सव साजरा करण्यात आले, यात देशभरातून अनेक बांधवानी उपस्थिती लावली. भक्तीच्या रंगात रंगलेला हा गुरुद्वारा आत गेल्यावर गुरूंच्या चरणी नतमस्तक झालेला प्रत्येक माणसास एक प्रकारचे मनाला समाधान भासते. प्रस्थापित मराठी बांधवानी गुरू गोबिंद

सिंगजीना आपले गुरू मानले होते,त्या वेळचे मराठी बांधव आजही गुरूंनी दिलेल्या मानवता धर्माची पूजा करणारे आहेत. गुरूंनी दिलेल्या मानवतेच्या मार्गाचा स्वीकार करून आजही त्यांचा वसा जोपासत आहेत. गुरू गोबिंद सिंग गोदावरीतून मडक्याने जल आणून गुरू ग्रंथ साहेबांच्या चरणी अर्पित करत होते,ती परंपरा आजही कायम आहे. गोदावरी नदीकाठावर असलेल्या विशाल गुरुद्वारातील गुरु ग्रंथ साहेब चरणी मडक्याने पाणी वाहून आणून चरणी अपूर्ण केले जाते.

नांदेड शहरात बरेच दहावे गुरु श्री गुरू गोविंद सिंग यांच्या स्मरणार्थ अनेक गुरुद्वारा गोदावरीच्या काठेवर आहेत. नांदेड शहराचा प्राचीन नाव नंदीग्राम होते,गुरूंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या धर्तीला आज हुजूर साहब नांदेड या नावाने ओळखले जाते. देशभरात प्रसिद्ध असलेला हा गुरुद्वारा शीख धर्मांचे श्रद्धा स्थान आहे. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरा नंतर देश्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेला हा नांदेड येथील गुरुद्वारा आहे. देश विदेशात प्रसिद्ध असलेल्या नांदेड सारख्या शहराला पर्यटकांनी एकदा अवश्य भेट द्यावी.

– सय्यद मुजीब
प्रतिनिधी
मुखेड,नांदेड.


तमाम जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

# वाशिम नगर परिषद वाशिम,



तालुका जिल्हा -वाशिम

स्वच्छ सर्वेक्षण २०१९

## नागरिकांना जाहीर आवाहन

वाशिम शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की,स्वच्छ भारत अभियान(नागरी)अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ जानेवारी महिन्यात होणार आहे तरी आपले वाशिम शहर स्वच्छ आणि सुंदर राखण्यासाठी वाशिम शहरातील सर्व नागरिकांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्याकरिता जाहीर आवाहन करण्यात येत आहे. - ● वाशिम शहरातील सर्व नागरिकांनी वयक्तिक किंवा सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा ● वाशिम शहरातील सर्व नागरिकांनी वैयक्तिक घरगुती शौचालयाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करावे ● वाशिम शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या घरातून निघणाऱ्या कचऱ्याचे ओला व सुका याप्रमाणे वर्गीकरण करून घटागाडी मध्ये टाकावा ● वाशिम शहरातील सर्व नागरिकांनी स्वत: उघड्यावर शौचास जाऊ नये तसेच आपल्या घराच्या बाजूला किंवा आसपासच्या परिसरात कोणतेही व्यक्ती उघड्यावर शौचास जात असल्यास त्याला प्रतिबंध घालावा ● वाशिम शहरातील सर्व खाजगी,सार्वजनिक व शासकीय शाळा , विध्यालाय महाविध्यालयांनी विद्यार्थ्यासाठी शौचालय व स्वछतागृह बांधावे तसेच आपली शाळा, विध्यालय व महाविध्यालय परिसरात स्वच्छता राखावी ● वाशिम शहरातील सर्व मंगल कार्यालयांनी आपल्या संपन्न होणाऱ्या कुठल्याही कार्यक्रमात प्लास्टिक ग्लास ,प्लास्टिक कोटेट पत्रावळी व थर्माकोल द्रोण चा वापर कटू नये ,प्लास्टिक ग्लास ,प्लास्टिक कोटेट पत्रावळी व थर्माकोल द्रोणचा वापर करतांना आढळल्यास नगर परिषद वाशिम कडून महाराष्ट्र प्लास्टिक बंदी अधिसूचनेनुसार रुपये ५०००/ पहिला गुन्हा ,रुपये १००००/ दुसरा गुन्हा व रुपये २५०००/तिसरा गुन्हा तसेच मंगल कार्यालयाची परवानगी रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी ● वाशिम शहरातील सर्व व्यापारी बंधूनी महाराष्ट्र प्लास्टिक बंदी अधिसूचनेनुसार बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिक पिशव्या,पॉलीप्रापलीन पिशव्या ,थर्माकोल यांचा वापर किंवा विक्री करतांना आढळल्यास नगर परिषद वाशिम कडून महाराष्ट्र प्लास्टिक बंदी अधिसूचनेनुसार रुपये ५०००/ पहिला गुन्हा,रुपये १००००/दुसरा गुन्हा व रुपये २५०००/ तिसरा गुन्हा तसेच दुकानाची व्यापाराकरिता दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी ● वाशिम शहरातील सर्व नागरिकांना व व्यापारी तसेच मंगल कार्यालयांनी कचरा घंटागाडीत टाकावा इतरत्र रस्त्यावर कचरा टाकताना आढळल्यास नगर परिषदे कडून दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी ● वाशिम शहरातील सर्व पेट्रोलपंप धारकांना आपल्या पेट्रोल पंपामधील शौचालयाना सार्वजनिक शौचालय म्हणून घोषित करावे व सर्व नागरिकांना त्याचा वापर करू द्यावा ● वाशिम शहरातील सर्व मंगल कार्यालयांनी आपल्या मंगल कार्यालयातील शौचालयाना सार्वजनिक शौचालय म्हणून घोषित करावे व सर्व नागरिकांना त्याचा वापर करू द्यावा ● वाशिम शहरातील सर्व सामाजिक संघटनांनी वाशिम शहर स्वच्छ व सुंदर राहण्याकरिता या अभियानामध्ये आपला सहभाग नोंदवून आठवडातुन किमसन एक वेळ स्वच्छता अभियान राबवावे जेणे करून नागरिकानमध्ये स्वच्छते बाबत जागृती निर्मान होऊन शहर स्वच्छ होण्यास मदत होईल ● वाशिम शहरातील सर्व नागरिकानी स्वच्छता अप्प डाऊनलोड करून स्वच्छते बाबत काही तक्रार असल्यात त्यावर आपली स्वच्छते बाबतची तक्रार नोंदवावी.

**अशोक हेडा**
अध्यक्ष

**भानुप्रतापसिंह ठाकूर**
उपाध्यक्ष

**गणेश शेटे**
मुख्याधिकारी

नगर परीषद वाशिम

# अंबाजोगाईची श्री.रेणुका देवी एक जागृत देवस्थान आणि निसर्ग सौंदर्याने नटलेले पर्यटन स्थळ

असंख्य देवदेवता व साधुसंत यांच्या पांवनस्पर्शाने पुनीत झालेली आंबानगरी अर्थात अंबाजोगाई. अशा या मनोहर आंबानगरीच्या निसर्गरम्य डोंगर खोऱ्यात व जयवंती नदीच्या किनाऱ्यावर हजारो वर्षां पूर्वी उभारल्या गेलेले हिंदु धर्मियांचे श्रद्धास्थान म्हणचे श्री. रेणुका देवीचे जागृत देवस्थान.

या रेणुका देवी देवस्थानची आख्यायिका सांगितली जाते ती अशी, हजारो वर्षा पूर्वी या पृथ्वी तलावर रेणुक नावाचा अतिशय श्रीमंत आणि धनदांडगा राजा होऊन गेला, राजाला सुख संपत्ती आणि राजवैभव प्राप्त होते, मात्र मुलं बाळ नव्हते. त्या मुळे रेणुक राजा व त्याची पत्नी भोगावती हे सदैव दुःखी होते. एकदा या राजाला गौतम ऋषी भेटले, गौतम ऋषींनी राजाला अंबिका नावाच्या डोंगरावर जा, दुर्गादेवीची उपासना कर, मुलबाळ होऊ दे अशी आळवणी कर असा कानमंत्र दिला.

त्या मुळे राजाने अंबिका डोंगरावर जाऊन दुर्गा देवीची उपासना केली, दुर्गा देवी राजाला प्रसन्न झाली, देवीने राजाला वरदान दिले, तुझी इच्छा पूर्ण होईल, तू जा मीच तुझ्या पोटी जन्म घेईल. राजा परत आला आणि भोगावती गर्भवती राहीली. चैत्र महिन्यातील कृष्ण पक्षाच्या पंचमीच्या शुभदिनी भोगावतीला च्या पोटी कन्यारत्न झाले, गोरीगोमटी, रत्नासारखी दिसणारी व बापाच्या चेहऱ्यावर ही कन्या असल्याने तिचे नाव रेणुका असे ठेवण्यात आले.

पहाता पहाता रेणुका वयात आली, रेणुकेसाठी वर शोधण्यास सुरवात झाली, तिच्यासाठी अनेक राज्याचे राजकुमार पाहिले मात्र एक ही राजकुमार पसंत पडला नाही, त्या मुळे पुन्हा रेणुक राजाने दुर्गा देवी कडे धावा घेतला व देवीच्या आज्ञे प्रमाणे रामगिरी पर्वतावर जाऊन रेणुकेचे जमदग्नी ऋषि सोबत लग्न लावून दिले. रेणुका सुखाने नांदायला लागली पहाता पहाता तिला चार पुत्र झाली, रेणुकेचा चौथा पुत्र परशुराम हा विष्णूचा अवतार. एक वेळ रेणुकेच्या हातून एक लहानसा अपराध घडला आणि जमदग्नी ऋषीचा कोप होऊन त्यांनी रेणुकेला शाप दिल्याने तिच्या अंगावर कोड फुटल्याने ती रानावनात डोंगरदऱ्यात फिरू लागली, योगी लोकांनी तिला आशीर्वाद



दिल्याने तिचे कोड नष्ट झाले त्या मुळे ती परत रामगिरी पर्वतावर जाऊन आपल्या पुत्रांना भेटली, या वेळी बापाच्या आज्ञेवरून परशुरामाने रेणुकेची मान छाटली व तिचे तुकडे तुकडे केले, बापाची आज्ञा तर पाळली मात्र आपल्या मातेस जिवंत करा अशी इच्छा परशुरामाने बापाकडे व्यक्त केली, जमदग्नीला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला त्याने रेणुकेचे विखुरलेले तुकडे एकत्रित करून तिला जिवंत केले. रेणुका जिवंत झाली मात्र सहस्त्र हाताच्या एका राजाने जमदग्नी ऋषीला त्रास दिला तेव्हा परशुरामाने सहस्त्र हाताच्या राजाचा वध केला, त्या मुळे रेणुका सुखी झाली. माघ महिन्याच्या पौर्णिमेस दुर्गादेवी प्रसन्न होऊन म्हणाली, रेणुका माझी भक्ती केल्याने पुण्य मिळते, धनदौलत, सौभाग्यवृद्धी, पुत्रप्राप्ती, राजवैभव सर्व काही प्राप्त होते.

आशा या रेणुकेचे रूप धारण केलेल्या दुर्गादेवीचे मंदिर आंबानगरीच्या उत्तरेस डोंगर माथ्यावर असल्याची आख्यायिका सांगण्यात येते, ज्या वेळी बापाच्या आज्ञेवरून परशुरामाने रेणुकेचे तुकडे तुकडे केले त्या वेळी हे तुकडे पृथ्वीतलावर विविध ठिकाणी जाऊन पडले, त्या पैकी एक तुकडा याच डोंगरावर पडला आणि ज्या वेळी कोड फुटल्याने रेणुका डोंगरदऱ्यात फिरत होती त्या वेळी तिने या डोंगर कपारीत वास्तव्य केले

त्या मुळे या जागेवर हजारो वर्षा पूर्वी राक्षसांनी या रेणुका देवीच्या हेमांडपंथी मंदिर उभारणी केल्याचे सांगितले जाते, याच रेणुका देवी च्या पायथ्याशी कोकणस्थाचे श्रध्दास्थान असलेल्या श्री. योगेश्वरी देवीचे मूळ स्थान म्हणजे

श्री मूळजोगाई देवीचे मंदिर पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. मंदिरा पासून अवघ्या अर्ध्या की. मी. अंतरावर आद्यकवी श्री. मुकुंदराज स्वामी, पासोडीकार दासोपंत यांची समाधी स्थळे, पावनाश, शुकलेश्वर, बाराखांबी ही शंभुची मंदिरे, हत्तीखाना या सारखी प्रेक्षणीय स्थळे पुरातन काळापासून अस्तित्वात आहेत.

श्री. रेणुका देवी व श्री. मूळजोगाई देवी या मंदिराचे मुख्य पुजारी वै. शिवाजीराव अंबेकर यांनी ऊन, पाऊस, डोंगराचा काटेरी रस्ता याची तमा न बाळगता आपल्या उभ्या जीवनात रेणुका देवीची अविरत सेवा केली. रेणुका देवीच्या जागृततेचा अनुभव आल्या नंतर भाविकांचा ओढा देवीच्या दर्शना साठी वाढू लागला. साधारण ३५ वर्षा पूर्वी वै. शिवाजीराव अंबेकर व त्यांचे अंध मित्र वै. मुकुंद अप्पा यादव, वै. शामलाल मोदी, माजी आमदार वै. बी. एन सातपुते, ताराचंद परदेशी या मंडळींनी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे रोपटे लावले.

या जीर्णोद्धार कामी आज पर्यंत दिवंगत आमदार स्व. विमल मुंदडा, अंबाजोगाई न प चे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांचा मोठा लाभलेला असून मंदिर स्थळी भव्य सभामंडप, सुरक्षा भिंत, आकर्षक असा मंदिराचा गाभारा बनवण्यात आलेला आहे. मंदिर स्थळी अश्विन महिन्यात पंधरा दिवस प्रतिपदे पासून नवरात्र महोत्सवा निमित्य अखंड हरिनाम सप्ताहासह विविध कार्यक्रमास प्रारंभ होतो. त्या मुळे या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.

मंदिराचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी दत्तात्रय अंबेकर, मंडळाचे अध्यक्ष ताराचंद परदेशी, उपाध्यक्ष अशोक मोदी यांच्या मार्गदर्शना खाली गणपत नाना यादव, गोविंदराव बरुरे, रामचंद्र बळे, मनोज जाधव यांच्या पुढाकाराने संपन्न होणाऱ्या या उत्सव काळात हजारो भक्तगण अन्नदानाचा लाभ घेतात. अष्टमीच्या दिवशी होमहवन होऊन श्री देवीची पालखी गावभर फिरून कोजागिरी पौर्णिमेस उत्सवाची सांगता होते.

मुळात हा परिसरच वन विभागाच्या आखत्यारित असल्या मुळे मंदिराचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी दत्तात्रय अंबेकर हे या परिसराला पर्यटन स्थळाचे स्वरूप प्राप्त व्हावे व या परिसराचा विकासा व्हावा या साठी वन विभागाच्या अधिकाऱ्यासह या परिसरातील लोकप्रतिनिधीशी सतत संपर्कात असतात त्या मुळेच तत्कालीन वनपरीक्षेत्र अधिकारी एम. एस. मुंडे यांनी या परिसराच्या सुशोभी करणाच्या उद्देशाने ५० लाख रु. खर्च करून एक बाल उद्यान बनवले असून भाविकांचे श्रद्धास्थान व पर्यटकांचे आकर्षण बनू पहात असलेल्या श्री. रेणुका देवी देवस्थान ला जाण्यासाठी अंबाजोगाई शहराच्या रविवार पेठ भागातून व श्री. योगेश्वरी देवी मंदिराच्या मागील बाजूस मुकुंदराज रोड कडे जाणाऱ्या रोड वरील दासोपंत मंदिराच्या उजव्या बाजूने एक रस्ता असून हा रस्ता पूर्णपणे उखडल्या गेल्याने या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे यासाठी आणि या परिसराच्या सुशोभी करणासाठी एक नवीन प्रस्ताव तयार करण्यात यावा या साठी देवस्थानचे मुख्यव्यवस्थापक व पुजारी दत्तात्रय अंबेकर यांचा ना. पंकजाताई मुंडे, आ.संगीताताई ठोंबरे यांच्या सह राजकीय व प्रशासकीय पातळीवर सतत पाठपुरावा सुरू असून चालू नवरात्रात रस्त्या मुळे भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता भंडे, उप अभियंता मार्कंडे यांनी उखडलेल्या रस्ता तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्त केण्याचे आदेश कंत्रातदारांस दिले असून लवकरच या रस्त्याचे डांबरी करणं करण्यात येणार आहे. तसेच वनपरिक्षेत्र परिमंडळ कार्यालय परळी येथील विद्यमान वन परिक्षेत्र अधिकारी परळी अधिकारी आर. बी. शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली अंबाजोगाई येथील वन परी मंडळ अधिकारी एस.जी. वरवडे,

वन रक्षक बी. जे. नागरगोजे यांनी ही या परिसराच्या सुशोभी करणासाठी नवीन प्रस्ताव तयार केला असून तो शासन दरबारी दाखल ही झालेला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्या नंतर हा रमणीय परिसर आगामी काळात एक पर्यटन स्थळ बनल्या जाणार यात कुठलीही शंका नाही.

– नंदू पांचाळ
प्रतिनिधी,
अंबाजोगाई बीड.

**रक्तदान सर्व श्रेष्ठ दान !**

**झाडे लावा, झाडे जगवा!**

# नाशिक पर्यटन

प्रस्तावना

नाशिक शहरात गोदावरी जेथे दक्षिणवाहिनी झाली तेथे अनेक पवित्र कुंडे असून प्रत्येक कुंडाचे वेगळे महत्व आहे. अरूणा संगमाच्या ठिकाणी असलेल्या रामकुंडात प्रभू रामचंद्र व सीतामाई स्नान करीत. संगमाच्या ठिकाणी असलेल्या रामकुंडातच अस्थीविलय कुंड असून तेथे प्रभू रामचंद्राने श्राध्दविधी केले. या कुंडातच अस्थीविलय कुंड असून तेथे अस्थी विसर्जन केले जाते. साडेतीन तासात अस्थीचे विलय होते. १६९६ मध्ये सातारचे चित्राव यांनी रामकुंड बांधले तर १७२८ मध्ये या रामकुंडाला गोपीकाबाईंनी लक्ष्मण कुंडाची जोड दिली. तसेच सीताकुंड, धनुष्यकुंड, अहिल्याकुंड, दुतोंडया मारूती कुंड, सूर्य कुंड, गोरेराम कुंड, रामगया कुंड, पेशव्यांचे कुंड, रामकुंडाच्या येथे गोदावरी दक्षिणवाहिनी होते. म्हणून नाशिकला तिचे वेगळे महत्व आहे. रामकुंडाच्या ठिकाणी वंशवृध्दीसाठी एकवस्त्र विधी करतात. तसेच श्राध्द व पिडाला काकस्पर्शाने मुक्ती मिळविणे याचे ही इथे महत्व आहे.

## पांडव लेणी




नाशिकच्या अलिकडे दक्षिणेस सुमारे ८ किलोमीटर्सवर डोंगरात कोरलेली लेणी आहेत. शहराच्या नैऋत्येस शंखाच्या आकाराचे तीन डोंगर आहेत. त्यांना ''त्रिराशी'' असे संबोधतात. मध्याला डोंगरावर ही लेणी आहेत. ती सुमारे इ.स.पूर्व १०० ते ११० या वर्षी खोदलेली असावीत. एकूण २९ गुंफा आहेत. शालिवाहन हया हिदू राजाने बौध्द भिक्कूसाठी प्रवासात विश्रांती घेण्यासाठी ही लेणी बांधली . आतील भगवान गौतम बुध्दाच्या तसेच बोधीसत्वाच्या मूर्ती प्रेक्षणीय आहेत.

## श्रीसप्तश्रृंगी देवी




महाराष्ट्रत शक्तीची साडेतीन पीठे मानली जातात. त्यापैकी वणीच्या देवीचा सप्तश्रृंगी गड हे आदिशक्ती स्थान मानले जाते. ओंकारातील आकार पूर्ण रूप होवून सप्तश्रृंगी गडावर स्थिरावला. म्हणून आदिमायेचे हे पूर्णरूप मानले जाते. नाशिकपासून ६५ कि.मी. दूर सहयाद्री पर्वतांच्या पूर्व-पश्चिम पर्वतरांगेत हे स्थान आहे. समुद्रसपाटीपासून ४६०० फुट उंचीवरचे हे ठिकाण निसर्गाने नटलेले व भाविकांना आकर्षित करणारे आहे. गडावर चढून आल्यावर ५०० पाय-या चढून मंदिराकडे जाता येते. डोंगराच्या कपारीत ८ फुट उंचीची व १८ बाहू असलेली स्वयंभू पाषाणमूर्ती आहे. विशेष म्हणजे, या मुर्तिच्या चेह-यावरील भाव महाकाय व महिषासुरमर्दिनीरूप असूनही अत्यंत प्रसन्न आहे. दर पौर्णिमेला व नवरात्रात भाविकांची गर्दी असते. चैत्र पौर्णिमेला तर लक्षावधी भाविक येतात. गडावर पूर्वी १०८ कुंडे होती. परंतु, सध्या त्यापैकी १० ते १५ कुंडे

दिसतात. जलगुंफा, शिवतिर्थ, तांबुल तीर्थ व काजळ तीर्थ इ.१०-१२ तीर्थ दिसतात. शिवालयतीर्थापासून जवळच शितकडा नावाची १२०० फुट खोल दरी आहे. यालाच 'सतीचा कडा' असेही म्हणतात.

(वणीतील नाशिक दिडोरी रस्त्याने बसने जाता येते. तसेच पंचवटीत दिडोरी रस्त्यावरून टॅक्सीही मिळते. गडावर रहाण्याची अल्प दरात सोय आहे. भोजन प्रसाधानाची ही व्यवस्था आहे.)

आहे, तर परिसर दगडांनी बांधलेला आहे, आत भक्तांना स्नान करायला व पाय धुवायला कुंड आहे. मंदिराचा गाभारा अतिशय शांत व पावित्राने आणि मांगल्याने भरलेला आहे. शिवलिग हे स्वयंभू आहे. पिंडीत ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे दर्शन होते. दर सोमवारी पालखी निघते. मंदिराचा कळस सोन्याचा आहे.

-कविता भारद्वाज

नाशिक

# त्रंबकेश्वर मंदिर



निसर्गरम्य परिसर - त्रंबकेश्वर डोंगराच्या कुशीत वसलेले नयनरम्य स्थान आहे. श्रावण महिन्यात हिरव्या पाचूच्या बेटासारखे हे चिमुकले गाव दिसते. मध्यभागी गंगासागर कुंड आहे. गावाचा पाणीपुरवठा येथून होतो. कुशावर्त कुंड तर तीर्थांचे तीर्थ म्हणून समजले जाते. ब्रम्हगिरी पर्वत समुद्रसपाटीपासून १२९४ मीटर्स (४२४६ फुट ) उंच आहे. अनेक धार्मिक विधी केले जातात. नारायण नागबली विधीसाठी देशाच्या कानाकोप-यातून मान्यवर येत असतात. येथे क्षेत्रस्थ ब्राहमणांनी आपल्या यजमान घराण्याच्या पुरातन वंशावली जपल्या आहेत. त्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह अनेक ऐतिहासिक मान्यवरांचे हस्ताक्षर आहे. भगवान शंकराचे हे भव्य मंदिर हेमाडपंथी पध्दतीने बांधलेले आहे. या मंदिरास त्या काळी सुमारे ३० लाख रूपये खर्च आला. १७४५ ते १७७५ च्या दरम्यान पेशव्यांनी हे पवित्र कार्य केले. मंदिराचे काम संपूर्ण काळ्या दगडात आहे. कोरीव काम अतिशय सुबक असून मंदिर भव्य आणि पवित्र आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराशी नगारा घर आहे. मंदिराच्या चहुबाजूंनी मोठी तटवजा भिंत

# लळिंग किल्ला

पूर्व- पश्चिम गेलेल्या गाळणा टेकड्यांवर किल्ले लळिंग आहे. त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ५९३ मीटर



आहे. किल्ल्याच्या अवशेषांची पडझड झाली आहे. १३ व्या शतकात फारुकी राजवटीत हा किल्ला अत्यंत महत्त्वाचा होता. त्यानंतर मोगल, निजाम, मराठे आणि इंग्रजांनी किल्ल्यावर राज्य केले. दुर्गस्थापत्यात मोगल शैलीचा वापर केलेला दिसून येतो. किल्ल्यावर पाण्याचे टाके, धान्य कोठार आहेत. पायथ्यापासून जवळच असलेला लहानसा घुमट पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. धुळे- नाशिक मार्गावर, धुळे शहरापासून दक्षिणेला ९ किलोमीटरवर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी लळिंग गाव आहे. गावातूनच किल्ल्याकडे जाणारी पायवाट जाते. लळिंग गावापासून किल्ल्यावर जाण्यासाठी साधारणत: एक तासाचा कालावधी लागतो. किल्ले लळिंग पाहून झाल्यावर लळिंगचे कुरण, धबधबा (पावसाळ्यात सुरू असतो.) आणि लांडोर बंगला पाहता येईल. या बंगल्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३७ मध्ये काही दिवस वास्तव्य केलेले आहे.

-सीमा लिंबोरे

धुळे

# सिंदखेड राजा





सिंदखेड राजा हे गाव आणि तालुकाही बुलढाणा जिल्ह्यात आहे. ते गाव शिवाजी महाराजांची आई वीरमाता जिजाबाई भोसले यांचे जन्मगाव आहे. त्यामुळे सिंदखेड राजा या गावाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. गाव मुंबई-नागपूर हायवेपासून जवळ आहे. गावात एसटी जालन्यातून येते.

गाव सोळा हजार लोकवस्तीचे आहे. गावात पाहण्यासारख्या पुरातन काही गोष्टी आहेत. त्या म्हणजे जिजाबाईंचे वडील लखुजीराजे यांचा वाडा, रंगमहाल, सावकारवाडा, काळाकोट, लखुजी राजांची समाधी, पुतळा, बारव-सजना बारव-गंगासागर-बाळसमुद्र या नावाच्या विहिरी आणि चांदणी तलाव व मोती तलाव. बारव म्हणजे चौकोनी विहिरी असतात. त्याला चारही बाजूने पायऱ्या असतात. त्या विहिरी पाण्याने पूर्ण भरलेल्या असतात. मात्र हल्ली त्या विहिरीही उन्हाळ्यात आटतात.गावाच्या एका बाजूला डोंगर आहे. तेथे मात्र हल्ली पाऊस सरासरी पडतो. पंधरा किलोमीटर अंतरावर पूर्णा नदी आहे. नदीवर संत चोखामेळा धरण आहे. त्यातून गावाला आणि परिसराला पाणीपुरवठा होतो.




## समस्त भारतवासियांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

- स्वच्छ सर्वेक्षण २०१९ अंतर्गत
- उमरगा शहराची ३ स्टार रँकींगकडे वाटचाल
- शहरातील सर्व नागरीकांनी ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण करुन घंटा गाडीतच द्यावा.

स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर

## आपला उमरगा स्वच्छ उमरगा
## आपले शहर स्वच्छ व सुंदर शहर

# नगर परिषद, उमरगा

## जि.उस्मानाबाद

# श्रीक्षेत्र वैष्णव गड

श्रीक्षेत्र वैष्णव गड तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा हे ठिकाण देऊळगाव राजा मेहकर हायवेवर सावखेड तेजन पाटीपासून पिंपळखुटा रोडवर उत्तरेस तीन किलोमीटरवर आहे वैष्णो गड क्षेत्र वैष्णव क्षेत्र आहे वैष्णवांनी वैष्णवांसाठी देवाच्या इच्छेने देवाचे सत्तेत वैष्णव गड क्षेत्र निर्माण केले. सभोवती झाडाझुडपांनी नटलेला निसर्ग आहे वैष्णव गड हा टेकडीवर सपाट जागेवर बांधलेला आहे सदर टेकडीची उंची अंदाजे दोनशे फूट आहे वैष्णव हा उगला पिंपळखुटा जामखेड या गावाच्या शिवाच्या शिवा वर निर्माण झालेला आहे वैष्णव गड हे पब्लिक ट्रस्ट असून येथील खर्चाचे ऑडिट होते.

धर्मदाय आयुक्तांकडे मंजुरात घेतली जाते सर्व व्यवहार अध्यक्ष श्री रंगनाथ साळू जी शेळके व जगन्नाथ विष्णुपंत जाय भाई उपाध्यक्ष यांच्या सत्तेत सचिव श्री सुखदेव रामभाऊ ताठे पाहतात श्रीक्षेत्र वैष्णव गडाची मालकीची पाच एकर जमीन खरेदी केलेली आहे उगला या गावाने १५ एकर व पिंपळखुंटा या गावाने गडाचे सुशोभिकरण करण्यासाठी वैष्णव गडाला दिली आहे सदर जमीनीवर विविध देशी विदेशी झाडे संस्थेने लावलेली आहेत. त्यामुळे चांगले निसर्गरम्य वातावरण या ठिकाणी पाहावयास मिळते प्राधिकरणाने देशी फळझाडे लावली आहेत त्याची उंची पाच ते पंधरा फूट आहे.



निसर्गरम्य टेकडीवर वैष्णवांची श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे निर्माण केलेले आहे सदर मंदिरावर आजपर्यंत दोन कोटी रुपये खर्च झालेले असून दहा लाखाची गरज आहे श्री विठ्ठल मंदिराचे मंदिर हे हेमाडपंथी बांधणीचे आहे मंदिराचे काम पूर्ण कोरीव आहे सदर मंदिराचे पूर्ण काम शिल्पकलेचा उत्तम नमुना आहे मंदिरामध्ये सिमेंट लोखंड लाकूड याचा वापर नाही निवड दगडाचे हे मंदिर आहे या मंदिराचे आर्किटेक व ठेकेदार हे आग्र्याच्या आहेत मंदिराचे कारागीर मथुरा वृंदावन या परिसरातील असून अक्षरधाम मंदिराचे काम



केलेले अनुभव कारागीर आहेत सदर मंदिराचे बांधकाम २०१४ सली गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू केलेले आहे मंदिराचे बांधकाम २०१७ ला सभामंडपाच्या पूर्ण झाले फाल्गुन शुद्ध ३१ मार्च च्या मुहूर्तावर श्रीजी विधिवत प्राणप्रतिष्ठा झालेली आहेत आता मंदिराचे मूर्तीचे इतर काम सुरु आहे दोन कोटी खर्च होऊन पूर्ततेसाठी दहा लाखाची गरज आहे मंदिरावर जातिभेद व धर्म भेद मानला जात नाही येथे मानव धर्म मानला जातो सदर मंदिराला आळंदी नगर पासून प्रामुख्याने सिनखेडराजा चिखली लोणार या तालुक्यातील सर्व धर्मांच्या लोकांनी देणग्या दिलेले आहेत मंदिराला श्रीक्षेत्र वैष्णव गड खासदार प्रतापराव जाधव व सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर यांच्या प्रयत्नाने व श्री रमेश कायदे यांच्या मार्गदर्शनाखाली तीर्थक्षेत्र व दर्जा मिळालेला आहे सदर आर्थिक वर्षात दोन कोटी ची कामे मंजूर असून पूर्णत्वाचा आहेत त्यात महिला पुरुषांसाठी भक्त निवास वाहनतळ स्नानगृह संडास सिमेंट रस्ता मुदतीत पूर्ण होत आहे समाजातील दात्यांनी व दानशूरांनी उर्वरित खर्चासाठी मदत करावी असे आव्हान वैष्णव संस्थान आव्हान करीत आहे संयोजक त्र्यंबक प सानप गुरुजी श्रीक्षेत्र वैष्णव गड.

-संकलन,<br>
बाबासाहेब भोसले,<br>
सिदंखेड राजा, बुलढाणा

# चांदबिबी

## अन्य नावे :

लेखनभेद: चांद बीबी, चांद सुलताना, चांद खातुन) (इ.स. १५५० – इ.स. १५९९)

ही विजापुराची आदिलशाही व अहमदनगराची निजामशाही या दख्खनेतील साम्राज्याची राज्यपालक राणी होती. या राणीने विजापूर व अहमदनगरच्या राज्यांचे रक्षण करण्याचे काम केले. चांदबिबीला अहमदनगरमध्ये सम्राट अकबराच्या मुघल सैन्याशी झालेल्या लढाईमुळे ओळखले जाते .

## जीवन :


चांदबिबी ही अहमदनगराचा निजामशाह पहिला हुसेन याची कन्या व पुढे त्याचा वारसदार बनलेल्या बुऱ्हाण-उल मुल्काची बहीण होती. तिला अरबी, फारसी, मराठी, कन्नड, तुर्की भाषा येत होत्या. चांदबिबीचा विवाह विजापुराचा पहिला अली आदिलशाह याच्याशी झाला. चांदबिबीला सतार वाजविण्याचा व फुलांची चित्रे काढण्याचा छंद होता .

## विजापुरचे साम्राज्य :

एका तहाप्रमाणे चांदबिबीचा विवाह विजापूर साम्राज्याचा राजा अली आदिल शाह पहिला याच्याशी झाला होता. आदिल शाह यांनी विजापूरमध्ये पूर्वेला एका विहीर बांधली आणि तिला चांदबिबीच्या सन्मानार्थ चांदबावडी असे नाव ठेवले. अली आदिल शाह शियापंथाय असले तरी अली आदिल शाह यांचे वडील इब्राहीम आदिल शाह पहिला यांनी सर्व साम्राज्य सुन्नी, हबशी व दक्खनच्या राजवटीमध्ये विभागले होते..

## अहमदनगराच्या निजामशाहीचे रक्षण :

इ.स. १५८० मध्ये पहिल्या अली आदिलशाहाच्या मृत्यूनंतर आदिलशाहीत सत्तासंघर्षामुळे अंदाधुंदी माजली. सुमारे दशकभर चाललेल्या उलथापालथीअखेरीस आदिलशाहीची घडी नीट



बसल्यावर विधवा चांदबिबी निजामशाहीतील अहमदनगरास परतली. इ.स. १५९६ ते इ.स. १५९९ या काळात तिने निजामशाहीचे तख्त राज्यपालक राणीच्या नात्याने सांभाळले. नोव्हेंबर,इ.स. १५९५ मध्ये निजामशाही बुडवण्यासाठी मोगलांनी अहमदनगरावर चाल केली. तेव्हा तिने निजामशाही सैन्याचे नेतृत्व करत मोगल सैन्यास अल्पकाळ रोखून धरले.

कालांतराने चांदबिबीची मोगलांशी युद्धबंदीच्या तहाची बोलणी सुरू झाली, तेव्हा ती मोगलांना फितूर असल्याच्या अफवा निजामशाही सैन्यात पसरल्या व सैन्यात असंतोष पसरू लागला. निजामशाही सैन्यातील असंतोषाने भडकलेल्या काही लोकांच्या जमावाने चांदबिबीची हत्या केली. तिच्या मृत्यूनंतर चारच महिन्यांमध्ये मोगलांनी अहमदनगराचा पाडाव केला. अहमदनगरच्या किल्ल्याला शत्रूने पाडलेले खिंडार चांदबिबीने एका रात्रीत बुजवले असे सांगितले जाते.

-संकलन,
अरबाज शेख, अहमदनगर